म. ग्रं. सं. ठाणें
१००२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ३२२

REFBK-0000069

# जेम्स गार्फील्ड.

उत्तर अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांचे प्रेसिडेन्ट.

यांचें चरित्र.

हें पुस्तक

**लक्ष्मण परशराम परांजपे**

REFBK-0000069

W. M. Thayer कृत " From Log Cabin to White House "

या व इतर इंग्रजी ग्रंथांच्या आधारानें लिहिलें.

पापडी–वसई.

सन १९०१.

हें पुस्तक

परमपूज्य मातोश्रीचे चरणीं साष्टांग प्रणिपात करून

सविनय अर्पण करितों.

ग्रंथकार.

# अनुक्रमणिका.


| भाग | | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ | कुलवृत्तांत व जन्म | १—१२ |
| २ | बाळपण व विद्याभ्यास | १२—२७ |
| ३ | लहान शेतकरी | २७—३६ |
| ४ | लहान सुतार | ३६—४८ |
| ५ | लहान नावाडी | ४८—६१ |
| ६ | महत्त्वाचें स्थित्यंतर | ६१—८० |
| ७ | हिरामचें विद्यालय | ८०—९२ |
| ८ | कॉलेज | ९२—९९ |
| ९ | हिराम शाळेचा अध्यक्ष | ९९—१०६ |
| १० | प्रेसिडेंट गार्फील्ड | १०६—१११ |
| ११ | प्रयाण व उपसंहार | ११२—११५ |

# प्रस्तावना.

सत्समागमाचा महिमा अवर्णनीय आहे. 'आपणासारिखे करिती तात्काळ। नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥' ही तुकारामबोवांची उक्ति सर्वथैव खरी आहे. मनुष्य चांगला अगर वाईट निपजणें हें बहुधा त्यास जशी बरीवाईट संगत मिळेल त्यावर अवलंबून असतें. कित्येक लोकांचें तर असें मत आहे कीं, मनुष्याचें मन हें एखाद्या स्वच्छ आरशाप्रमाणें शुद्ध असतें. त्यास पूर्वजन्मींचे बरेवाईट विकार कोणतेच नसतात व जन्म झाल्यावर पुढें त्यास जसजशी बरीवाईट संगति प्राप्त होते तसतशी त्याची प्रवृत्ति चांगल्याकडे अगर वाईटाकडे वळते. हें कांहींही असो पण इतकी गोष्ट मात्र खरी आहे कीं, मनुष्याचें मन वर लिहिलेल्या मताप्रमाणें शुद्ध असो अगर त्यावर पूर्वजन्मींचे कांहीं बरेवाईट संस्कार घडलेले असोत, तें चांगल्या अगर वाईट मार्गाकडे लागणें हें त्यास जी संगत अगर स्थिति प्राप्त होईल तीवर अवलंबून असतें.

आतां मनावर असलेले जन्मजन्मांतरीचे सर्व संस्कार दबून जाऊन, त्यावर संगतिविशेषाचा एवढा प्रभाव कां होतो याचें कारण पाहूं जातां फार खोल आहे असें नाहीं. लहान मुलांच्या वर्तनाचें आपण सूक्ष्म दृष्टीनें जर अवलोकन केलें, तर आपल्या असें दृष्टीस पडेल कीं, त्यांचें आचरण जवळच्या चारचौघांच्या आचाराप्रमाणें असतें. मुलांस खेळ खेळणें झालें तरी त्यांच्या वडील मंडळीचे जे उद्योग असतात त्यांच्याच धोरणानें त्यांचे खेळ असतात. शेतकऱ्याच्या मुलाचे खेळ गुराढोरांचेच असणार, ते एखाद्या नगरवासी मुलाच्या खेळांप्रमाणें कधींही नसावयाचे. इतकें दूर जावयास नको. एका कुटुंबांतीलच बहीणभावंडें घ्या. मुलगी जी असते तिला आईचा सहवास फार असल्यामुळें, तिचे सर्व व्यवसाय बायकांस साजतील असेच असतात; परंतु मुलाची गोष्ट तिच्या अगदीं उलट असते. असो; तर अनुकरणाकडे मनुष्याची प्रवृत्ति जर एवढी साहजिक व बलवत्तर

आहे, तर लहानपणापासून अनुकरणीय चरित्रें मुलांपुढें येणें फार अगत्याचें आहे. आतां सज्जन व थोर मनुष्याची संगत लाभणें हें लाखांत एखाद्याचे वांट्यास येतें; बाकीच्यांस वाईट माणसांची संगत मिळण्याचाच पुष्कळ संभव असतो. तेव्हां अशांच्या संगतीपासून मनावर वाईट परिणाम न होतां, चांगल्या वर्तनाची महती व खरा थोरपणा मनांत बिंबावा ह्मणून, इतिहास व चरित्रें वाचण्याकडे लहान मुलांची प्रवृत्ति व्हावी यास्तव, थोर माणसांनीं प्रयत्न केला पाहिजे.

'चरित्रें हीं प्रत्यक्ष उदाहरणें दाखवून केलेला बोध होय' असें एका प्रसिद्ध ग्रंथकाराचें ह्मणणें आहे व तोच उद्देश मनांत धरून हें प्रस्तुत चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या सत्पुरुषांचीं चरित्रें नानाप्रकारांनीं आजकाल अनुकरणीय झालीं आहेत, त्या सत्पुरुषांपैकींच जेम्स गार्फील्ड हे एक होत. उद्योगाचें महत्त्व, कर्तव्यजागृति, दृढ निश्चयानें सतत परिश्रम करणें, स्वावलंबन, सत्यप्रीति, वर्तणुकीचा प्रभाव, ईश्वराचे पायीं निष्ठा वगैरे अनेक गुण यशप्राप्ति होण्यास किती आवश्यक आहेत, ही गोष्ट या चरित्राच्या अवलोकनानें अंतःकरणांत चांगली ठसते. अंगीकृत कार्य निश्चयानें चालविणें ही कार्यसिद्धीची गुरुकिल्ली आहे; इच्छा असली कीं उपाय सुचतो; ऊर्जित दशेस येण्यास मनुष्य स्वावलंबी असला पाहिजे; मग तो उद्योग कोणताही कां असेना, त्याचें महत्त्व फार आहे; जन्मास येऊन कृतकृत्य व्हावें अशी जर इच्छा असेल तर, आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे; जगांतील एकंदर व्यवहार करीत असतां ईश्वरावर निष्ठा असावी व एकंदर व्यवहारांत स्वधर्मबाह्य आचरण निंद्य होय; इत्यादि व्यवहारसिद्धांतांचें खरेपण प्रस्तुत चरित्रांत पूर्णपणें व्यक्त होतें. असें असल्यामुळें, हें चरित्र किल्यादाखल लहान मुलांपुढें ठेवण्यास यथार्थ आहे हें निराळें सांगणें नको.

प्रस्तुत चरित्र लहान मुलांस बरेच अंशीं मार्गदर्शक व्हावें हा मुख्य हेतु असल्यामुळें, यांत चरित्रनायकाची पूर्ववयांतील हकीगत बऱ्याच विस्तारानें वर्णिली आहे. कोणताही महात्मा थोर पदवीस आल्यावर, त्यानें कसें

वर्तन केलें हें कळण्यापेक्षां, तो थोर पदास कसा चढला, वर येत असतां मार्गांत त्यास कोणकोणतीं विघ्नें प्राप्त झालीं व तीं निवारण्यास त्यानें काय उपाय केले, या गोष्टी कळणें जास्त महत्त्वाचें आहे. निदान लहान मुलां-करितां ह्मणून जीं चरित्रें लिहावयाचीं, त्यांत तरी ह्या वर दर्शविलेल्या गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत.

ह्या चरित्राचा आणखी एक विशेष हा आहे कीं, हें रावापासून रंका-पर्यंत कोणत्याही स्थितींतील मनुष्यास सारखें अनुकरणीय आहे. तेंव्हां लहान वाचकांनीं हें चरित्र वाचून, सर्वांशीं जरी नाहीं तरी, थोडें फार याचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करावा आणि तसें झाल्यास मी माझ्या अल्प श्रमाचें साफल्य झालें असें समजेन.

अखेर ज्या हेतूनें हें चरित्र लिहिलें आहे तो कितपत तडीस गेला आहे व यांत कोणकोणतीं व्यंगें आहेत, हें सुचविण्याची विद्वान् वाचकांस सविनय प्रार्थना करून ज्या सर्वशक्तिमान् प्रभूच्या प्रेरणेनें हें चरित्र लिहिण्यास सदर लेखकास स्फूर्ति झाली व ज्याच्या साह्यानें हें तडीस गेलें त्या जगच्चालक प्रभूस साष्टांग प्रणिपात करून, हा प्रस्तावना-लेख पुरा करितों.

मु. पापडी—वसई
ता. १ फेब्रुवारी १९०२.

लक्ष्मण परशराम परांजपे.

# जेम्स गार्फील्ड.

## भाग १ ला.

### कुलवृत्तांत व जन्म.

सुमारें शंभर वर्षांपूर्वींच्या व हल्लींच्या उत्तर अमेरिकेंतील संस्थानांचे स्थितींत महदंतर आहे. हल्लीं ज्या ठिकाणीं मोठमोठालीं संपत्तिमान् शहरें वसलीं आहेत, त्याठिकाणीं पूर्वीं निबिड आरण्यें होतीं. तेथें मोठमोठाले गगनचुंबित वृक्ष अतिशय असल्यामुळें त्या ठिकाणीं एकट्यादुकट्यास दिवसासही जाण्यास भय वाटत असे. अशा भयाण अरण्यांत धाडशी लोक येऊन वसाहत करीत. वसाहत करणारांस जमिनी कांहीं सवलतीनें मिळत तरी त्यांस झाडें तोडणें, जमीन साफ करणें, तिची लागवड करणें वगैरे अनेक श्रमांचीं कामें करावीं लागत. शिवाय अशा रानटी प्रदेशांत लांडगे, अस्वली वगैरे हिंस्र जनावरें पुष्कळ असल्यामुळें, तेथें घरदार करून राहणेंही फार धोक्याचें असे.

याविळीं ह्मणजे सन १७९९ चे सुमारास थामस गार्फील्ड नांवाचा एक शेतकरी न्यूयॉर्क संस्थानांतील ओटसेगो परगण्यांतील वरसेस्टर या ठिकाणीं राहत असे. त्यास त्याच वर्षीं एक मुलगा झाला, त्याचें नांव त्यानें एब्राम असें ठेविलें. हाच एब्राम जेम्स गार्फील्ड याचा बाप होय.

एब्राम याचा बाप तो दोन वर्षांचा असतांनाच वारला. थामस मेला तेव्हां त्याचे मागें त्याची विधवा स्त्री व पुष्कळ लहान मुलें होतीं. त्या अनाथ प्राण्यांवर हा जो दुःखाचा प्रसंग ओढवला त्याचें वर्णन करणें फार कठीण आहे. याच प्रकारच्या प्रसंगाची पुनरावृत्ति एब्राम याच्या आयुष्यांत झाली; ह्मणजे एब्राम हा देखील त्याचा मुलगा जेम्स हा सुमार दीड दोन वर्षांचा असतांनाच वारला. नवरा वारल्यानंतर सर्व मुलांचें संगोपन करून, दिवस कंठण्यासारखी एब्रामचे आईची स्थिती नसल्यामुळें, एब्राम यास जेम्स स्टोन नांवाच्या

एका शेजाऱ्यानें आपल्या घरीं आणिलें व आपल्या मुलांत त्यास वाढवून लहानाचा मोठा केलें.

एब्राम हा आपल्या पालकाचे घरीं रहात असतां, त्यांचे शेजारीं एक विधवा बाई राहण्यास आली. तिला एलिझा नांवाची एक नऊ वर्षांची मुलगी होती. ती फार चलाख व सद्गुणी असून तिच्या बाळपणाच्या वर्तनावरून, ही मोठेपणीं चांगली कर्ती बाई निपजेल, असें पाहणारास तेव्हांच वाटे. या मुलीच्या व एब्रामच्या वयांत एकाच वर्षाचें अंतर असल्यामुळें, तीं दोन्हीं मुलें एके ठिकाणीं खेळत असत व त्यांचें चांगलें जमे; परंतु या दोन मुलांचा सहवास फार दिवस टिकला नाहीं. एलिझाची आई थोड्याच दिवसांत आपलें बिऱ्हाडबाजलें आटपून, ओहिओ संस्थानांत झानेसवली या ठिकाणीं रहावयास गेली व अशा रीतीनें त्या दोन्ही मुलांची ताटातूट झाली.

पुढें एब्राम हा वीस वर्षांचा झाल्यावर, आपण आपला उदरनिर्वाह करावा ह्मणून, आपल्या पालकाचे घराहून निघून, ओहिओ संस्थानांत क्लिव्हल्यांडजवळ असलेल्या न्यूबर्ग या ठिकाणीं आला. त्यावेळीं क्लिव्हल्यांड हें गांव सुमारें शंभर माळसांच्या वस्तीचें ठिकाण होतें व न्यूबर्ग हें त्याहीपेक्षां कनिष्ठ दर्जाचें खेडें होतें. यावेळीं एब्राम हा तरुण, धाडशी व हुशार असून, आपल्या सामर्थ्यानें आपण चांगलें सुखी होऊं अशी त्यास बळकट उमेद असल्यामुळें, तो मुद्दाम या खेड्यांत रहावयास आला होता.

या ठिकाणीं आल्यावर त्यास असें समजलें कीं, एलिझाची आई जवळच झानेसवली या ठिकाणीं राहते. एब्रामची व एलिझाची ताटातूट झाल्यास आज जरी पांच सहा वर्षें झालीं होतीं तरी, त्याचें त्याच्या मैत्रिणीवरील प्रेम किमपिही कमी झालें नव्हतें. असें असल्यामुळें, वेळांत वेळ काढून, त्यांस भेटण्याचे उद्देशानें तो त्यांचे घरीं गेला. तेथें त्याचें चांगलें आदरातिथ्य झालें. एलिझाचे मनांतही एब्रामबद्दल पूर्ण आदर होता. एलिझा ही आतां एकोणीस वर्षांची झाली होती व पाहणाराचें मन सहज वेधेल असें

तिचें रूप व गुण असल्यामुळें, तिला पाहतांच एब्राम यास साहजिकच आनंद झाला. या दोघांत लहानपणापासूनच अत्यंत प्रेम होतें व यावेळीं त्यास निराळें रूप प्राप्त झालें. फार पाल्हाळ न करितां थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे त्यांचें एकमेकांवर मन बसून, पुढें दोन वर्षांनीं सन १८०१ च्या फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेस त्यांचा विवाह झाला. लग्न होतांच एब्राम आपल्या बायकोस घेऊन न्यूबर्ग येथें आला. या ठिकाणीं एब्रामनें घरदार केलें होतें. त्याचें घर वीस फूट लांब व आठरा फूट रुंद असून, त्याच्या भिंती लांकडाच्या ठोकळ्यांच्या केलेल्या होत्या. खरें ह्मटलें तर हें घर अगदीं गरीबीचें होतें, तरी त्यांत रहाणाऱ्या जोडप्याचें एकमेकांवर निष्कपट प्रेम असल्यामुळें, त्यास ती झोंपडी राजवाड्यांपेक्षांही अधिक आनंददायक झाली. वर दिलेल्या घराच्या क्षेत्रफळावरून, त्यास स्वैपाकघर, माजघर, निजावयाची खोली मिळून सारें एकच दालन होतें हें निराळें सांगणें नको. त्या घराला खिडक्या ह्मणजे भिंत करितांना कांहीं ठिकाणीं राखलेलीं भोकें होत. त्यास कांचाऐवजीं मेणवलेले कागद चिकटविलेले होते; त्यामुळें आंत वारा न येतां थोडा फार उजेड पडत असे. घरांत सामान ह्मटलें तर बेताचेंच असून, तें सर्व एब्रामनें तयार केलेलें होतें. तेथें तीन पायांच्या, बसण्याकरितां केलेल्या, मोठाल्या तिवया बऱ्याच असून, एक लहानसें टेबल होतें. घरांतील एका कोपऱ्यांत एक माच करून त्यावर निजण्याची सोय केली होती. याशिवाय एक तवा, दोन चार लांकडी ताटें व कांहीं लांकडी चाकू व जेवणाचे काटे, एक लोखंडी भांडें व किटली इतकें काय तें त्यांच्या घरांतील सामान होय. अशा घरांत जेम्सच्या बापानें आपला संसार मांडला. या ठिकाणीं सुमारें नऊ वर्षें तो राहिला. तितक्यांत त्यास तीन मुलें झालीं. तो स्वतः शेतवाडी करी व फावल्या वेळीं मजुरीवर जाऊन आपल्या कुटुंबाचें पोषण करी.

त्याचा संसार हळू हळू वाढूं लागला व न्यूबर्ग येथील जागा त्यास पुरेना ह्मणून दुसरे ठिकाणीं जाण्याचा निश्चय करून ऑरेंज संस्थानांत सुमारें पन्नास एकर जमीन त्यानें विकत घेतली. हें ठिकाण न्यूबर्गपासून

एका शेजाऱ्यानें आपल्या घरीं आणिलें व आपल्या मुलांत त्यास वाढवून लहानाचा मोठा केलें.

एब्राम हा आपल्या पालकाचे घरीं रहात असतां, त्यांचे शेजारीं एक विधवा बाई राहण्यास आली. तिला एलिझा नांवाची एक नऊ वर्षांची मुलगी होती. ती फार चलाख व सद्गुणी असून तिच्या बाळपणाच्या वर्तनावरून, ही मोठेपणीं चांगली कर्ती बाई निपजेल, असें पाहणारास तेव्हांच वाटे. या मुलीच्या व एब्रामच्या वयांत एकाच वर्षाचें अंतर असल्यामुळें, तीं दोन्हीं मुलें एके ठिकाणीं खेळत असत व त्यांचें चांगलें जमे; परंतु या दोन मुलांचा सहवास फार दिवस टिकला नाहीं. एलिझाची आई थोड्याच दिवसांत आपलें बिऱ्हाडबाजलें आटपून, ओहिओ संस्थानांत झानेसवली या ठिकाणीं रहावयास गेली व अशा रीतीनें त्या दोन्ही मुलांची ताटातूट झाली.

पुढें एब्राम हा वीस वर्षांचा झाल्यावर, आपण आपला उदरनिर्वाह करावा ह्मणून, आपल्या पालकाचे घराहून निघून, ओहिओ संस्थानांत क्लिव्हल्यांडजवळ असलेल्या न्यूबर्ग या ठिकाणीं आला. त्यावेळीं क्लिव्हल्यांड हें गांव सुमारें शंभर माळसांच्या वस्तीचें ठिकाण होतें व न्यूबर्ग हें त्याहीपेक्षां कनिष्ठ दर्जाचें खेडें होतें. यावेळीं एब्राम हा तरुण, धाडशी व हुशार असून, आपल्या सामर्थ्यानें आपण चांगलें सुखी होऊं अशी त्यास बळकट उमेद असल्यामुळें, तो मुद्दाम या खेड्यांत रहावयास आला होता.

या ठिकाणीं आल्यावर त्यास असें समजलें कीं, एलिझाची आई जवळच झानेसवली या ठिकाणीं राहते. एब्रामची व एलिझाची ताटातूट झाल्यास आज जरी पांच सहा वर्षें झालीं होतीं तरी, त्याचें त्याच्या मैत्रिणीवरील प्रेम किमपिही कमी झालें नव्हतें. असें असल्यामुळें, वेळांत वेळ काढून, त्यांस भेटण्याचे उद्देशानें तो त्यांचे घरीं गेला. तेथें त्याचें चांगलें आदरातिथ्य झालें. एलिझाचे मनांतही एब्रामबद्दल पूर्ण आदर होता. एलिझा ही आतां एकोणीस वर्षांची झाली होती व पाहणाराचें मन सहज वेधेल असें

तिचें रूप व गुण असल्यामुळें, तिला पाहतांच एब्राम यास साहजिकच आनंद झाला. या दोघांत लहानपणापासूनच अत्यंत प्रेम होतें व यावेळीं त्यास निराळें रूप प्राप्त झालें. फार पाल्हाळ न करितां थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे त्यांचें एकमेकांवर मन बसून, पुढें दोन वर्षांनीं सन १८०१ च्या फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या तारखेस त्यांचा विवाह झाला. लग्न होतांच एब्राम आपल्या बायकोस घेऊन न्यूबर्ग येथें आला. या ठिकाणीं एब्रामनें घरदार केलें होतें. त्याचें घर वीस फूट लांब व आठरा फूट रुंद असून, त्याच्या भिंती लांकडाच्या ठोकळ्यांच्या केलेल्या होत्या. खरें ह्मटलें तर हें घर अगदीं गरीबीचें होतें, तरी त्यांत रहाणाऱ्या जोडप्याचें एकमेकांवर निष्कपट प्रेम असल्यामुळें, त्यास ती झोंपडी राजवाड्यांपेक्षांही अधिक आनंददायक झाली. वर दिलेल्या घराच्या क्षेत्रफळावरून, त्यास स्वैपाकघर, माजघर, निजावयाची खोली मिळून सारें एकच दालन होतें हें निराळें सांगणें नको. त्या घराला खिडक्या ह्मणजे भिंत करितांना कांहीं ठिकाणीं राखलेलीं भोकें होत. त्यास कांचाऐवजीं मेणवलेले कागद चिकटविलेले होते; त्यामुळें आंत वारा न येतां थोडा फार उजेड पडत असे. घरांत सामान ह्मटलें तर बेताचेंच असून, तें सर्व एब्रामनें तयार केलेलें होतें. तेथें तीन पायांच्या, बसण्याकरितां केलेल्या, मोठाल्या तिवया ऱ्याच असून, एक लहानसें टेबल होतें. घरांतील एका कोपऱ्यांत एक माच करून त्यावर निजण्याची सोय केली होती. याशिवाय एक तवा, दोन चार लांकडीं ताटें व कांहीं लांकडी चाकू व जेवणाचे काटे, एक लोखंडी भांडें व किटली इतकें काय तें त्यांच्या घरांतील सामान होय. अशा घरांत जेम्सच्या बापानें आपला संसार मांडला. या ठिकाणीं सुमारें नऊ वर्षें तो राहिला. तितक्यांत त्यास तीन मुलें झालीं. तो स्वतः शेतवाडी करी व फावल्या वेळीं मजुरीवर जाऊन आपल्या कुटुंबाचें पोषण करी.

त्याचा संसार हळू हळू वाढूं लागला व न्यूबर्ग येथील जागा त्यास पुरेना ह्मणून दुसरे ठिकाणीं जाण्याचा निश्चय करून ऑरेंज संस्थानांत सुमारें पन्नास एकर जमीन त्यानें विकत घेतली. हें ठिकाण न्यूबर्गपासून

सुमारें सतरा मैल लांब होतें. हीच जागा एब्रामनें पसंत करण्याचें दुसरें कारण असें होतें कीं, त्याचे बायकोची बहीण ज्या गृहस्थास दिली होती त्यानेंही तेथेंच जमीन खरेदी केली होती व ह्या दोन्ही कुटुंबांचा त्याठिकाणीं बरोबर जावयाचा बेत ठरला होता. त्याप्रमाणें पहिल्यानें त्यांनीं एक खोपट बांधलें व त्यांत दुसरें घर तयार होईपर्यंत तीं दोन्हीं कुटुंबें एकत्र राहूं लागलीं. पुढें थोडेच दिवसांनीं दुसरेंही घर तयार झालें. या दोन खोपटांपासून सुमारें सात आठ मैलांवर दुसरी वस्ती होती. तेव्हां उत्तर अमेरिकेंत बहुतेक खेड्यापाड्यांतील वस्ती अशीच असे. प्रत्येकजण ऐपतीप्रमाणें रानांतील पांच पन्नास एकर जमीन घेई व त्या ठिकाणीं घरदार करून शेतवाडी करण्याच्या उद्देशानें राहत असे व त्यामुळें सहजींच एका घरापासून दुसरें घर लांब असे.

इ. स. १८३० च्या आरंभींच एब्राम हा या नव्या ठिकाणीं रहावयास आला. एब्रामनें या ठिकाणीं बांधलेलें घर पूर्वीच्या घरापेक्षां मोठें व चांगलें होतें. तें तीस फूट लांब व वीस फूट रुंद असून, पुढच्या बाजूस बारा पंधरा फूट उंच होतें. त्याच्या भिंती ओंडे पाचरींनें एकमेकांवर बसवून केलेल्या असून, भिंतींमधील फटी चिखलानें बुजवून काढल्या होत्या. घरास एक धुराडेंही होतें. त्यांतील जमिनी ठोकळे जमीनींत बसवून केलेल्या होत्या. घराला एक लहानसा पोटमाळा होता व त्यावर मुलांची निजण्याची सोय केली होती. घरास दरवाजा एकच असून, उजेड यावा ह्मणून तीन चार खिडक्या होत्या. या घरांत १८३१ च्या नवेंबर महिन्याचे १९ वे तारखेस जेम्स याचा जन्म झाला.

भयाण रानांत ओशीक असलेल्या जमिनी घेऊन तेथें वसाहत करणें हें काम कांहीं सोपें नाहीं. वसाहत करणारास जे श्रम पडतात ते कल्पनेनें समजणें अशक्य आहे. मोठमोठीं झाडें तोडून जमीन साफ करणें, तेथें राहण्याकरितां घर बांधणें, जमीन नांगरणें, लागवड करणें वगैरे हरएक कामें एकट्यास करावयाचीं असतात व तीं सर्व उरकण्यास चांगलाच सामर्थ्यवान् मनुष्य असावा लागतो. जेम्सचा बाप हीं सर्व कामें करण्यास लायक

माणूस होता. तो सशक्त, उंच व देखणा पुरुष होता. वसाहत करण्याच्या कामीं अवश्य लागणारे उत्साह, धाडस व बल हे तिन्ही गुण त्यांत पूर्णपणें वसत होते. शरीरबलाप्रमाणें त्याचें मानसिक बलही चांगलेंच होतें व अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली असती तर, खात्रीनें त्यानें नांव काढलें असतें. परंतु कालमानाप्रमाणें कुटुंबापेक्षां जास्त महत्त्वाची अशी दुसरी गोष्ट त्यास न वाटून, कुटुंबपोषण आनंदानें होऊन, सुखासमाधानांत काळ घालवितां येईल असाच धंदा व ठिकाण त्यानें पतकरिलें; आणि पैशाची अगर कीर्तीची हांव न धरितां त्याठिकाणीं तो सुखांत नांदत होता.

अशाप्रकारें तो आपलें आयुष्य आनंदांत घालवीत असतां, रानांत वणवा लागल्याची आरोळी त्याचे कानीं आली. वसाहत करणाऱ्या लोकांवर नानाप्रकारचीं संकटें वारंवार येत व जवळपास वेळीं मदत करण्यास कोणी नसल्यामुळें, त्यांतून निभावणें फार कठीण असे. लांडगे, अस्वलें वगैरे हिंस्र जनावरें, अडाणी रानटी लोक यांपासून त्यांस फार त्रास होई. अशाच आकस्मित संकटांपैकीं रानांतील वणवे हें एक संकट असे. उन्हाळ्यांत तर वणवे वारंवार लागत आणि ते सर्व रानभर पसरून, बराच प्रदेश जळून खाक होई कधीं कधीं तर या भयंकर वणव्यांच्या योगानें गरीब बिचाऱ्या वसाहत करणारांचीं खोपटें व लाविलेलीं पिकें जळून जात आणि तीं अगदीं उघडीं पडत.

वणव्याची बातमी कळतांच त्यानें त्या बाबतींत बराच शोध केला; तेव्हां त्यास कळून चुकलें कीं, ही धाड खात्रीनें आपल्या घराकडे येणार. तेव्हां तात्डतोब आपल्या मुलास व मुलीस बरोबर घेऊन वणवा आपल्या आवारांत न येईल अशी तजवीज करण्याकरितां तो घराबाहेर पडला.

वणव्याचा प्रतिकार करण्याचें काम ह्मणजे कांहीं लहानसहान नव्हतें. भरउन्हांत सुमारें दोन तास कसून काम करून वणवा आपल्या आवारांत न येईल अशी त्यानें तजवीज केली. वणव्यापासून आतां धास्ती नाहीं असें त्यास खात्रीनें वाटल्यावर, घरापुढील आंगणांत एक तिवई टाकून, तीवर स्वस्थपणें तो मोकळी हवा खात बसला. वणवा

विझविण्याचे कामीं त्यानें इतके श्रम केले होते कीं, त्याचें रक्त अगदीं तापून गेलें होतें व त्यामुळें मोकळ्या हवेनें त्यास समाधान झालें. परंतु अति श्रम पडल्यामुळें, आपली प्रकृति तापली आहे, सर्व आंगास घाम आला आहे, तेव्हां उघड्या हवेंत बसल्यास प्रकृतीस इजा पोंचेल, ही गोष्ट त्यावेळीं त्याचे लक्ष्यांत आली नाहीं व तेथें तो बराच वेळ हवा खात बसला.

त्याच दिवशीं रात्रीं त्यास दुखण्यानें पछाडलें. आतां अशा या रानांत वैद्य कोठून मिळणार ? परंतु जवळ रहाणाऱ्या एका गृहस्थास वैद्यकीचें कांहीं ज्ञान होतें, त्यास ताबडतोब बोलावून आणलें व त्याच्या धोरणानें रोग्याची शुश्रूषा सुरू झाली. त्या गृहस्थानें आपल्या माहितीप्रमाणें अनेक उपाय केले आणि एलिझानें जीवापाड श्रम करून रोग्याची चाकरी केली; परंतु त्याचा कांहीं उपयोग न होऊन, रोगी अधिकाधिक खंगत चालला व मरणाच्या पंथास लागला. मरतांना एब्रामची नजर त्याचे भोंवतालीं बसलेल्या त्याचे मुलांकडे जाऊन, तो आपल्या बायकोस ह्मणाला " एलिझा, या अरण्यांत मीं हीं लहान चार झाडें लावलीं आहेत आणि तीं आतां तुझ्या हवालीं करून जाणें मला भाग पडत आहे. " इतके शब्द बोलून त्यानें प्राण सोडला.

त्या अनाथ अबलेवर व पोरांवर हा जो प्रसंग गुदरला त्याचें वर्णन कोण करील बरें ? एलिझाचें लग्न झाल्यापासून, तिला दुःख कशाला तें आजपर्यंत माहीत नव्हतें. आजदिनपर्यंत तें कुटुंब मोठ्या आनंदांत होतें; परंतु काळानें त्यावर आज केवढा दुर्धर प्रसंग आणला आहे. ' दहा मरावीं पण दहांचा पालनवाला मरूं नये ' ह्मणून जें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. या घटकेपावेतों जेम्सच्या आईस कसलीही काळजी नव्हती; परंतु एका क्षणांत सर्व कांहीं बदलून गेलें. एका घटकेपूर्वीं ती जितकी आनंदी होती त्याच्या शतपट ती आतां दुःखी झाली. सर्व कुटुंबपोषणाचा भार आतां तीवर पडला. अशा वेळीं तिच्या मनाची अवस्था काय झाली असेल ! यावेळीं जेम्स हा सुमार अठरा महिन्यांचा होता. इतक्या लहान वयांत आपल्या आईवर व आपणां सर्वांवर काय प्रसंग ओढवला आहे याची त्यास साहजिकच कल्पना नव्हती व अशी स्थिति होती हेंच बरें होतें.

असो. तदनंतर आठ दहा कोसांवर जे काय शेजारीपाजारी होते ते जमले व त्यांच्या मदतीनें एब्रामचा अंत्यविधि पार पडला. तेथें त्या रानांत ख्रिस्ती धर्माच्या रिवाजाप्रमाणें उपाध्या कुठला व प्रार्थना कुठली ? दुःखानें होरपळलेलीं माणसें हेच उपाध्ये व तीं मनांतल्या मनांत करीत असलेला ईश्वरस्तव हीच प्रार्थना. वाचकहो ! तुह्मांला काय व कोणाला काय, त्यावेळची स्थिति अतर्क्य आहे. निबिड अरण्यांत आपल्या अत्यंत प्रीतीचा माणूस मरणें, नंतर त्याचा अंत्यविधि करावा लागणें व तो करीत असतां करणारांची काय स्थिति होत असेल, या गोष्टी ज्यांवर तसा प्रसंग आला असेल ते अनुभवीच जाणोत, इतरांस त्यांची कल्पना होणेंच कठीण. आतां असे धक्के बसून, पुढें बरींवाईट कामें करण्याकरितां माणसें जगतात हा सर्व ईश्वरी मायेचा खेळ आहे व त्याप्रमाणें ती अनाथ अबलाही जगली; परंतु, त्या घटकेस तिच्या चेहऱ्यावर जी दुःखाची कळा आली होती, ती मरेपर्यंत तशीच कायम होती.

मनुष्याच्या आयुष्यामध्यें त्यावर सुखदुःखाचे बरे वाईट प्रसंग येत असतात व त्यांत त्याच्या कर्तबगारीची पारख होत असते. जेम्सच्या आईवर गुदरलेला प्रसंगही तसाच होता. तिची यावेळची स्थिति मोठी विलक्षण होती. तिचें सर्व सामर्थ्य आतां कसोटीस लागावयाचें होतें. एब्राम वारला तेव्हां हिंवाळा सुरू होता. अमेरिकेंतील हिंवाळा व इकडील हिंवाळा यांत जमीनअस्मानाचें अंतर. जिकडे तिकडे बर्फ पडलें होतें. रानांत मोठमोठालीं वादळें होत होतीं. हिंस्र पशूंच्या आरोळ्या नेहमीं कानीं पडत व अशा प्रसंगीं त्या गरीब मुलांचा पालनवाला गत झालेला ! श्रम करावे व पोटाला खावें ही स्थिति, तेव्हां घरांत पैसा कोठून असणार ? सारांश, अशावेळीं मोठ्या धीराचा माणूसही कचरून जावयाचा, तेथें त्या निराश्रित अबलेचा काय पाड ? त्यांना तर असें खास वाटूं लागलें कीं, हिंवाळा सरून येणारा वसंत पाहण्यास आपण जगतच नाहीं. परंतु ईश्वरी संकेत तसा नव्हता. बर्फ वितळूं लागलें, झाडेंझुडपें पुन्हां तजेलदार दिसूं लागलीं व त्या बाईच्या अंतःकरणांत आशेचा अंकुर फुटूं लागला. परंतु घरांत पैसा

मुळींच नव्हता. लोकांचें देणें झालेलें, त्यांच्या मागण्यावर मागण्या येऊं लागल्या. घरांतील धान्यही सरत आलेलें व कांहीं दिवसांनीं अन्नान्न करून मरण्याची पाळी. तेव्हां अशा प्रसंगीं त्या अनाथ मातेनें पोरांचें संरक्षण कसें करावें बरें !

मागें सांगितलेंच आहे कीं, या गार्फील्ड कुटुंबाबरोबर गार्फील्ड बाईचा मेहुणाही त्यांच्या शेजारींच जागा घेऊन, राहण्यास आला होता; व या संकटसमयीं गार्फील्ड बाईस कळकळीनें मदत करणारा व मसलत देणारा काय तो तेवढाच शेजारी होता. एमॉस बॉयनूटन हें त्या शेजाऱ्याचें नांव. गार्फील्ड बाईनें त्याची गांठ घेतली व " आतां पुढें काय करावें ? " ह्मणून त्यास प्रश्न केला. तो ह्मणाला " चार पांच कच्चींबच्चीं संभाळून, तुमच्यासारख्या निराश्रित बाईनें असली ही शेतवाडी संभाळून रहाणें अशक्य दिसतें. माझ्या मतें तुह्मीं आपली इस्टेट विकावी व आपल्या मित्रमंडळींत जाऊन रहावें हें चांगलें. याशिवाय मला तर दुसरी तोड दिसत नाहीं. "

गार्फील्ड बाईः—आणि मीं आपल्या मृत पतीचें थडगें येथेंच टाकून जावें होय ? नाहीं; तें तर माझ्यानें कालत्रयीं होणार नाहीं.

एमॉस बॉयनूटनः— तर मग काय करणार ?

या प्रश्नावर तिनें आपल्या सर्व परिस्थितीचा खोल विचार करून उत्तर दिलें कीं, " तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें सर्व कांहीं विकलें, कर्ज वगैरे सर्व देऊन सग्यासोयऱ्यांकडे जाण्यास लागणारा सर्व खर्च केला, ह्मणजे मजजवळ पै देखील राहणार नाहीं. याशिवाय सोयऱ्याधायऱ्यांच्या जिवावर आपण रहावें हें तर मला मुळींच पसंत नाहीं. माझ्या प्रिय पतीनें ही इस्टेट करण्यास आपला जीव खर्चीं घातला आहे आणि या घरांतील लहानसा लांकडाचा तुकडाही मला इतका प्रिय आहे कीं, जणूं काय माझे पतीनें मजजवळ ही एक ठेवच ठेवली आहे व तिला जिवापलीकडे जपणें हें मला माझें मुख्य कर्तव्य वाटतें. "

या चार शब्दांत त्या थोर बाईचें अंतःकरण सर्वस्व भरलेलें आहे. हें तिचें धैर्य पाहून त्या शेजाऱ्यास फार आश्चर्य वाटलें व त्याचे डोळ्यांस

पाणी आलें. नंतर तिच्या बोलण्यावर तो ह्मणाला " तर मग, कांहीं झालें तरी शेतवाडी विकावयाची नाहीं असा तुमचा मानस दिसतो. "

" तसें कसें चालणार ? कर्ज फेडण्याकरितां त्यांतील कांहीं विकलीच पाहिजे. "

" हो खरेंच. ही कल्पना माझे मनांत मुळींच आली नाहीं. बरं, या गोष्टीचा तुह्मी नीट विचार करा व मीही पाहतों. "

इतकें बोलून मिस्तर बॉयन्टन गेले. तो जातांच गार्फील्ड बाई घरांतील एका कोपऱ्यांत गेली व तेथें तिनें ईश्वराचा धांवा आरंभिला. " परमेश्वरा, या संकटसमयीं तूंच माझा त्राता आहेस व माझी अबलेची सर्व भिस्त काय ती तुजवर आहे. तेव्हां या दीन दासीस कर्तव्य कोणतें तें स्पष्ट दाखवून, तें पूर्णपणें बजावण्यास शक्ति दे. " याप्रमाणें मनोभावें ईश्वराचा धांवा केल्यावर, तिला चांगला धीर आला. कोणतेंही संकट येवो, कसलेंही दुःख होवो, तिची नेहमींची पद्धत अशीच होती. अगोदर ईश्वराचा धांवा करून त्याचें अनुमोदन घ्यावयाचें व नंतर कार्यास लागावयाचें. दृढ निश्चय व ईश्वरचरणीं भाव असल्यावर भक्ताचें सांकडें ईश्वर कां बरें निवारण करणार नाहीं ?

याप्रमाणें प्रार्थना आटपल्यावर तिनें आपला मोठा मुलगा थामस यास जवळ बोलाविलें. थामस यास नुकतेंच कुठें अकरावें वर्ष लागत होतें; परंतु घरांत पुरुष माणूस काय तो तोच असल्यामुळें जशी एखाद्या पोक्त माणसास सर्व हकीकत सांगतात तद्वत् आपली सर्व स्थिति तिनें त्यास निवेदन केली. तें सर्व ऐकून घेऊन, तो धीरोदात्त मुलगा ह्मणाला " आई, मीजमीन नांगरीन, शेत लावीन आणि जें पडेल तें काम करीन. तूं अगदीं काळजी करूं नको. लांकुडफाटे आणणें, गाईचें दूध काढणें वगैरे अनेक कामें करून, तुला मी चांगली मदत करीन. "

" बाळा, इतकीं सर्व कामें करण्यासारखा अद्याप तूं मोठा झाला नाहींस तरी, कांहीं मी व कांहीं तूं मिळून सर्व कांहीं आपण कसं बसं तरी करूं. ईश्वर अनाथांचा पाठीराखा आहे व तो आपणांस कसलीही अडचण पडूं

देणार नाहीं व अशा रीतीनें आपण धीरानें वागल्यास आपलें घरदार विकून जाण्याची आपणांस जरूर पडणार नाहीं असें मला वाटतें."

"नाहीं, नाहीं. आपणांस घरदार विकून जाण्याची मुळींच जरूर नाहीं, मला देखील येथून जावेंसें वाटत नाहीं आणि आई, मी खरोखर सांगतों, मी अगदीं मनापासून काम करीन."

याप्रमाणें मायलेंकरांचें ठरून इस्टेट विकून जावयाचें नाहीं असें ठरलें. गार्फील्ड बाईनें आपल्या जमिनीपैकीं कांहीं जमीन विकावयास काढली व तिला गिऱ्हाईकही लवकर आलें. जमीन विकून आलेल्या पैशानें तिनें आपलें सर्व कर्ज फेडलें व एकदांची ती ऋणमुक्त झाली.

जमीन वगैरे विकून ती मोकळी होत आहे तोंच, शेतवाडी लावण्याचा हंगाम आला व त्या कामावर तीं मायलेंकरें लागलीं. थामसनें शेजाऱ्याचीं जनावरें नांगरणीकरितां मागून आणलीं व बटाटें, गहूं, कांहीं भाजीपाला व धान्य लावण्याकरितां त्यानें जमीन नांगरून तयार केली. सकाळपासून सायंकाळपावेतों त्या लहान मुलास शेतांत खपतांना पाहिलें ह्मणजे पाहणारास मोठें नवल वाटे. या लहान आकरा वर्षांच्या मुलानें कोणाची विशेष मदत न घेतां, पेरणी व आंवणी मोठ्या उत्तम तऱ्हेनें शेवटास नेली.

घराभोंवतालच्या ज्या जागेंत ही लावणी केली होती, तिला थोडेंबहुत कुंपण एब्राम जिवंत असतांच त्यानें केलें होतें व बाकीचें त्या मायलेंकरांनीं जिवापाड मेहनत करून पुरें केलें. याप्रमाणें शेताची चांगली निगा होऊं लागल्यामुळें तेंही उत्तम तऱ्हेनें वाढूं लागलें. आतां सर्व कांहीं ठीक चाललें होतें, तों एक नवीनच संकट उभें राहिलें. घरांतील धान्य अगदीं सरत आलें व नवीन धान्य तयार होईपर्यंत तरी तें पुरतें कीं नाहीं याची शंका वाटूं लागली. तेव्हां त्या धैर्यवान् बाईनें मुलांस सुगावा लागूं न देतां, दिवसांत एकवेळ जेवणाचा क्रम ठेवून नवें धान्य तयार होईपर्यंतची अडचण मोठ्या नेटानें काढून नेली. ह्या १८३४ च्या उन्हाळ्यांत गार्फील्ड बाईवर जशीं संकटें आलीं तशी संकटें वसाहत करणाऱ्या लोकांवर क्वचितूच येत असतील व अशा संकटांतून तें कुटुंब बाईच्या अलोट धैर्यानें व ईश्वरी कृपेनें पार पडलें; नाहींतर ओहिओ संस्थानांत या कुटुंबाचें नांवही राहिलें नसतें.

असो. अशाप्रकारें विपत्तीचे दिवस जाऊन, त्या कुटुंबास सुखाचे दिवस दिसूं लागले. कापणीचा हंगाम आला व शेतांत पीकही उत्तम आलें होतें. त्या अनाथ अबलेनें धारलेल्या बेतांत यश आलें. ' अनाथाच्या गाई देव राखी ' ह्या ह्मणीचा तिला पूर्ण अनुभव आला. ईश्वरानें आपला धांवा ऐकून, संकटांत आपणास हात दिला हें पाहून, तीस फार आनंद झाला व त्या कृतज्ञ बाईनें ईश्वराची वारंवार प्रार्थना केली. घरांत आतां धान्याची विपुलता झाली व इतःपर त्या कुटुंबास अन्नवस्त्राची वाण कधींच पडली नाहीं.

पावसाळा सरून परत हिंवाळा आला. उत्तर अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांचे कांहीं भागांत थंडी अशी कडक पडते कीं, बरेच दिवस जमीन बर्फानें आच्छादून जाते व जोड्याखेरीज अनवाणी चालण्याची मुळींच सोय नसते. जेम्स आतां सुमारें तीन साडेतीन वर्षांचा झाला होता. तो जात्याच चपळ असल्यामुळें, साहजिकच इकडे तिकडे हिंडे; परंतु हिंवाळ्यांत त्यास जोडा नसल्यामुळें, तो घराबाहेर जाऊं नये ह्मणून, गार्फील्डबाईस फार जपावें लागे. अगोदर अशा रानांत जोडा मिळणें कठीण व त्यांत त्या बाईची गरीबी. घरांतील सर्व मोठ्या माणसांस जोडे असण्याची मारामार, तेव्हां लहान मुलांस ते कोठून असणार ? परंतु थामसला आतां शेजारींपाजारीं मजुरी मिळूं लागली होती. आपल्या आईस जेम्सला बर्फांत जाऊं न देण्याकरितां किती त्रास घ्यावा लागतो व त्यास जर एक जोडा करवितां आला तर तिचा त्रास चुकून, त्यासही फार आनंद होईल. हे विचार पूर्वींपासूनच थामसचे मनांत येत. कामावर जाऊं लागल्यापासून हे विचार तर त्याचे मनांत नेहमीं घोळत असत. मजुरीचे पैसे पहिल्यानें हातांत पडतांच, तो मुलगा धांवत धांवत घरीं आला आणि आईचे हातांत पैसे देऊन ह्मणाला " आई, आतां आपल्या जिमीला ( जेम्सचें लाडकें नांव ) जोडा घेतां येईल, नाहीं बरें ?

" हो, घेतां येईल बरं; आणि तूं जिमीला पाहिला जोडा घेतलास ह्मणून तो तुझा फार आभारी होईल. "

" आई, खरं ह्मटलं तर त्यास जोडा कधींच ध्यावयास पाहिजे होता; पण काय करूं ? इतके दिवस मला कांहीं उपायच सुचेना. नाहींतर जोडा कधींच आणला असता. "

वाचकहो, याला ह्मणावें बंधुप्रीति. आपल्या लहान भावाची हौस आपणास पुरवितां आली याबद्दल त्या मुलास किती आनंद वाटत होता बरें ! त्याचप्रमाणें आपल्या आईस सुख देण्याकरितां तो किती झटत होता बरें ! याप्रमाणें जेम्सला पहिला जोडा प्राप्त झाला व त्याची स्वारी जिकडे तिकडे हिंडूं लागली. या जोड्याच्या प्राप्तीनें त्यास त्यावेळीं जो आनंद झाला त्यापुढें, पुढें तीस वर्षांनीं तो उत्तरअमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या राजकारणी सभेंत सभासद ह्मणून निवडून आला त्यावेळीं झालेला आनंद कांहींच नव्हे. खेड्यापाड्यांत आणि त्यांतून जेम्सएवढ्या मुलाला पायांत घालण्यास जोडा मिळणें ह्मणजे किती धन्यतेची गोष्ट आहे, हें कल्पनेनें समजणें कठीण, तें समजण्यास अनुभवच पाहिजे.

येथवर जेम्सच्या आईबापांबद्दल व त्याच्या स्थितीबद्दल थोडक्यांत वर्णन केलें. आतां पुढील भागांत जेम्सच्या बाळपणाच्या हकीगतीकडे वळूं.

---

# भाग २ रा.

## बाळपण व विद्याभ्यास.

जेम्सचा बाप जिवंत असतां, घडलेली एक गोष्ट सांगून, नंतर पुढील हकीगतीकडे वळूं. एब्रामच्या मरणापूर्वीं कांहीं दिवस तो प्लूटार्क यानें केलेलं ' थोर पुरुषांचीं चरित्रें ' हें पुस्तक वाचीत होता. तें वाचीत असतां एकदां त्याच्या मांडीवर जेम्स बसला होता. यावेळीं जेम्सचें वय सुमारें वर्षाचें असेल आणि तो नुकताच कोठें ' आई, बाबा ' वगैरे थोडें थोडें बोलूं लागला होता. " प्लुटार्क ह्मण " ह्मणून त्यास बापानें सांगितलें आणि

त्यानें तो शब्द स्पष्ट उच्चारला. " पुन्हां ह्मण बघूं " असें तो त्यास ह्मणाला व जेम्सनें तो शब्द तितक्याच स्पष्टपणें पुन्हां उच्चारला. हें पाहून एब्रामनें आपल्या बायकोस हांक मारिली व तो तीस ह्मणाला " हें बघ, मी तुला खात्रीनें सांगतों कीं, हा मुलगा पुढें मागें मोठा विद्वान् निपजेल, " व त्याप्रमाणें पुढें झालेंही, हें निराळें सांगणें नको.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें गार्फील्ड कुटुंबाचे विपत्तीचे दिवस संपून, तें थोड्याफार सुखांत काळ घालवीत असतां, जवळच दीड मैलावर एक शाळा निघणार आहे अशी बातमी उठली व त्याप्रमाणें आठपंधरा दिवसांत ती निघालीही. यावेळीं थामस हा सुमारें तेरा वर्षांचा झाला होता. तो आपल्या आईस ह्मणाला " आई, जिमीला शाळेंत जाण्यास मला कांहीं अडचण दिसत नाहीं. " त्यावर त्याची आई ह्मणाली " हो, तो जाईल आणि मला वाटतं तूं देखील जावंस. "

थामस मोठा विचारी मुलगा होता. त्यानें हे आपल्या आईचे शब्द ऐकून उत्तर केलें " आई, मला देखील जावंसं वाटतं; पण बटाटे खणून काढणें, शेताची कापणी करणें वगैरे कामें मी शाळेंत जाऊं लागल्यास कशीं उरकतील बरें ? मला वाटतें जिमीनें व मुलींनीं शाळेंत जावें व मीं खपून उदरनिर्वाहाची सोय लावावी. " हे शेवटले शब्द त्या मुलानें इतक्या अंतःकरणापासून उच्चारले कीं, आंगमेहनतीनें शेतवाडी करून, कुटुंबाचें पोषण आपण करावें व आपल्या भांवडांनीं शाळेंत जाऊन शिकावें यांतच त्यास आनंद आहे असें दिसलें. त्याचे आईस तर या स्वार्थत्यागी मुलास कोठें ठेवूं आणि कोठें नाहीं असें होऊन गेलें; परंतु ती बाई विचारी असल्यामुळें, तिनें आपल्या मनाची वृत्ति पूर्णपणें आपल्या मुलाच्या नजरेस येऊं न देतां, प्रसंगास साजेल अशा शब्दांनीं त्या गोष्टीस अनुमोदन दिलें.

याप्रमाणें मुलींना व जेम्सला शाळेंत पाठविण्याचें ठरलें. मुलींना शाळा ह्मणजे अगदीं नवीच होती असें नाहीं. नव्या घरांत राहण्यास येण्यापूर्वीं त्या शाळेंत जात असत. जेम्सला मात्र शाळा अगदीं नवीनच होती. तो जवळ जवळ चार वर्षांचा झाला होता तरी, गार्फील्ड बाईनें

ह्मणजे त्यास घरीं कांहीं विशेष श्रम घेऊन शिकविलें होतें असें नाहीं. तिला अगोदर तसें करण्यास वेळच मिळत नसे व जो काय थोडा वेळ सांपडे त्यांत त्यास काय थोड्याशा देवाधर्माच्या गोष्टी तिनें शिकविल्या असतील तेवढ्याच; परंतु तितक्याच त्यास उत्तम प्रकारें येत होत्या. त्याची स्मरणशक्ति फार विलक्षण होती व स्वभावतःच तो असा कांहीं चपळ व हुशार मुलगा होता कीं, त्या घरांतील सर्वांस तो एक विरंगुलाच होता. आईस आपला मुलगा मोठा हुशार आहे असें वाटे व तसें तीस वाटणें हें साहजिकच आहे; कारण, कोणत्या आईला आपलीं मुलें ह्मणजे वेडीं आहेत असें वाटत असतें ? परंतु जेम्स यास हुशार मुलगा ह्मटलें हें फक्त त्याच्या आईच्या मतावरून नव्हे तर, एकंदर शेजारीपाजारीही तसेंच ह्मणत असत.

जेम्स यास शाळेंत धाडण्याचें ठरलें; परंतु तसें करण्यास एक मोठी अडचण होती. ती ही कीं, शाळा दीड मैल लांब होती. इतकें चालत जाणें जेम्ससारख्या चार वर्षांच्या मुलास अवघड होतें. पण ही अडचण सुद्धां दूर झाली. त्या एकंदर बहीणभावंडांचें प्रेमच अवर्णनीय होतें. त्याच्या एका बहिणीनें त्यास पाठींगळीस मारून नेण्याचें पतकरिलें व अशारीतीनें जेम्सच्या झोंपड्यापासून राजमंदिरापर्यंतच्या प्रवासास सुरवात झाली.

गार्फील्डबाई सायंकाळीं कापूस पिंजीत बसली होती, तों शाळा सुटून मुलें घरीं आलीं. त्यावेळीं अमेरिकेच्या त्या भागांत गिरण्या मुळींच नव्हत्या. नवीन वसाहत करणाऱ्या लोकांस कपडे तयार करण्याची माग वगैरे सर्व सामग्री जवळ बाळगावी लागे व त्याप्रमाणें गार्फील्डबाईजवळही ही सर्व सामग्री होती. घरांतील मुलाबाळांस लागणारे कपडे करण्याकरितां सूत काढून ती हातमागावर कापड तयार करी.

" अहाहा ! आजचा आमचा वेळ किती मौजेनें गेला ह्मणून सांगूं ! " असें मेहेटाबेल नांवाची मुलगी घरांत येतांच ह्मणाली.

तिची बहीण मोठ्या उत्साहानें ह्मणाली " शाळेंत एकवीस मुलें जमलीं आहेत. स्यांडर साहेबांचीही मुलें शाळेंत येतात व त्यांना तर आमच्या दुप्पट शाळा लांब पडते. "

गार्फील्ड बाई:-बरं, जिमीला शाळा कशी काय आवडली ?

मेहेटाबेल:—हो, त्यास सुद्धां आवडली. त्यानें सर्व मुळाक्षरें ह्मटलीं व मास्तरांना विचारिलें " हें अक्षर ' आर ' असें तुह्मांला कसें समजलें ? "

मुलें घरीं आलीं असें पाहून, थामस हातांतील काम तसेंच टाकून नुकताच घरांत शिरत होता. त्याचे कानीं हे वरील शब्द आले व त्यास हंसूं कोसळलें. तो हंसत हंसत ह्मणाला " ठीक, मास्तरांना तरी जेम्सच्या प्रश्नांस उत्तर देणें हें एक कामच झालें असेल; आणि मग मास्तरांनीं काय सांगितलं ? "

मेहेटाबेल:—ते ह्मणाले " मी तुझ्याएवढा होतों तेव्हां हें अक्षर ' आर ' असें मी शाळेंत शिकलों. "

याप्रमाणें बोलणीं चाललीं असतां, थामस जेम्सला हातांत घेऊन, खेळवीत होता. तो त्यास ह्मणाला " जिमी, तुला तुझा घोडा कसा काय आवडला ? "

" मला चांगला आवडला " असें जेम्सनें बोबड्या शब्दांनीं उत्तर दिलें.

मेहेटाबेल:—मला सुद्धां कांहीं फारसा त्रास पडला नाहीं; आणि घरीं येतांना तर तो थोडेंसें चालला देखील.

थामस:—शाळेंत हा स्वस्थ तरी बसला होता का ? "

" हो, एकदां मात्र समोरच्या मुलाशीं ओळख काढण्याकरितां जागेवरून उठला होता. "

" मग मास्तर काय बोलले ? "

" त्यांनीं त्याचा हात धरला व हंसत हंसत त्याला आमच्या जवळ आणून बसविलें व ते ह्मणाले " प्रत्येक मुलानें आणि मुलीनें त्याला नेमून दिलेल्या जागेवर बसावें व तेथून हलूं नये. "

" बरं मुलांनों, तुह्मांस शाळेंत जाण्यास हौस वाटते हें पाहून मला फार आनंद होतो " असें गार्फील्ड बाई ह्मणाली " आणि या आलेल्या संधीचा तुह्मी चांगला उपयोग करून घ्या. अशा रानांत शाळेचा फायदा आपणांस नेहमीं मिळावयाचा नाहीं; तेव्हां मुळींच शाळेचा नसण्यापेक्षां जी

काय थोडे दिवस असेल तींत आपला फायदा करून घेणें चांगलें."

त्यावेळीं अशा रानटी प्रदेशांतील शाळा अगदीं निकृष्ट स्थितींत असत व त्याही वर्षांतून कांहीं दिवस भरत. शिक्षकाचा धंदा करणारे लोक आपल्या कामांत बेताचेच वाकब असून, शाळा लांब असल्यामुळें, मुलें ह्मणजे नियमित येत, असें नसे. बहुतेक शाळांत लिहिणें, वाचणें, याच गोष्टी शिकवीत व कांहींत लेखनवाचनाशिवाय थोडें थोडें गणित व भूगोल शिकवीत असत. शिक्षक लोक वर्गणी करून ठेवलेले असत व हल्लींप्रमाणें अमेरिकेंत त्यावेळीं लहान मुलांच्या शाळांवर मास्तरणी नसत, तर पुरुषच असत व बायकांस ह्मणजे शिकविण्याचें काम साधेल असें तेव्हां वाटतच नव्हतें.

ज्याठिकाणीं शाळा होती तें एक अगदीं लहान खेडें होतें. शाळा ही लांकडाच्या ठोकळ्यांच्या भिंतीची असून, सुमारें औरस चौरस वीस फूट होती. तिच्या जवळच एक भात भरडण्याची जुनी गिरणी असून, शेजारीं एक ओढा होता.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, जेम्स यास देवाधर्माच्या गोष्टी आई सांगत असे व त्या त्यास चांगल्या येत असत. शाळेंतील मुलें सुट्टीच्या वेळांत बायबल ( युरोपियन लोकांचा धर्मग्रंथ ) मधील कथा त्यास विचारीत. कधीं कधीं त्यास त्यांतील प्रश्न विचारण्यास सांगत व तो कांहीं कांहीं प्रश्न असे विचारी कीं, त्यापेक्षां मोठमोठ्या मुलांना देखील त्यांचीं उत्तरें देतां येत नसत. लहानपणापासूनच त्याची स्मरणशक्ति मोठी तीव्र होती. कोणतीही गोष्ट त्यानें एकदां पाहिलेली असो, ती त्याचे स्मरणांतून फारकरून जात नसे. इतर मुलें जें पाठ ह्मणत तें तो ऐकून ऐकून स्मरणांत ठेवी. स्मरणशक्तीप्रमाणें त्याची अवलोकनशक्तिही चांगली होती. बोलणें, चालणें, रीतिरिवाज, काम करण्याची शैली वगैरे सर्व गोष्टी तो लक्ष्यपूर्वक पहात असे. असें असल्यामुळें इतर मुलांपेक्षां त्याजवळ ज्ञानाचा सांठा विशेष असे व सर्व मुलांस त्याचे संगतीपासून फारच आनंद होई.

जेम्सच्या अंगीं अनुकरणशक्तिही फार विलक्षण होती. अनुकरण करणें

हा त्याचा स्वभावगुणच होता ह्मटल्यास चालेल. त्याच्या पाहण्यांत जसें येई तसें वागावें असें त्यास वाटे व तसें तो करी. तेव्हां असल्या मुलांपुढें चांगलीं उदाहरणें नेहमीं असलीं कीं, त्याचा परिणाम चांगला होणार व अशा मुलांशीं वागतांना जपावें लागतें तें याच बाबतींत. त्यांच्या-पुढें वाईट उदाहरण जर एखादेवेळीं आलें तर, त्याचा त्यांवर फार वाईट परिणाम होतो. असो. जेम्समध्यें ही अनुकरणशक्ति व तिला साह्य करणारी अवलोकनशक्ति पूर्णपणें वसत असल्यामुळें, तो दिवसेंदिवस चाणाक्ष व हुशार बनूं लागला.

पुढें जेव्हां थंडीचे दिवस आले तेव्हां जेम्स शाळेंत जात नसे. तो व त्याचा भाऊ थामस हे घरींच शिकत. अमेरिकेसारख्या थंडीच्या प्रदेशांत हिंवाळ्याचे दिवस ह्मणजे शिकण्यास मोठी सुयस्कर वेळ असते. बाहेर जिकडे तिकडे थंडी व बर्फ पडत असल्यामुळें, घरांतल्या घरांत अभ्यास चांगला होतो. या हिवाळ्यांत जेम्सनें लिहिण्यावाचण्यांत बरीच मजल मारली. अभ्यास चालूं असतां जेम्सचे ठायीं विचारशक्तीचा प्रादुर्भाव मोठ्या विल-क्षण प्रकारानें झाला. एके दिवशीं तो आपलें पुस्तक वाचीत असतां ‘ छप-रावर पाऊस ‘ सडसड ’ आला ’ हें वाक्य त्याच्या वाचण्यांत आलें. हें वाक्य वाचीत असतां ‘ सडसड ’ या शब्दामुळें त्याच्या मनांत अशी कांहीं प्रेरणा झाली कीं, तो एकदम आपले आईस ह्मणाला “ आई, पाऊस कसा येतो हें मला सांगतां येतें ” आणि वरील वाक्य ‘ सडसड ’ शब्दावर विशेष जोर देऊन त्यानें ह्मणण्यास सुरवात केली. ह्यावेळेपासून शब्दांचा खरा उपयोग त्यास कळूं लागला. शब्दांच्या साह्यानें निरनिराळ्या वस्तु व विचार कसे व्यक्त करितां येतात व जगांतील एकंदर व्यापार कागदावर कसे नमूद करावयाचें, हें त्यास समजूं लागलें. आतां जग हें त्यास निराळ्या प्रकारें दिसूं लागलें, ह्मणजे त्याची विचारदृष्टि उघडली. चर्मचक्षूंपेक्षां महत्त्वाचे जे ज्ञानचक्षु त्यांची त्यास यावेळेपासून प्राप्ति झाली. शब्दांच्या योगानें आतां त्यास विचार कळूं लागले आणि शब्द पुस्तकांत असल्यामुळें, पुस्तकें वाचण्याची त्याची इच्छा सहजींच प्रबळ होऊं लागली. याप्रमाणें

सुमारें पांच वर्षांचा असतां, त्यास वाचनाचा नाद लागला व ज्ञानप्राप्ति करून घेण्याचा त्याचा सपाटा सुरू झाला. जेम्सची वाचनाकडे विशेष प्रवृत्ति पाहून, त्याचे आईस जेम्सच्या वडिलांचे शब्दांची वारंवार आठवण होई; परंतु ते खरे कसे होणार याची तीस तिच्या भोंवतालच्या स्थितीवरून मुळींच कल्पना होत नसे; पण यावेळेपासून तिला मात्र पूर्णपणें वाटूं लागलें कीं, कसें तरी करून हा मुलगा पुढें येणार यांत संशय नाहीं.

जेम्स यास शिकण्यास अनुकूल अशी संधि मिळाल्यास तो खात्रीनें पुढें सरसावेल असें जेव्हां गार्फील्ड बाईस वाटूं लागलें, तेव्हां पहिली गोष्ट तिच्या मनांत आली, ती ही कीं, शाळा जी दीड मैल लांब आहे ती जवळ असावी. हा विचार तिचे मनांत बरेच दिवस घोळत होता; परंतु तिनें आतां उचल करून तो आपल्या शेजाऱ्यांस सांगितला व शाळा बांधण्याकरितां आपल्या जागेंत जागा देण्याचेंही तिनें कबूल केलें. तिच्या शेजाऱ्यांसही तो विचार पसंत पडून, त्यांनीं जवळच तिच्या आवारांत शाळा बांधली व अशाप्रकारें त्या बाईचा एक हेतु तडीस गेला.

शाळा शिकविण्यास शिक्षक न्यूह्यामशायरमधून आणण्याचें ठरलें होतें व त्याची जेवणाखाण्याची सोय मुलांचे आईबापांनीं आळीपाळीनें करावी असें ठरलें. शाळागृह पूर्वीच्या शाळागृहाप्रमाणेंच परंतु त्यापेक्षां मोठें होतें. सुमारें पंचवीस मुलें शाळेंत बसतील इतकी जागा असून, त्यांस बसण्यास बांकें केलीं होतीं. बॉयन्टनसाहेब व गार्फील्डबाई ह्यांचीं मिळूनच सुमारें १० मुलें होतीं व कांहीं जवळपासचीं यावयाचीं होतीं.

थामस यानें आपणांस आपले भावंडांबरोबर शाळेंत जाण्यास सांपडावें ह्मणून, शेताची कापणी करणें, लांकुडफाटे जमवणें व अशींच दुसरीं अनेक कामें आईच्या व बहिणींच्या मदतीनें दिजेंबर महिना येण्यापूर्वीच आटपून घेतलीं. दिजेंबर महिन्यांत नवा शिक्षक आला. त्याचें नांव फोस्टर असें होतें. हा सुमार विशीचे वयाचा असून, बांध्यानें मजबूत, रांकट व दिसण्यांत हुशार असा होता. त्यानें बरेंच ज्ञान संपादिलें होतें. परंतु त्याकरितां तो फारसा शाळेंत गेला नव्हता. तो दयाळु व चांगल्या वर्तणुकीचा असून

आपल्या विद्यार्थ्यांची चांगली काळजी घेणारा होता. सारांश, वसाहत करणारांस थोड्या पगारांत जसा शिक्षक मिळणें शक्य होतें, तितक्या लायकीचा तो होता.

पूर्वी ठरल्याप्रमाणें पंतोजी प्रथम गार्फील्डबाईकडेच राहूं लागला. जेम्स व थामस यांजवळ तो घरांतील माळ्यावर निजे. त्यांचा सहवास होतांच जेम्स हा मोठा अलौकिक मुलगा आहे असें त्याच्या अनुभवास आलें. पहिल्याच दिवशीं शाळेंत जातांना पंतोजी जेम्स यास ह्मणाले " जेम्स, तूं जर चांगला शिकशील तर तूं पुढें सेनापति होशील. "

सेनापति ह्मणजे कोणाला ह्मणतात हें जेम्स यास ठाऊक नव्हतें; परंतु सेनापति ह्मणजे कोणी तरी मोठा माणूस असला पाहिजे, त्याशिवाय मास्तर मला असें ह्मणणार नाहींत खास, असें त्यास वाटलें. सर्व दिवसभर ' सेनापति ' हा शब्द त्याचे मनांत घोळत होता. शाळेंतून घरीं येतांच ' सेनापति ' ह्मणजे काय ? ह्मणून त्यानें आपल्या आईस प्रश्न केला. त्या माउलीनें त्यास त्याचे पूर्वज या देशांत कसे आले; त्यांनीं येथें वसाहती कशा केल्या; जन्मभूमींत होणारा त्रास चुकविण्याकरितां देशत्याग करून ते दूरदेशीं आले तरी त्यांचा मागील त्रास कसा चुकेना व तो चुकविण्याकरितां सन १७७५ रांत त्याचे पूर्वज व इतर लोक मिळून त्यांनीं कशी निकराची लढाई दिली व आपल्या शौर्यानें ते स्वतंत्र कसे झाले; सेनापति वाशिंगटनच्या हाताखालीं त्यांनीं कसकशीं शूरपणाचीं कृत्यें केलीं वगैरे गोष्टी सांगून सेनापति ह्मणजे काय याची जेम्स यास चांगली ओळख करून दिली. नंतर ती ह्मणाली " बाळा, आतां आपणांस सेनापतीची मुळींच जरूर नाहीं व देवाच्या दयेनें पुढेंही ती न पडो. कारण, मनुष्यानें मनुष्यास मारणें चांगलें नव्हे. तेव्हां तूं जर चांगला शिकलास तर प्राणहानि न करितां सेनापतीप्रमाणें तूं नांवलौकिक मिळविशील. "

याप्रमाणें जेम्सला आपल्या पूर्वजांचा वृत्तांत आपले आईचे तोंडून कळला. या रानांतील झोंपड्यापलीकडे आपला कोणाशीं संबंध नाहीं अशी जी त्याची समजूत होती ती आतां पालटली व अमेरिकेंतील एकंदर

स्थितीशीं आपल्या वाडवडिलांचा बराच संबंध आहे असें त्यास वाटूं लागलें. या पूर्ववृत्तांतश्रवणानें त्याच्या पुढील आयुष्यावर काय परिणाम झाला हें सांगणें जरी अशक्य आहे, तरी इतकी गोष्ट मात्र निःसंशय घडली कीं, या पूर्ववृत्तांतश्रवणानें त्याच्या डोक्यांत अनेक मोठमोठे विचार येऊं लागले व त्यांचा त्याच्या अंतःकरणावर चांगला ठसा उमटला.

जेम्सची आपल्या पंतोजींवर फार प्रीति होती व तोही त्यास फार आवडे. असा हुशार मुलगा आपले हाताखालीं शिकण्यास आहे या गोष्टीचा त्यास मोठा अभिमान वाटे; परंतु पुढें घडलेल्या गोष्टीमुळें, जेम्सवरून त्याच्या पंतोजींचें मन कांहीं दिवस उडालें होतें. शाळा उघडून एक दिवस झाला नाहीं तों पंतोजींनीं असा नियम घातला कीं, मुलांनीं आपल्या पुस्तकाकडे नेहमीं लक्ष्य ठेवावें; पुस्तकाकडे लक्ष्य नसलें कीं, अभ्यास चांगला होत नाहीं; ह्मणून उगाच इकडे तिकडे पाहण्याची सर्वत्रांस मनाई आहे.

सर्व विद्यार्थ्यांस हा नियम फार चमत्कारिक वाटला; कारण अजपर्यंत त्यांनीं इतका कडक नियम कधींच अनुभवला नव्हता. जेम्सला तर हा नियम पाळणें फारच जड जाऊं लागलें. त्यानें आजपर्यंत संपादलेल्या ज्ञानांत अवलोकनशक्तीची तर त्यास विशेष मदत असे. त्याचे दोन डोळे व दोन कान हें त्यास पुस्तकापेक्षांही जास्त असत. शिवाय बांकावर निमूटपणें बसून, पुस्तकाकडे लक्ष्य लावून बसण्याचें काम त्यानें आजपर्यंत कधींच केलें नव्हतें. तेव्हां अशा चंचळ स्वभावाच्या मुलास असा नियम पाळणें फारच कठीण होतें. जेम्सला तर असें पक्कें वाटे कीं, आपणांस सेनापतिप्रमाणें मोठें व्हावयाचें असेल तर पंतोजींची आज्ञा शिरसा मान्य केली पाहिजे. परंतु, वर्गांत त्याचे डोळे पुस्तकाकडे मुळींच ठरत ना. कोणी धडा वाचूं लागला कीं, याचे कान व डोळे तिकडे गेलें ह्मणून समजावें.

हें पाहून शिक्षक जेम्सला ह्मणाला “ काय ? जेम्स, आतांच सांगितलेला नियम तूं लागलाच विसरलास ! ”

“ हो मी विसरलों ” असें जेम्सनें चटकन् उत्तर दिलें व तो आपल्या पुस्तकाकडे पाहूं लागला; परंतु दुसऱ्या मुलास पंतोजींनीं प्रश्न केला नाहीं

तोंच त्याचे डोळे पुस्तकाकडून निघून उत्तर देणाऱ्या मुलाकडे लागले व असें कसें झालें हें देखील त्यास समजलें नाहीं.

" काय जेम्स, आतांच मीं तुला बजावलें ना ? आणि पुन्हां इतक्यांत बजावल्याची आठवण देखील तूं विसरलास ? मला वाटतं तुला स्मरणशक्तिच फार कमी आहे.

जेम्स ओशाळल्याप्रमाणें होऊन, तो आपल्या पुस्तकाकडे पाहूं लागला. त्यानें आपले डोळे पुस्तकाकडे लावण्याची पराकाष्ठा केली. परंतु जेम्सचे कान व डोळे ज्या दर्जाचे होते, त्यांनीं असला नियम पाळावा असा ईश्वरी संकेत नव्हता. जेम्सवर असल्या नियमाचा अम्मल करण्याचे बाबतींत त्या शिक्षकाची चूक होत होती त्याला आपल्या शिष्याची पूर्ण पारख अजून झाली नव्हती. जेम्सनें आपल्या नियमाप्रमाणें वागावें ह्मणून सुमारें १५ दिवस त्यानें फार श्रम घेतले, परंतु त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. जेम्सलाही आपण गुरुजींच्या मनाप्रमाणें वागावें असें पुष्कळ वाटे, परंतु तसें करण्याकारितां तो जितके जितके श्रम करी तितका त्याचा अभ्यास मागें पडूं लागला.

सरतेशेवटीं पंतोजींची गार्फील्डबाईकडे राहण्याची मुदत संपली; आणि ते दुसऱ्या घरीं जाऊं लागले, तेव्हां ते गार्फील्डबाईस ह्मणाले " तुमचें मन दुखवावें असा कांहीं माझा इरादा नाहीं, परंतु मला वाटलें होतें तितका कांहीं जेम्स शाळेंत दिसत नाहीं. "

गार्फील्डबाईस या बोलण्याचें आश्चर्य वाटून ती ह्मणाली " असं कसं झालं ? तुमच्या बोलण्याचा मला कांहीं अर्थच कळत नाहीं. "

" मला वाटलेंच होतें कीं, माझ्या बोलण्यानें तुह्मांस वाईट वाटेल, परंतु तें तुह्मांस सांगणें माझें कर्तव्य आहे असें मला वाटतें. "

इतकें बोलून तो थांबला. गार्फील्डबाईच्या तेव्हांच लक्ष्यांत आलें कीं, यास कांहीं सांगावयाचें असून, तें सांगण्यास हा टाळाटाळी करीत आहे. तेव्हां ती पुन्हां त्यास ह्मणाली " सांगा, थांबतां कां ? "

बरं तर. जेम्स हा शाळेंत स्वस्थ बसत नाहीं. व आपले धडे तयार करीत नाहीं. तेव्हां ह्याला चांगला हुशार करणें माझे हातून होईल कीं नाहीं याची मला मोठी शंका आहे. "

जेम्स हा तेथेंच होता. वरील शब्द ऐकून जेम्सच्या आईच्या तोंडांतून "अरेरे !" इतकींच अक्षरें निघालीं. परंतु जेम्सच्या मनावर त्या एका शब्दाचा असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, त्याला एकदम रडें कोसळलें व तो ह्मणाला "आई, मी चांगला मुलगा होईन. खरोखर माझ्या मनांत चांगला व्हावं असं आहे." या दुसऱ्या वाक्यांत किती सत्य भरलेलें आहे बरें ! हें वाक्य ह्मणजे जेम्सच्या अंतःकरणाचें प्रतिबिंबच होय. मनुष्याच्या नैसर्गिक बुद्धीचा बीमोड करण्याचें काम मोठ्या शाहण्याच्यानें होणार नाहीं व तेंच काम जेम्सचा पंतोजी करूं पाहत होता.

गार्फील्डबाई:— कदाचित् स्वस्थ बसण्याचें त्याच्यानें होणार नाहीं. कारण, स्वभावतःच तो फार चंचल आहे. माझ्या सर्व मुलांत असं चपळ व चंचळ मूल नाहीं.

" नाहीं, आई, मी स्वस्थ बसेन " असें पंतोजी जों कांहीं बोलणार तोंच स्फुंदत स्फुंदत जेम्सनें उत्तर दिलें.

" कदाचित् तसें असेल " असें पंतोजींनीं विचारपूर्वक उत्तर दिलें. त्या माऊलीनें त्याच्या अंतःकरणांत उजेडच पाडला ह्मणायाचा.

यापूर्वीं त्यानें धडा तयार केला नाहीं असें कधीं सुद्धां माझ्या पाहण्यांत नाहीं.

" आई, मी शिकेन " असें जेम्सनें चटकर उत्तर दिलें.

" तुझी शिकावं अशी इच्छा आहे याबद्दल मला मुळींच संशय नाहीं. कांहीं मुलें त्यांची इच्छा असते त्यापेक्षां कांहीं निराळींच कामें करीत असतात व तसं कांहीं तुझ्या बाबतींत होतं कीं काय, याची मला मोठी भीति आहे."

जेम्सचें रडें पाहून व हा संवाद ऐकून, त्याच्या पंतोजीस फार वाईट वाटलें; आणि तो जेम्सच्या आंगावरून हात फिरवून ह्मणाला " जेम्स, उगा, रडूं नको. डोळे पूस बघूं. आतां आपणांस शिकण्याच्या बाबतींत त्रास पडणार नाहीं असें मला वाटतें. मी आणखीं एकदा तुजबद्दल प्रयत्न करीन बरें. "

शिक्षकास आपली काय चूक होत आहे तें पूर्णपणें कळून चुकलें व त्यानें जेम्सच्या नैसर्गिक वृत्तींत हात न घालतां दुसऱ्यारीतीनें त्याला शिकविण्याचा यत्न केला. जेम्स दुसरे दिवशीं शाळेंत गेला. पंतोजींनीं आपल्या करड्या नियमाचा अम्मल त्यावर करण्याचें बंद केलें. जेम्सच्या स्वाभाविक वृत्तीवर कोणत्याही प्रकारचा दाब आतां न राहिल्यामुळें, नेहमींप्रमाणें अवलोकनानें व श्रवणानें ज्ञानप्राप्ति करून घेण्याचें जेम्सचें काम पूर्ववत् सुरू होऊन, त्याचा अभ्यास चांगला होऊं लागला. त्याचे डोळे व कान पूर्णपणें उपयोगांत आणण्याची त्यास मोकळीक मिळतांच, तो साहजीकच आनंदवृत्तींत असे व त्यामुळें त्याचा अभ्यासही चांगला होऊं लागून, सर्व शाळेंत तो हुशार मुलगा ठरला.

ही गोष्ट घडल्यावर पुढें कांहीं दिवसांनीं गार्फील्ड बाई मुद्दाम त्या शिक्षकास जाऊन भेटली व त्यास " जेम्स आतां कसा काय अभ्यास करितो " ह्मणून तिनें विचारिलें.

" वः फार उत्तम " असें शिक्षकानें मोठ्या आनंदानें उत्तर दिलें.

" हें ऐकून मला फार आनंद होत आहे. " असे गार्फील्ड बाई ह्मणाल्या.

" शाळेंत ह्मणजे तो निमूटपणें बसलेला असतो असें नाहीं, परंतु तो आपला अभ्यास उत्तम करितो; आणि मला वाटतें त्याच्या इतकें जलद तर सगळ्या शाळेंत कोणास येत नसेल. "

" तर मग तुह्मीं तुमचा नियम सोडून दिलात वाटतं ! "

" हो. तुह्मीं जें त्याविषयीं बोललांत तेंच खरं. जेम्ससारख्या मुलास असला नियम उपयोगी नाहीं. त्यानें तो पाळण्यास बरीच मेहनत घेतली, परंतु तें त्याला जड जाई व त्यामुळें त्याच्या शिक्षणांत व्यत्यय येऊं लागला. "

" मुलांमुलांत पुष्कळ तफावत असते. सर्वांच्या स्वभावांत ह्मणजे साम्यच असतें असें नाहीं. माझींच मुलें पहाना; जेम्सच्या आंगीं जी तरतरी, बुद्धी व चपळता आहे त्याच्या शतांशही माझ्या इतर मुलांत नाहीं व मला खात्री आहे, कीं तो चांगला निपजेल. "

"हो. निःसंशय चांगला निपजेल, आणि मी तुह्मांस सांगतों कीं, हा मुलगा पुढें चांगलें नांव करील हें मी वर वर बोलतों असें नाहीं तर, ही तुह्मी खूण गांठ बांधा यांत कांहींचा फरक पडणार नाहीं."

"माझीही तीच इच्छा आहे" हे शब्द उच्चारितांना तिच्या अंतःकरणाची जी वृत्ति झाली होती ती माझ्या सारख्यानें वर्णन करणें अशक्यक आहे. वाचकहो, तिला त्यावेळीं जो आनंद झाला होता तो गगनांतही सामावणार नाहीं असा होता. जेम्सविषयीं तिचें मन पूर्वीपासूनच तिला खात्री देत होतें व त्यास त्या शिक्षकाचा दुजोरा मिळाल्यामुळें, तें अगदीं दृढ झालें.

जेम्सच्या चळवळेपणाबद्दल वारंवार बोलणीं होत. जेम्स हा आपल्या भावाजवळ निजे. त्याचीही अशीच कुरकुर असे. हा निजला ह्मणजे स्वस्थ निजायचा नाहीं. रात्रींतून हजारदां अंगावरील पांघरूण झोपेंत उडवून द्यावयाचा व थंडी वाजूं लागली कीं, "टाम मला पांघरूण घाल" ह्मणून झोपेंतच ह्मणायाचा.

जेम्सबद्दल एक अशी गोष्ट सांगतात कीं, त्याची ही खोड जन्मभर कायम होती. वरील गोष्टीनंतर सुमारें पंचवीस वर्षांनीं तो जेव्हां सेनापती झाला, तेव्हां दिवसांस एकदां भयंकर लढाई दिल्यावर रात्रीं तो तंबूत निजला होता. त्याच्या शेजारींच सैन्यांतील दुसरें कामगार निजले होते. रात्रीं त्यानें चळवळींत आपल्या अंगावरील पांघरूण लाथडून टाकलें आणि या कुशीवरून त्या कुशीवर वळतांना "टाम मला पांघरूण घाल" असें तो ह्मणाला. शेजारच्या कामगारानें त्याचें पांघरूण त्याचे आंगावर घातलें; परंतु तसें करीत असतां, जेम्स जागा झाला; तेव्हां त्या कामगारानें झोपेंत घडलेला सर्व वृत्तांत त्यास सांगितला. तो ऐकून, त्यास त्याचा भाऊ थामस, तें रानांतील घर व बाळपणच्या सर्व गोष्टी यांची आठवण होऊन, लहानपणीं या चंचलपणामुळें आपण एकदा आपल्या मातेची व गुरूची कशी निराशा केली होती वगैरे सर्व गोष्टी त्याचे पुढें उभ्या राहून त्यास जो हुंदका आला तो कांहीं केल्या आंवरेना.

शाळा पहिल्यानें उघडली त्यावेळींच मास्तरांनीं मुलांस एक नव्या करा-राचें ( ख्रिस्ती लोकांचें धर्मपुस्तकाचा दुसरा भाग ) पुस्तक हातांत घेऊन सांगितलें होतें कीं, " शाळेस जेव्हां उन्हाळ्याची सुट्टी मिळेल, तेव्हां मला जो मुलगा अभ्यास, वर्तणुक वगैरे सर्व बाबतींत उत्तम वाटेल, त्यास हें पुस्तक मी बक्षिस देईन. "

या गोष्टीमुळें सर्व मुलांत एका प्रकारची ईर्षा उत्पन्न झाली होती. बरेच मुलांनीं बक्षिस मिळविण्याकरितां प्रयत्न चालविले होते. परंतु कांहीं दिवस झाले नाहींत तोंच, बक्षिस कोणाला मिळणार हें ठरल्यासारखें झालें होतें; आणि शेवटच्या दिवशीं बक्षिस घेण्याकरितां पंतोजींनीं जेव्हां जेम्स यास हांक मारली तेव्हां कोणासही आश्चर्य वाटलें नाहीं.

नव्या करारांचें पुस्तक जेम्सच्या हातांत देतांना, पंतोजी ह्मणाले " जेम्स, हें घे. हें तुझें आहे. माझ्या समजुतीप्रमाणें सर्व शाळेंत इनाम देण्यास तूंच लायक आहेस. दुसऱ्या मुलांत ह्मणजे मला कांहीं दुर्गुण आढळले आहेत असें नाहीं; परंतु तुझी विलक्षण तयारी पाहून, तुला मी हें बक्षिस देत आहें."

सर्व मुलांस या गोष्टीचा आनंदच झाला व जेम्सच्या आईस जेव्हां ही बातमी कळली, तेव्हां त्या माउलीचे नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले.

असो. याप्रमाणें जेम्सच्या नैसर्गिक प्रवृत्तीस जेव्हां विरोध होण्याचें बंद पडलें, तेव्हां त्याचा अभ्यास चांगला होऊं लागला. मुलामुलांनीं मिळून त्या ठिकाणीं एक मंडळी काढली होती. तिचा उद्देश शुद्धलेखन सुधारण्याचा होता. या मंडळींतही जेम्सचा पहिला नंबर असे व मुलें ह्मणत कीं, जेम्सला सर्व शब्द बरोबर लिहितां येतात. जेम्सच्या शिक्षकांस हा एक अलौकिक मुलगा वाटे व त्यावर त्या सर्वांची मोठी मर्जी असे. त्यानें लोकांकडून उसनीपासनीं मागून आणून अनेक पुस्तकें वाचलीं. जेम्स सुमार सहा वर्षांचा झाला तेव्हांपासून शेतकामांत आपल्या भावास थोडी फार तो मदत करी. जेव्हां शाळा चालू असे, तेव्हां तो शाळेंत जाई. परंतु, शाळा काय वर्षांतून उणेपुरे चारसहा महिने असली ह्मणजे फार. जीं काय पुस्तकें मिळत तीं तो फावल्या वेळीं व सायं-

काळीं वाची. पुस्तक हातांत आलें कीं, त्यांतील ज्ञानभांडार त्यानें लुटून घेतल्याविना तें खालीं ठेवूंच नये. त्याची मानासिक प्रवृत्ति स्वभावतः ज्ञानार्जनाकडे असे व तें प्राप्त करून घेण्याकरितां त्याचें मन कसें हपापलेलें असे. त्या कामीं त्यास कंटाळा असा कधींच आला नाहीं.

जेम्स यास लहानपणापासूनच सत्याची आवड व लबाडीचा तिटकारा असे ! तो एकदां आपल्या मावशीकडे तीस भेटण्याकरितां गेला होता. त्या प्रसंगाची हकीकत सांगून हा भाग आपण आटपूं व जेम्सच्या पुढील चरित्राकडे वळूं.

जेम्सच्या घरापासून त्याच्या मावशीचें घर सुमार तीन मैल लांब होतें. मावशीस व मावसभावंडांस भेटून, सायंकाळीं तो घरीं येण्यास निघाला. तेव्हां काळोख पडण्याचा सुमार झाला होता व तितक्यांत पावसास सुरवात होऊन वाराही मनस्वी सुटला. तेव्हां त्याची मावशी त्यास ह्मणूं लागली " जेम्स, आतां अंधार पडूं लागला आहे, तर रात्रभर रहा व सकाळीं जा. "

" अहं, तसं मी कधीं करणार नाहीं. मी जर राहिलों तर, मी कां आलों नाहीं ह्मणून माझ्या आईस काळजी लागेल व ती रागें भरेल " असें जेम्सनें उत्तर दिलें.

" तर मग तूं लवकर जा कसा. जितका जितका थांबशील तितका अंधार जास्त पडूं लागणार. "

" बरं तर, हा निघालों " असें ह्मणून तो त्यांचा निरोप घेऊन निघाला. यावेळीं अंधार बराच पडला होता व ज्या रस्त्यानें त्यास जावयाचें होतें तो चांगला रहदारीचा नसून, शिवाय पाऊस पडल्यामुळें, तो खराब झाला होता. सुमार अर्धा मैल तो गेला असेल नसेल, तोंच त्यास भीति वाटूं लागली व तें पोर धूम ठोकीत परत आपल्या मावशीच्या ओसरीवर येऊन दाखल झालें. परंतु, तेथें येतांच त्याचे मनास शरम वाटली व तो ह्मणाला " मी किती भित्रा आहें बरें ? "

" नाहीं, तूं भित्रा नाहींस. रात्रच फार भयंकर आहे व तुझ्याइतक्या लहान मुलानें घराबाहेर पडण्याची ही वेळच नाहीं. " असें त्याची मावशी ह्मणाली.

" नाहीं. मी पुन्हां प्रयत्न करीन. परत आलों हा मुळीं मीं मूर्खपणाच केला. इतक्या अवकाशांत मी आणखीं एक मैलभर गेलों असतों. "

" जेम्स, तूं कांहीं जाऊं नको. मी भ्यालों ह्मणून मी आलों नाहीं असें तूं आपल्या आईस कळवूं नको ह्मणजे झालें. चिखल फार होता ह्मणून मी आलों नाहीं असं सांग झालं. "

हें ऐकून जेम्सच्या चेहेऱ्यावर एकदम फरक दिसला व तो तावडतोब ह्मणाला " मी आपल्या आईपाशीं कधींही खोटें बोलणार नाहीं व मी भ्यालों असं तर मीं तिला सांगण्याची मला लाज वाटते. तर मग घरीं जाणार. मुलांनीं तिच्याजवळ खोटं बोलावं अशी आमची आई नाहीं. ती फार मायाळू आहे. "

इतकें बोलून तों जों तडक निघाला तो आपल्या घरीं येऊन उभा राहिला.

# भाग ३ रा.

## लहान शेतकरी.

जेम्स जेव्हां आठ वर्षांचा झाला, तेव्हां त्यास घरांतील बरींच कामें करावीं लागत. थामस यास शेजारींपाजारीं बरेंच काम मिळूं लागलें होतें. तो वारंवार बाहेर कामावर जाई व तेव्हां बाहेरील सर्व कामांचा भार जेम्सवर पडे. लांकडें फोडणें, गुराढोरांची व्यवस्था करणें, भाजीपाला लावणें वगैरे शेतकऱ्यास करावीं लागणारीं सर्व कामें तो करी.

थामस यास मजुरीवर जाणें अवश्य असे. घरांतील सर्व माणसांस जोडे वगैरे लागणाऱ्या आवश्यक वस्तु, तसेंच पुस्तकें, मास्तरांचा पगार वगैरे कामीं लागणारा पैसा थामस यास मजुरी करून मिळवावा लागे. असें असल्यामुळें शेतकीच्या हंगामाच्या दिवसांतच काय तो थामस घरीं असे. हे दिवस खेरीजकरून बहुतेक तो मजुरीवर जाई, घरांतील काम जेम्स हा पहात असे.

एके दिवशीं गार्फील्ड बाई जेम्सला ह्मणालीः—जेम्स, आतां तूं आठ वर्षांचा झालास. थामसवर घरखटल्याचा सर्वस्वीं जेव्हां भार पडला, तेव्हां तो पुरा अकरा वर्षांचा देखील नव्हता. तेव्हां हळू हळू थामसची जागा तूं संभाळून, त्यास मोकळा करण्यास त्वां तयार असलें पाहिजे. तो कांहीं दिवसांनीं आतां वयांत येईल व कांहीं उद्योगधंद्याकरितां बाहेर गांवीं त्यास गेलें पाहिजे, तेव्हां कुटुंबाचा सर्व भार तुला संभाळला पाहिजे.

" हो, मी संभाळीन " असें जेम्सनें उत्तर दिलें.

" हो तूं संभाळशील, पण शेतवाडी करण्यास लागणारें ज्ञान तूं संपादलें पाहिजेस. सतत अभ्यास ठेवला कीं, कोणत्याही कामीं पारंगतता येते. ' राबता मळा व लिहितां हातवळा ' असें जें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. "

" हो, तें मी समजलों व टामएवढा मी झालों कीं, मीही शेतवाडी करीन. "

" आणि माझी अशी खात्री आहे कीं, शेतवाडीपेक्षांही महत्त्वाचीं कामें पुढें तूं करशील. "

" ह्मणजे, शेतवाडी करण्यापेक्षां अधीक महत्त्वाचें तें काय आहे ? "

" कांहीं माणसांना शिकविण्याचें व उपदेश करण्याचें काम चांगलें साधतें व त्यांनीं शेतवाडी करण्यापेक्षां तेंच करणें चांगलें. तुला नाहीं शिकविण्याचा धंदा आवडत ? "

" हो. तितका मी मोठा झालों कीं, तोही मी करीन. "

" त्याला कांहीं फार दिवस नकोत. चांगला शिकलास तर, टामएवढा होतांच तूं शिकविण्याचें काम करूं लागशील. "

" मी सतरा वर्षांचा झालों कीं, शाळा शिकवूं लागेन ! " हे शब्द उच्चारतांना त्यास फार आश्चर्य वाटलें. त्याला असें वाटूं लागलें कीं, आपले सर्व शिक्षक सतरा वर्षांपेक्षां मोठे होते व मीच कसा सतरा वर्षांचा होतांच शाळा शिकवूं लागेन ! व तो साश्चर्यानें आपल्या आईकडे पाहूं लागला.

" सतरा अठरा वर्षांचे असतांना देखील कित्येक लोक शिक्षकाचा

धंदा करूं लागतात; परंतु तें करूं लागण्यापूर्वी स्थितिपरत्वें शेतकीचें काम तूं करूं लागलें पाहिजेस. "

" बरं, आतां ढोरें घरीं येण्याची वेळ झाली. " असें ह्मणून तो गर्दीनें त्या कामास गेला. जेम्स हा स्वावलंबी, हुशार, मेहनती व सशक्त मुलगा होता. शेतकीच्या कामीं लागणारे बहुतेक गुण त्यांत होते. त्याला कांहीं अशक्य असें वाटतच नसे. अमुक एक काम ह्मणजे मला होणार नाहीं असें तो कधींही ह्मणत नसे. त्याचें नेहमीचें उत्तर ' मला करितां येईल ' हें असावयाचें. याचें मुख्य कारण त्यास त्याच्या कर्तृत्वशक्तीबद्दल खात्री असे; ह्मणजे त्याच्यांत अहंपणा होता असें नव्हे. अहंपणा अगर कर्तृत्वशक्तीबद्दल फाजील अभिमान, ह्मणजे कांहीं स्वावलंबन नव्हे. जेम्सचे ठायीं गर्व तर मुळींच नव्हता. त्याच्याप्रमाणें लीन व साधा मुलगा मिळणेंच कठीण. तो आपल्या आईस मला अमुक करितां येईल ह्मणून जें सांगे तें सांगतांना आपल्या सामर्थ्याचा अभिमान वाटे असें नव्हे; तर त्याचें तें सांगणें खरें खरें असे आपणांस जें करितां येईल असें त्यास वाटे त्याबद्दलच तो असें बोले. कांहीं मुलें जशीं यत्किंचित् कामांत सुद्धां भित्रेपणानें उगाच ' आपल्याच्यानें होणार नाहीं ' असें ह्मणतात तसें ह्मणणारा तो नव्हता. तो गर्विष्ठ नव्हता तसा उगाच घाबऱ्याही नव्हता. ' मला तें करतां येईल ' असें ह्मणण्यांत त्याचा इतकाच भाव असे कीं, कर्तव्य करण्यास मी जिवापाड श्रम करून पाहीन. पहिल्यानेंच अवसान गाळणारा तो मुलगा नव्हता. तो जबरदस्त उत्साही होता व या त्याच्या एका गुणामुळेंच गार्फील्डबाईस तो पुढें नांव करील असें वाटे.

असो. याप्रमाणें जेम्स उत्साहानें शेतवाडी पाहूं लागल्यावर, एके दिवशीं तो काम करीत असतां, त्याची आई त्यास ह्मणाली " जेम्स, कोणत्याही कामांत यशप्राप्तीची गुरुकिल्ली ही आहे कीं, ' मी तें काम करीन ' असें आपण आपल्या मनांत धारलें पाहिजे. धीर सोडतां उपयोगीं नाहीं. माझे बाबा नेहमीं ह्मणत कीं, इच्छा असली कीं, उपाय सुचतो. "

जेम्स वरील वाक्य पुन्हां उच्चारून ह्मणाला:—याचा अर्थ काय ?

" याचा अर्थ असा कीं, ज्याच्या मनांत काम करण्याबद्दल खरी कळकळ असते, त्याच्या मार्गांतील विघ्नें बारा वाटां पळून जातात व त्यास यशप्राप्ति ठेवलेलीच असते. अनेक संकटें आलीं असतां धीर न सोडतां, हातीं घेतलेलें काम जो मुलगा दृढ निश्चयानें व उत्साहानें करतो, त्यास त्याच्या कामांत यश येतेंच येतें व असें तुला करितां येईल ना ? "

" हो. मला करितां येईल " ह्मणून जेम्सनें मनापासून उत्तर दिलें.

गार्फील्ड बाई पुढें ह्मणालीः—स्वावलंबन ठेव व जें काम हातीं घेशील तें आपण करूं अशी हुरूप बाळग, ह्मणजे तें सहज होईल. ' भगवान् सत्यसंकल्पाचा दाता व अनाथांचा पाठीराखा आहे ' असें जें ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे. मला त्याचा पूर्ण अनुभव आहे. तुझा बाप जेव्हां वारला तेव्हां आपली अशी स्थिति होती कीं, काय करावें हेंच मुळीं मला सुचेना. या रानांत आपण कशीं राहूं, आपला उदरनिर्वाह कसा चालणार, अशा एक ना दोन हजारों विंवचना माझ्या मागें होत्या; परंतु मीं जेव्हां ईश्वरचरणीं भाव ठेवून, स्वतः श्रम करूं लागलें व स्वतःच्या पायांवर उभें राहण्याचा जेव्हां निश्चय केला, तेव्हां ईश्वरानें मला हात देऊन सर्व संकटांतून पार पाडलें; आणि मला वाटत होतें त्यापेक्षां पुष्कळ चांगल्या प्रकारचे दिवस आपणांस दिसले. या सर्वांचे मुख्य बीज हेंच कीं; ' इच्छा आहे तेथें यश आहे. ' प्रयत्नांअंतीं ईश्वर' .

" आणि जर आपण शक्य ते प्रयत्न केले नाहींत तर ईश्वर काय करतो ? "

" तो आपणांस साह्य करीत नाहीं व ईश्वरी कृपा नसणें हेंच दुर्दैव होय. "

हें बोलणें जेम्सनें लक्ष्यपूर्वक ऐकलें व त्यास वाटूं लागलें कीं, जर आपण भाव धरला व मेहनत केली तर, आपल्या कामांत ईश्वरी साह्यानें आपणास खात्रीनें यश येईल.

त्याची आई पुढें ह्मणाली " तूं जर एक गोष्ट चांगली केलीस तर,

दुसरीही तुला चांगली करितां येईल व अशारीतीनें सर्व काम चांगल्या प्रकारें तडीस जाईल. तुला हळू हळू हें दिसून येईल कीं, कोणतेंही काम करण्यास आपले स्वतःचे श्रमच फार उपयोगीं पडतात. तेव्हां दुसऱ्यावर अवलंबून न रहातां काम करण्याची एकदां तुला संवय झाली कीं, तूं स्वावलंबी बनशील व कार्यसिद्धीची गुरुकिल्ली तर स्वावलंबन होय. "

अशाप्रकारचें शिक्षण जेम्स यास लहानपणापासून मिळत होतें. आईच्या वचनामृताचा काय तो त्यास पाठिंबा होता. त्याला जगांत मदत करणारा कोणी नव्हता व आपणास कोणी पुरस्कर्ता नाहीं ह्मणून त्यासही कधीं काळजी वाटत नसे. लहानपणापासूनच त्यास असें वाटत असे कीं, आपणास जर वर येणें असेल, चांगले दिवस दिसावयाचे असतील तर, ते आपल्या हातूनच दिसतील. हें तत्त्व नेहमीं त्याच्यापुढें असे; व हा सर्व त्याच्या गृहशिक्षणाचा प्रभाव होता. आपल्या बऱ्यावाईट स्थितीला परोक्ष अगर अपरोक्ष रीतीनें आपणच कारणीभूत आहों अशी त्याची ठाम समजूत होती. तो पुढें चाळीस वर्षांचा झाल्यावर तरुण होतकरू मंडळीस जो उपदेश करी त्यांतही हें वरील तत्त्व स्पष्टपणें व्यक्त होत असे.

" प्रसंग आल्यावर आपण पुढें येऊं ह्मणून, जर तुह्मी प्रसंगाची वाट पहात बसाल तर तें व्यर्थ आहे. प्रसंग हे तुह्मांला शोधून काढले पाहिजेत, ते तुह्मांला शोधीत यावयाचे नाहींत. प्रत्येक कामांत यश येण्यास, येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगाबरोबर टक्कर मारण्यास तुह्मीं तयार असलें पाहिजे. संधीची वाट पहात बसून, कांहीं व्हावयाचें नाहीं. या जगांत यश संपादण्यास स्वतः श्रम केले पाहिजेत, तर तें तुह्मांस प्राप्त होईल. गरीबी व अशाच दुसऱ्या अडचणींची तुह्मी मुळींच पर्वा करूं नका. अशा लाखों अडचणी तुमच्या रस्त्यांत पहिल्या पहिल्यानें येतील; परंतु त्यांस न जुमानतां नेटानें उद्योग चालवणें यांतच तुमच्या यशप्राप्तीचें मूळ बीज आहे. गरीबी असणें हें मोठें दुर्दैव तर खरेंच व ती फार कष्टमयही आहे, हें मी आपल्या स्वानुभवावरून सांगतों. परंतु, शंभरांत नव्याण्णव वेळां असें घडतें कीं, मनुष्य जो वर

येतो, तो वर येण्यास त्यावर येणारी संकटपरंपराच मुख्यत्वें कारणीभूत असते. माझें तर असें मत आहे कीं, होतकरू मंडळींवर नाना संकटें येऊन त्यांतून स्वतःच्या हिंमतीवर पार पडण्याचा प्रसंग त्यांवर येणें ह्मणजेच त्यांस सुसंधि प्राप्त होणें होय. ज्यांत मिळून कांहीं राम आहे असा एकही मनुष्य संकटांत गांगरून गेलेला मीं कधीं माझ्या आयुष्यांत पाहिला नाहीं." याप्रमाणें त्याचा नेहमींचा बोध असे; व त्याचें स्वतःचें जिवंत उदाहरण श्रोत्यांपुढें ढळढळीत असल्यामुळें, त्यांचे मनावर त्या बोधाचा चांगला परिणाम घडे.

जेम्सच्या स्वभावांत दुसरा एक विशेष गुण हा होता कीं, त्यावर संकट जरी अकस्मात् आलें तरी, तो गांगरून जात नसे. कांहींना कांहीं तरी शक्कल काढून त्यांतून तो पार पडलाच ह्मणून समजावें. तो नऊ दहा वर्षांचा असतांना एकदां असें घडलें कीं, त्याचा मावस भाऊ हेनरी व तो वर्गांत बसले असतां, एकमेकांची थट्टामस्करी करून हंसत होते. ही गोष्ट शिक्षकाचे नजरेस आली व हा वात्रटपणा एकदम थांबविण्याचा त्यानें विचार करून तो त्या दोघांस ह्मणाला "जेम्स व हेनरी, तुह्मी आपलीं पुस्तकें मिटा व दोघेही घरीं चालते व्हा."

त्या दोघांसही शिक्षकाची अकल्पित आज्ञा ऐकून कसेसेंच झालें व ते एकमेकांकडे टकमक पाहूं लागले.

"बघतां काय ? तुह्मी दोघेंजण दप्तरें आटपा व घरीं चालते व्हा" असें पंतोजी पुन्हां ओरडून ह्मणाले.

"हो. जातों" असें जेम्सनें उत्तर केलें. हेनरी कांहींच बोलला नाहीं. ते दोघे शाळेंतून बाहेर पडले. बाहेर येतांच जेम्सनें इतकी धूम ठोकली कीं, सुमार पंधरा मिनिटांत तो घरीं जाऊन आला आणि धापा टाकीत टाकीत आपले जागेवर येऊन बसला.

पंतोजींस हा घरीं जाऊन आला असेल असें न वाटून, ते रागानें ह्मणाले "जेम्स, तुला घरीं चालता हो ह्मणून सांगितलें होतें ना ?"

"हो, मी घरीं गेलों होतों." असें त्यानें उत्तर दिलें. त्यानें शिक्षकाची आज्ञा शिरसा मान्य केली होती व तो जरी घरीं गेला होता तरी घरांत हा प्रकार कांहीं माहीत नव्हता.

जेम्स हा इतक्या वेळांत घरीं जाऊन कसा आला याचें त्याच्या पंतोजीस आश्चर्य वाटून, ते ह्मणाले " घरीं गेला होतास ? "

" हो, मास्तर. मी घरीं गेलों होतों. परंतु मला कांहीं तुह्मीं घरीं राहण्यास सांगितलें नव्हतें.

" बरं तर, बस. " असें पंतोजी हंसत हंसत ह्मणाले. जेम्सनें यापुढें शाळेंतून घरीं जाण्याची वेळ येईल असें वर्तन कधींच केलें नाहीं. त्यास पक्कें माहीत होतें कीं, यावेळेस हा प्रसंग थोडक्यावर आनंदानें निभावला. परंतु पुन्हां तसें झाल्यास तें फार जड जाईल. हेनरी हा शाळेशींच कांहीं वेळ रेंगाळला व नंतर घरीं गेला, तो परत आलाच नाहीं. या दोन मुलांत जें अंतर होतें तें हेंच. जेम्सनें गांगरून न जातां संकटांतून पार पडण्याचा उपाय शोधून काढला व आपले शिक्षकाची आज्ञेपरी आज्ञा पाळून, पुन्हां आपलें नुकसान होऊं दिलें नाहीं.

जेम्स हा आतां अकरा वर्षांचा झाला. गावांतील लोकांनीं निराळी नवी शाळा बांधली व जेम्सच्या आवारांत असलेलें शाळागृह कांहीं किंमत घेऊन त्यांनीं गार्फील्डबाईस विकत दिलें. थामस, जेम्स व त्याचे मावसभाऊ यांनीं मिळून, त्या शाळेचें सर्व सामान काढून, त्याची घरास जोडून एक नवी खोली तयार केली व त्यामुळें चांगली सोय झाली.

अशाप्रकारें सुखासमाधानांत दिवस जात असतां, जेम्स यास अकरावें सरून बारावें वर्ष लागलें. थामस हा आतां पूर्ण वयांत आला. मायलेंकरांचें पूर्वींच असें ठरलें होतें कीं, थामस वीस एकवीस वर्षांचा झाला कीं, त्यानें नोकरीधंदा पाहण्याकरितां बाहेर गांवीं जावें व जेम्सनें शेतवाडी सांभाळावी. याच सुमारास मिचिगान याठिकाणीं वसाहत करणारे फार येऊं लागले होते व तेथें मजुरांची चणचण होती. तेथें थामस यास दरमहा चोवीस रुपये पगारावर काम मिळालें. ही गोष्ट त्यानें आपल्या भावास व आईस सांगितली. थामस कांहीं दिवस दूरगांवीं जाणार ह्मणून त्यांस बरेंच वाईट वाटलें. परंतु अखेरीस जेम्सनें घरखटलें संभाळावें व थामसनें जावें असें ठरलें. बाहेरगांवीं जाण्यापूर्वीं थामसनें जेम्स यास शेतकामाची बरीच माहिती दिली व ती त्यानें लक्ष्यपूर्वक समजून घेतली.

असो. याप्रमाणें थामस नोकरीवर गेला व सर्व भार जेम्स यावर पडला. थामस गेल्यामुळें कुटुंबांतील सर्व माणसांस फार वाईट वाटलें. गार्फील्ड मेल्यापासून सर्व कुटुंबांत कर्ता पुरुष काय तो तोच होता. गार्फील्डबाईस त्याचा मोठा अधार असे. तो गेल्यामुळें तिला तर अगदीं चुकल्या चुकल्याप्रमाणें झालें. तीच स्थिति जेम्सची झाली. जेम्स यास तर तो बापाचे ठिकाणीं होता. थामस यास आपल्या भावाचे हुशारीबद्दल फार कौतुक वाटे व जेम्सचेंही त्यावर निष्कपट प्रेम असे.

यावेळेपासून जेम्स हा खराखुरा शेतकरी बनला. आज चार वर्षे आपल्या भावाबरोबर तो शेतांत खपत असे. त्यामुळें त्यास त्या कामाची बरीच माहिती झाली होती हें खरें; तरी, आतां सर्व गोष्टी त्यास स्वतःच्या अकलेनें करावयाच्या होत्या व नफानुकसानीचें सर्व जोखीम त्यावर पडलें. भाऊ गेल्यापासून त्यास एकट्यास विशेष मेहनत करावी लागे. सकाळपासून सायंकाळपावेतों तो शेतांत जिवापाड खपे. हा धंदा त्यास मनापासून आवडत असल्यामुळें, थोड्याच दिवसांत त्या कामांत तो चांगला वाकब झाला. त्यानें शेजाऱ्यांकडे आळीपाळीनें कामास जाण्याची नवी पद्धत सुरू केली व या श्रमाच्या अदलाबदलीनें त्यास बरीच सोय होऊं लागली. अशारीतीनें गरज पडल्यास माणसें व जनावरें त्यास पैसा खर्च केल्याविना मिळत. जेम्स हा शेतांतील कामें मन लावून व चांगलीं करणारा असल्यामुळें, त्याबरोबर कामाचा मोबदला करण्यास कोणीही तयार असे.

शेतकीचा धंदा करीत असतांही त्यास बरेंच शिक्षण प्राप्त झालें. शेतवाडीच्या कामांत तर तो पूर्ण वाकब झालाच. परंतु सतत् व धिम्मेपणानें श्रम करण्याचें महत्त्व या धंद्यांतील अनेक प्रसंगांमुळें त्यास पूर्णपणें कळून चुकलें. नुसत्या पुस्तकी ज्ञानापेक्षां या काळांत त्यास जें अनुभवसिद्ध शिक्षण प्राप्त झालें तें फार महत्त्वाचें होतें व त्याचा त्याचे अंतःकरणावर चांगला ठसा उमटला.

या दिवसांत जेम्स यास पुस्तकें वाचण्यास फारच थोडा वेळ सांपडे, तरी त्याविषयींची त्याची लालसा कांहींमात्र कमी झाली नाहीं. नेहमीं त्यास

आपण शाळेंत जावें असें वाटे व कधीं कधीं तर या विचारामुळें, त्यास कांहींच सुचेनासें होई. त्याच्या आईस तर नेहमीं वाटे कीं, या शेतकामांत जेम्सच्या अमोलिक वेळाचा दुरुपयोग होत आहे. तो कसा टाळतां येईल हा विचार तिचे मनांत नेहमीं घोळत असे.

वसाहत करणारांस कोणकोणतीं व कसकशीं कामें करावीं लागतात याचें थोडेंसें दिग्दर्शन पूर्वी केलेंच आहे. तेव्हां थामस हा गेल्यापासून जेम्स यास किती काम पडत असेल याची कल्पना वाचकांस सहज होईल. असें जरी जिवापाड काम करावें लागे तरी तो त्यास कंटाळलेला नसे. बहुतेकांस फार काम करावें लागणें ह्मणजे मोठें दुर्दैव वाटतें. परंतु तसें जेम्स यास कधींही वाटलें नाहीं. आपल्या परिस्थितीप्रमाणें इतकें काम करणें हें आपलें कर्तव्यच आहे असें त्यास वाटे. खरें पाहूं गेलें तर, श्रम करावें लागणें ह्मणजे कांहीं दुर्दैव नाहीं. मोठमोठे श्रीमान् लोक पैसा मिळविण्याकरितां व तो राखण्याकरितां काय कमी श्रम करतात ? गरीब मनुष्यास उदरनिर्वाहाकरितां कराव्या लागणाऱ्या श्रमांपेक्षां श्रीमंतांस पडणारे श्रम अधिक असतात. श्रीमंतांस काबाडकष्ट करावें लागत नाहींत हें खरें, परतु त्यांस जी काळजी असते त्याच्या शतांश तरी मजुरांस असते काय ? श्रीमंतांच्या कीतीक रात्री आलोचन जागरणांत जात असतील, परंतु कामकऱ्यास ह्मणजे अमुक दिवशीं झोंप नाहीं असें आपण कधीं ऐकतों काय ? गरीबांस कामापासून दुप्पट फायदा असतो. एक तर उदरनिर्वाह होतो व शरीरप्रकृति सदृढ राहते. उलट पाहूं गेलें तर श्रीमंत लोकांस सर्व वस्तूंची अनुकलता असून गरीबांच्या शतांशही सुख नसतें. जेम्सला तर काम करण्याची मोठी हौस. भाऊ गेल्यावर सर्वस्वी घरखटल्याची जबाबदारी त्याचे शिरावर होती हें खरें; तरी, तो तीस मुळींच कंटाळला नव्हता, तर उलट त्यास तीबद्दल अभिमान वाटे. त्यास स्वभावतःच कामाची हौस व आळसाचा कंटाळा असल्यामुळें, त्यास या आंगावर पडलेल्या जबाबदारीचें कांहीं वाटत नसे.

याप्रमाणें शेतवाडी कसण्यांत जेम्सचे दिवस चालले होते. त्याच्या आईस

तर हा शेतकामांतून सुटून विद्वान् होण्याच्या पंथास केव्हां व कसा लागेल हीच हम्मेष काळजी होती. परंतु ईश्वरी संकेत कांहीं निराळा होता. ईश्वरी इच्छेनुरूप जेम्स हळू हळू वर चढत होता. त्याला जो पुढें मार्ग काढावयाचा होता, त्याची पूर्ण तयारी धिम्मेपणानें व पद्धतशीर होणें फार महत्त्वाचें होतें व त्याच्या अनुरोधानें जगच्चालकाच्या इच्छेनुरूप सर्व कांहीं घडत होतें. ' मनुष्य पुष्कळ मनचे मांडे खातो, परंतु घडवून आणणें ईश्वराधीन असतें ' व तसें असतें हीच उत्तम गोष्ट आहे. नाहींतर माणसाच्या उतावळीनें कार्यनाश मात्र व्हावयाचा. तीच गोष्ट जेम्सच्या बाबतींत होती. जेम्सच्या पुढील आयुष्यरूपी भव्य इमारतीचा पाया घालण्याचें काम सर्वशक्तिमान् ईश्वराच्या संकेताप्रमाणें चालू होतें. पुढें शिरावर पडणारी कठीण व जोखमाचीं कर्तव्यें बजावण्याचें सामर्थ्य जेम्सचे आंगीं आणून देण्याचें काम ईश्वराचे नजरेखालीं सुयंत्रित चाललें होतें. ही कामगिरी जर जेम्सच्या आईचे हातीं असती तर पुढें उभारल्या जाणाऱ्या इमारतीच्या दर्ज्याचा पाया तिच्या हातून निःसंशय रचिला जाता ना !

# भाग ४ था.

## लहान सुतार.

जेम्स एके दिवशीं बागांत काम करीत असतां, थामस येत आहे असें त्यानें पाहिलें व त्यास जो आनंद झाला तो वर्णन करणें अशक्य. ' टाम आला ' ' टाम आला ' ह्मणून आरोळ्या ठोकीतच तो रस्त्यांत त्यास भेटण्यास गेला. त्यावेळची त्याची एकंदर स्थिती जर कोणी परक्या मनुष्यानें पाहिली असती तर, जेम्स यास एकदम वेड लागलें, असें त्यास वाटलें असतें. तो आनंदानें आपल्या भावास जाऊन भेटला व ह्मणाला " टाम, आतां नवीन घर बांधावयाचें ना ? "

" हो, आतां बांधूं " असें थामसनें उत्तर दिलें

ही गोष्ट येथें सांगणें अवश्य आहे कीं, थामस याचा कामावर जाण्याचा मुख्य उद्देश नवीन घर बांधावें हा होता. मिचिगान येथें जाण्यापूर्वी इमारती लांकूड त्यानें रानांतून तोडून आणून ठेवलें होतें व सुताराची मजुरी व इतर लोखंडी सामान वगैरे आणण्यासाठीं पैसा हवा ह्मणून तो नोकरीवर गेला होता.

वरीलप्रमाणें एकमेकांशीं संवाद करीत ते दोघे बंधु घरांत आले व आई नजरेस पडतांच जेम्स उतावळीनें ह्मणाला "आई, आपल्याला आतां नवें घर बांधावयाचें."

गार्फील्डबाईची अवस्थाही जेम्सप्रमाणेंच झाली होती. थामस येत आहे असें जेव्हां तिच्या कानीं पडलें तेव्हां तिचा आनंद गगनांत मावेना. तिनें आपल्या हातांतील सर्व कामें बाजूस ठेवून, जलदीजलदीनें ती थामस यास भेटण्याकरितां, घरांतून बाहेर आली. त्या मायलेंकरांची गांठ पडली त्यावेळीं त्यांस झालेला आनंद व त्यांची स्थिति मजसारख्यानें वर्णन करणें कठीण. ती अनुभवीच जाणोत.

आतां पुन्हां एकदां सर्व मंडळी एकत्र जमली. ते सर्व घरांत जाऊन बसल्यावर, थामसनें आपल्या खिशांत हात घालून, मूठभर सोन्याचें नाणें बाहेर काढलें व तें आपल्या आईजवळ देतांना तो ह्मणाला "आई, आतां तुला नवीन घर बांधतां येईल." हे शब्द उच्चारतांना त्या मुलास जें समाधान वाटत होतें तें शब्दांनीं व्यक्त करितां येणें नाहीं.

"अबब ! कितीतरी पैसा !" असे शब्द आईच्या हातांतील नाणें पाहून, जेम्सच्या तोंडून निघाले व तो ते पैसे कसे आहेत तें पाहूं लागला. आजतागाईत सोन्याचें नाणें असें त्यानें कधीं पाहिलें नव्हतें. तो थामसला ह्मणाला "हे किती आहेत ?"

बरोबर "पाऊणशें डालर आहेत" असें थामसनें उत्तर दिलें.

जेम्सला हें ऐकून मोठा अचंबा वाटला. मिचिगानमध्यें इतका पैसा मिळेल अशी त्यास कल्पना नव्हती. त्या नाण्यावरील छाप वाचण्यांत व तें मोजण्यांत तो अगदीं गढून गेला होता व त्याचे मनांत अनेक तरंग येत होते.

अशी त्याचे मनाची स्थिति झाली असतां, तो एकदम आपले आईकडे वळून ह्मणाला " आई, तूं कांहीं बोलत नाहींस." त्याला वाटलें कीं, आपणाप्रमाणेंच तीस आनंद झाला असेल व वस्तुस्थिति तशीच होती. परंतु ती जेम्सपेक्षां वयानें मोठी होती. जेम्सच्या जशा पोरचेष्टा चालल्या होत्या तशा तिला करणें शक्य नव्हतें; परंतु तिला ह्मणजे आनंद कांहीं कमी झाला होता असें नाहीं. आनंदानें तिचा कंठ अगदीं दाटून आला होता. प्रेमाश्रूंनीं नेत्र अगदीं भरून गेले होते. आपल्या मुलाचें आपणावर असलेलें निष्कपट व निःसीम प्रेम पाहून त्या माउलीस मोठी धन्यता वाटली. यावेळीं आनंदसागरांत ती अगदीं बुडून गेली होती. तिला एक शब्द देखील बोलवेना. टाम जर लहान असता तर तिनें त्यास या आनंदभरांत पोटाशीं घेतलें असतें व मन मोकळें होईपर्यंत ती रडली असती. यावेळीं मागील सर्व स्थिति तीपुढें उभी राहिली व ईश्वराच्या कृपेनें आपल्या स्वप्नींही नव्हते असे दिवस आपल्या नजरेस पडले, हें पाहून तीस काय वाटलें असेल तें कोणीं सांगावें ! परमेश्वराच्या अगाध लीलेबद्दल तिला राहून राहून आश्चर्य वाटे. दुःखाचा अगर आनंदाचा कळस झाला कीं माणसाची एकसारखी तऱ्हा होत असते. तीच अवस्था यावेळीं त्या बाईची झाली होती. जेम्सनें वर जो प्रश्न केला त्यास उत्तरच ह्मणून कीं काय तिच्या नेत्रांतून घळकन् आनंदाश्रु आले व ते जेम्सच्या हातांत असलेल्या सोन्याच्या नाण्यावर पडले. जेम्सला यांतील इंगीत काय तें समजेना, परंतु त्यास इतकें मात्र वाटलें कीं, आईस आनंद झाला आहे खास.

असो. आनंदातिरेकाचा भर ओसरल्यावर थामस लागला " आई, मी आतां सामान व सुतार पाहण्यास जातों " व त्याप्रमाणें त्या दोघा भावांनीं शेजारच्या शहरीं जाऊन, घरास लागणारें सर्व सामान खरेदी केलें व मेस्त्री पाहून घर बांधण्यास सुरवात केली.

सुताराच्या हाताखालीं मदत करण्यास थामस लागला. जेम्सही आपलें काम संभाळून, फावल्या वेळांत त्यास मदत करी व सुतारकाम लक्ष्यपूर्वक पहात बसे. चिखलाचा गारा तयार करणें वगैरे अनेक कामें तो तत्परतेनें

करी. ही त्याची तरतरी व उत्सुकता पाहून, सुतार त्यास ह्मणाला "जेम्स, तुझ्या मनांत आह्मांस मदत करावी असें आहेसें दिसतें, तर मग हा विंधा घे व सर्व दारकशींच्या कुसांना भोकें पाड बघूं."

जेम्सनें तें काम इतक्या उत्तम प्रकारें केलें कीं, त्या सुतारास तें पाहून फार समाधान वाटलें व त्यानें त्यास दुसरीं कामें सांगण्यास सुरवात केली. फळ्या रंधून साफ करणें, खिळे ठोकणें वगैरे बारीकसारीक कामें जेम्स करूं लागला. याप्रमाणें लक्ष्यपूर्वक अवलोकनानें व हुशारीनें बरेंच बारीकसारीक सुतारकाम घर बांधण्याचें काम चालूं असतां तो शिकला.

कांहीं दिवसांत घर पुरें झालें. मंडळी नव्या घरांत राहूं लागली व पुढें थोडेच दिवसांनीं थामस परत आपल्या कामावर गेला. थोडेंसें सुतारकाम येऊं लागल्यापासून, हा धंदा पैसा मिळविण्यास चांगला आहे असें त्यास वाटूं लागलें व कांहीं दिवस गेल्यावर तो आपल्या आईस ह्मणाला "आई, पैसा मिळविण्याची मीं एक नवी युक्ति काढली आहे."

"कोणची?" असा गार्फील्डबाईनें प्रश्न केला.

"सुतारकाम करणें."

"तें काम तुला झेंपेल असें मला वाटत नाहीं."

"कां?" असें जेम्सनें मोठ्या उत्सुकतेनें विचारिलें.

"तुला शेताचेंच काम फार पडतें, तेव्हां दोन्हीं कामें तूं कशीं साधणार?"

"असं नाहीं हीं आई. ज्यावेळीं घरीं काम नसेल, त्यावेळीं सुतारकामावर जाण्याचा माझा विचार आहे."

"तूं िकामा असशील त्याचवेळीं काम मिळणें ह्मणजे जरा जडच."

"हो, तें कांहीं अंशीं खरेंच; परंतु मी प्रयत्न तर करून पाहतों. तुझं तर नेहमीं सांगणं असतं कीं, 'प्रयत्न करून' पहावा, प्रयत्नाअंतीं परमेश्वर.

आपल्या मुलाच्या मनावर उपदेशाचा ठसा उत्तमप्रकारें उठलेला पाहून तीस फार समाधान वाटलें व तिचे मनांत त्यानें सुतारकामावर जाणें असं जरी फारसें नव्हतें तरी, आपल्याच बोलण्याचें उदाहरण देऊन यानें आपणास अडविलें असें जेव्हां तिनें पाहिलें, तेव्हां ती त्यास ह्मणाली "बरं तर, प्रयत्न करून पहा."

" मी आतां आपलें घर बांधण्यास जो सुतार आला होता त्याच्याकडे जातों; व हल्लीं मला मोकळीक आहे तर कांहीं काम मिळाल्यास पाहतों. मला तर मोठी इच्छा आहे कीं, थामसप्रमाणें मीं कांहीं तरी तुजकरितां कमवून आणावें. "

असें बोलून तो जो तडक निघाला तो सुताराचे घरीं आला. त्या सुताराचें नांव ट्रेट असें होतें. त्यानें जेम्स यास पाहतांच विचारलें " जेम्स, कसं काय ? आई बरी आहे ना ? "

" हो बरी आहे " असें जेम्स ह्मणाला.

" कां ? आताशें शेतांत फारसं काम नाहीं वाटतं ? "

" नाहीं फारसं आणि ह्मणून मी कांहीं काम मिळालं तर पहावं ह्मणून आलों आहें. "

" असं काय ? बरं तर, तुला कसलें काम पाहिजे ? "

" सुतारकाम, दुसरं काय ? "

" बरं, तुझी ही उद्योगप्रियता पाहून, मला फार आनंद झाला. मला आळशी पोरांचा मोठा तिटकारा आहे व त्या वर्गांतील तूं नाहींस. "

" आणि तसं मीं नसावं अशी माझी फार इच्छा आहे. माझा असा विचार आहे कीं, टामप्रमाणें आपण आईच्या कांहीं तरी उपयोगीं पडावें आणि ह्मणून मी येथें आपणाकडे आलों. "

" वः हें फार चांगलं. तुझ्या आईसारखी आई मिळणें मोठ्या भाग्याचें काम आहे आणि अशा आईस जे मुलगे मान देतात त्यांचें कल्याणच होतें. "

जेम्स यास ट्रेट हा उगाच बोलण्यांत वेळ घालवीत आहे असें वाटून तो मध्येंच ह्मणाला " बरं, मग मला कांहीं काम देतां का ? "

" हो, मोठ्या खुशीनें. मला पुष्कळ फळ्या रंधावयाच्या आहेत आणि तें काम मी तुला देतों. माझी खात्री आहे कीं, तूं तें काम उत्तम करशील. तुमचं घर बांधतांना तूं जें काम केलेंस तें मी कांहीं अजून विसरलों नाहीं. "

" बरं, त्याबद्दल तुह्मी मला काय देणार ? "

" एक फळीला एक सेंट ( सुमार अर्धा आणा ) आणि ही मजुरी कांहीं कमी नाहीं. "

" तुह्मांला त्या फळ्या केव्हां पाहिजेत ? "

" जितक्या लवकर तयार होतील तितक्या बऱ्या. "

" बरं तर, मी उद्यां येतों व कामास सुरवात करितों. "

याप्रमाणें बोलणें होऊन तो घरीं आला. त्यानें घडलेली सर्व हकीगत आपले आईस सांगितली. तेव्हां ती ऐकून घेऊन, ती त्यास ह्मणाली " बरं, तुला काम मिळालं ठीक झालं. मला नव्हतं वाटत तुला काम मिळेल ह्मणून. "

" आई, प्रयत्न केला कीं, सर्व मिळतं " असें जेम्स ह्मणाला.

" बरं, आतां कामावर कधींपासून जाणार ?

" उद्यां सकाळपासून. "

" ठीक, पण प्रकृतीची काळजी बाळग, जिवाविशेष काम करूं नको. तूं अझून लहान आहेस. रंधा करण्याचें काम दिवसांत तीन तास तूं केलेंस कीं पुरे; दोन तास केलंस तरी पुष्कळ झालें. "

" नाहीं, मी सहा तास काम करीन. दोन तीन तास काम केलं तर सर्व मला हंसतील आणि ' लहान बाळ अगदीं ' असं ह्मणतील. "

" असं ह्मणतील असं मला नाहीं वाटत, व मेस्त्र्यांचं मत तर माझ्यासारखंच पडेल. लहान मुलांनीं फार काम करणं चांगलं नाहीं. त्यापासून त्यांच्या शरीरास इजा पोंचते. तुझा स्वभाव मी जाणून आहें. तुला जर कोणीं सुचविलें नाहीं तर, जिवापाड मेहनत करण्यास तूं कधीं चुकणार नाहींस. "

हें गार्फील्ड बाईचें बोलणें अक्षरशः खरें होतें. जेम्सची इच्छा व उत्साह कांहीं अचाट होतीं. सकाळीं लवकर उठून तो ट्रेट मेस्त्रींकडे गेला. तो इतका लवकर आलेला पाहून, त्यास फार आश्चर्य वाटलें व ताबडतोब त्यांनीं त्यास काम दिलें. रंधा घेऊन फळ्या साफ करण्यास सुरवात झाली. फळी सुमार बारा फूट लांब व फूटभर रुंद होती. सायंकाळपर्यंत सपाट्यानें

काम चाललें होतें. आंगावर घामाच्या धारा लागल्या होत्या, तरी त्याच्या चेहऱ्यावर थकल्याचें चिन्ह मुळींच दिसत नव्हतें. दिवस मावळण्याच्या सुमारास रंधा त्यानें खालीं ठेवला व तो ट्रेट मेस्त्रींस ह्मणाला:— मेस्त्री, शंभर फळ्या झाल्या.

" शंभर नसतील जेम्स, खरंच शंभर झाल्या ? "

" हो, मी मोजून शंभर भरल्या आहेत. तुह्मी पुन्हां पाहिजे तर मोजा. "

" फार काम केलंस ह्मणावयाचं ! " इतकें बोलून, त्यानें फळ्या मोजण्यास सुरवात केली; व मोजून आटपल्यावर तो ह्मणाला " बरोबर शंभर. तुझ्या वयाच्या मुलानें एका दिवसांत इतकें काम करणें ह्मणजे फार आहे. दुसऱ्या वेळीं फार तर याच्या अर्ध्यानें मी तुला करूं देईन. "

" मी कांहीं फार थकलों नाहीं " असें जेम्स ह्मणाला.

" हो, तें खरं. पण या वयांत जर इतकं काम तूं केलंस तर पुढें माझ्याएवढा झाल्यावर तुझ्यानें कांहीं काम उठणार नाहीं व लहानपणचे अचाट श्रम पुढें तुला फार जांचतील. "

या बोलण्याचा तथ्यांश जेम्स यास न समजून, तो ह्मणाला " अं: त्याला अद्याप पुष्कळ दिवस आहेत. "

" बरं, आतां मजुरी घे " असें ह्मणून त्यानें त्यास शंभर सेन्ट ह्मणजे एक डॉलर मोजून दिला व तो घेऊन जेम्सनें आपल्या खिशांत टाकला.

वाचकहो, ते पैसे पाहून जेम्स यास किती धन्यता वाटली असेल बरें ! खिशांत पैसे टाकून स्वारी रस्त्यानें चालली असतां, त्याचे डोक्यांत नानाविचार येत होते. त्यावेळीं त्यास जो आनंद झाला होता तसा आनंद साऱ्या जन्मांत त्यास झाला नाहीं. पुढें पावडेओढ त्यानें पगार मिळवला पण आजच्या एक डालरचें माहात्म्य कांहीं अवर्णनीय होतें. त्याच्या अंत:करणांत आनंदाच्या उकळ्यांवर उकळ्या फुटत होत्या. " एक दिवसांत डॉलर! असे पाउणशें दिवस काम केलें कीं टॉमइतके पैसे आपण मिळवूं " असे अनेक विचार त्याचे मनांत घोळत होते. त्याला या विचारांत पायाखालचा रस्ता केव्हां संपला हें देखील समजलें नाहीं. तो घरांत शिरतांच आईस हांक मारून ह्मणाला " आई, हे घे पैसे. "

" काय जेम्स, इतके सगळे तूं मिळवलेस ! " असें गार्फील्डबाई ह्मणाली.

" हो आई, शंभर सेंट. "

" एका दिवसाची इतकी मजुरी ! "

" हो, मीं शंभर फळ्या रंधून साफ केल्या. "

थामसनें पैसा मिळवून आणला त्यावेळीं गार्फील्डबाईस जो आनंद झाला होता तो आनंद ह्या आनंदापुढें कांहींच नाहीं. थामसच्या व याच्या वयांत आठ वर्षांचें अंतर व इतक्या लहान वयांत एखाद्या मोठ्या बाप्याप्रमाणें मजुरी करून पैसा आणणें ह्मणजे लहान काम नव्हे; तेव्हां त्याची तीस धन्यता वाटणें साहजिकच आहे. तिनें त्यास एकदम पोटाशीं घेतलें व कांहींवेळ ती अगदीं स्तब्ध राहिली. आनंदानें तिचा कंठ अगदीं दाटून आला व तिच्यानें शब्द बोलवेना !

असो. याप्रमाणें जेम्सची सुतारकामास सुरवात झाली. ट्रेट मेस्त्रीस तो मनापासून व कसून काम करणारा असल्यामुळें, फार आवडे व त्यांच्या द्वारें त्यास त्या कामाची बरीच माहिती होऊन, त्यास कामही चांगलें मिळूं लागलें. पुढें हिंवाळा आला तसा तो शाळेंत जाऊं लागला. शाळेंत जाण्यांत त्याची कधींही हयगय नसे. शेतकाम असेल तेव्हां तें, शाळा असली कीं शाळा व रिकाम्या वेळांत सुतारकाम, असें चाले. असें करून त्या चार सहा महिन्यांत त्यानें सुमारें वीस डालर कमाविले.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें शाळा उघडी असली कीं, जेम्स शाळेंत जाई. त्यावेळीं खेड्यापाड्यांतील शाळांत जें शिक्षण मिळे तें बहुतेक आतां त्याचें पूर्ण झालें होतें. कांहीं कांहीं बाबतींत शिक्षकापेक्षांही त्यास जास्त समजत असे. त्यानें अंकगणिताचें पुस्तक सर्व सोडविलें होतें. शाळेंतून आल्यावर शेकोटीशीं उपडा पडून, तिच्या उजेडांत तो उदाहरणें सोडवी.

एकदां असें झालें कीं, वर्गांत एक उदाहरण बरेच वेळ मुलांस सुटेना. मास्तरनींही तें सोडविण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. अखेरीस ते ह्मणूं लागले कीं, ' पुस्तकांतील उत्तर चुकलें असावें ' व त्यांनीं हेनरी नांवाचा मुलगा चांगला उदाहरणें सोडविणारा होता त्यास पुन्हां तें उदाहरण

करून पाहण्यास सांगितलें. त्यानें केलें तरी उत्तर जमेना. तेव्हां शिक्षक ह्मणाले " पुस्तकांतील उत्तरच चुकलें असलें पाहिजे. ? "

त्यावर जेम्स ह्मणाला " मास्तर, मीं तें एकदां सोडविलें आहे "

" आणि पुस्तकाशीं तुझं जमलं होतें ? "

" हो, जमलें होतें असं मला वाटतें. "

" कर बघूं तर " असें पंतोजी ह्मणाले.

जेम्सनें उदाहरण करून उत्तर काढलें, व तें पुस्तकाशीं मिळालें. पंतोजीनीं त्याची रीत नीट तपासून पाहिली व ते त्याल ह्मणाले " जेम्स, तुझें बरोबर आहे. "

मास्तरला न येणारें उदाहरण जेम्सनें केलेलें पाहून सर्व मुलांस मोठें आश्चर्य वाटलें व तीं त्या वेळापासून त्याच्या अगदीं भजनीं लागलीं.

जेम्सनें दुसरीं अनेक पुस्तकें मागून आणून वाचलीं. चांगलें पुस्तक आढळलें कीं, जेम्स तें इतके वेळां वाची कीं, त्यांतील शब्दनी शब्द त्याचे ध्यानांत असे. याप्रमाणें क्रम चालूं असतां, एकदां तो आपलें आईस ह्मणाला ' आई, शेतवाडी करण्यास आपण एक चाकर ठेवूं व मी बाहेर कामावर जातों. मला जी मजुरी मिळेल त्यांतून चाकराचा पगार सुटून आपणांस बराच फायदा पडेल. ' परंतु त्याच्या आईनें पैशाच्या लोभांत न गुंततां त्यास नानाप्रकारचा उपदेश करून, ती सूचना अमान्य केली व बाहेर गांवीं जाण्याचा त्याचा बेत तूर्त तर पाडला.

जेम्स हा स्वभावानें कनवाळू व उदार मनाचा मुलगा होता. शाळेंत जर एखादें गरीब मूल असलें व इतर मुलें त्याच्या राशीस लागत असलीं तर, जेम्स हा नेहमीं त्या गरीब मुलाची कड घ्यावयाचा. तो स्वभावतःच आनंदी होता व त्याचे संगतीपासून सर्वांस आनंद होई. तो जर एखादवेळ खेळांत नसला तर, खेळास रंग ह्मणून कधीं यावयाचा नाहीं. याशिवाय त्याचें सभ्यपणाचें वर्तन असल्यामुळें एकंदर मुलांवर त्याचें वजन असे व खेळांत बखेडा कधीं उत्पन्न होत नसे. या व अशा अनेक गुणांनीं तो बरोबरच्या मंडळीस फार प्रिय झाला होता. असें जरी होतें तरी, एखादी वाईट गोष्ट मुलांच्या हातून

झाली, अगर ते करूं लागले तर, तो तावडतोब त्यांचे कान उघडी व त्यांच्या कृतीचा उघडपणें निषेध करी.

एकदां असें झालें कीं, शाळेंत एक त्याप्रमाणेंच गरीब व पोरका मुलगा होता. त्याची कड घेण्यास त्याचीं वडील भावंडें वगैरे कोणीच शाळेंत नव्हतीं. पोरस्वभावास अनुसरून, सर्व मुलें त्या मुलाची थट्टा करीत व अनेक रीतीनें त्यास त्रास देत, हें जेम्सच्या नजरेस आलें. जेम्स हा त्या मुलापेक्षां मोठा होता, परंतु त्याच्यापेक्षांही चिडविणाऱ्या मुलांत मोठालीं मुलें होतीं. तेव्हां धाकदपटशा देऊन तीं थोडींच ऐकावयाचीं आहेत. तेव्हां हा त्रास बंद करण्याची त्यानें निराळीच युक्ति काढली. तो एके दिवशीं त्या मुलांस ह्मणाला " आपल्यापेक्षां लहान मुलाला असें चिडवणें व त्याची थट्टा करणें कांहीं चांगलें नाहीं. त्यांतून तुह्मांस चैनच पडत नसेल तर माझी खुशाल थट्टा करीत जा. "

' बरं, तुला चिडवूंहो ? ' असें एक मुलगा ह्मणाला.

' तुह्मांला वाटेल तें करा. पाहिजे तितका मला त्रास द्या, पण त्या गरीब बिचाऱ्याच्या वाटेस जाऊं नका. काय थट्टा, मस्करी करणें ती आपल्या बरोबरीच्याशीं करावी. लहानांना काय त्रास द्यावा. '

' वः तूं तर अगदीं त्याची बाजू उचलली आहेस. त्यांत तुला इतकं चांगलं काय वाटलं बोवा ? '

" चांगलं काय व वाईट काय, त्याची बाजू घेण्यास नाहीं त्याला बहीण कीं भाऊ आणि ह्मणून मी त्याची कड घेणार. "

" वः तर आतां जेम्स दादा झाले वाटतं ? " असें दुसरा एक मुलगा ह्मणाला.

' हं वाटेल तें ह्मणा. दादा ह्मणा, बाबा ह्मणा, परंतु त्याचे वाटेस जाऊ नका. ' अशाप्रकारें थट्टा करणाऱ्या मुलांची त्यानें टर उठविली.

जेम्स जवळ जवळ आतां चवदा वर्षांचा झाला होता. तो जन्मापासून बळकट, बांध्यानें मजबूत असल्यामुळें, त्याच्या वयाच्या इतर मुलांपेक्षां तो फार मोठा दिसे. या वयांत मोठ्या मनुष्याबरोबर काम करण्यास तो

डगमगत नसे. याच वर्षांत घडलेली एक गोष्ट सांगून आपण पुढील वृत्तांताकडे वळूं.

एके दिवशीं सकाळींच जेम्सचा एक एडविन नांवाचा सोबती व तो असे क्लिव्हल्यांड येथें जावयास निघाले. एडविननें आपली गाडी घेतली होती व क्लिव्हल्यांड येथील काम आटोपून ते परत येत असतां, त्यांच्या मागून एक इसम गाडी घेऊन येत होता. त्यानें पुढील गाडींत लहान लहान दोन पोरेंच पाहून, तो त्यांस ह्मणाला ' चलारे पोरांनों, गाडी बाजूला घ्या व मला जाऊं द्या. मला फार घाई आहे. ' असें बोलून त्यानें घोड्यास चाबूक मारला व गाडी पुढें घेऊं लागला.

एडविनचा घोडा कांहीं वाईट नव्हता. त्यानें त्यास एक चाबूक लगावला व तो त्या गृहस्थास ह्मणाला ' जा बघूं कसा पुढें जातोस तो, आह्मांलाही घाई आहे. '

रस्ता चांगला मोठा होता. सुमार अर्धा तास त्यांची शर्यत चालली होती. तो गाडी बाजूस काढी व हे त्यास पुढें जाऊं देत ना. अखेर त्या इसमाचा घोडा थकला व तो अगदीं संतापून जाऊन, त्यांस शिव्यागाळी देऊं लागला. त्याची गाडी बरीच मागें पडली. हे पुढें आले व रस्त्यांत एक फराळाचें दुकान होतें. त्याठिकाणीं जरा विसावा घ्यावा ह्मणून, त्यांनीं आपली गाडी सोडली व ते आंत शिरले. इतक्यांत मागून त्या गृहस्थाची गाडी आली. त्यांची गाडी तेथें सुटलेली पाहून, त्यानें आपली गाडी थांबविली व शिव्या देत देतच ती स्वारी आंत आली; व तो ओरडून ह्मणाला ' थांबा. गुलामांनों, तुह्मांला चांगला चोप देतों. '

' कां ह्मणून ? ' असें एडविननें विचारलें.

' मला पुढें जाऊं दिलें नाहींत, आणखीं तोंड करून कां ह्मणून विचारतां होय. थांबा सांगतों. ' असें ह्मणून आंगरख्याच्या बाह्या वगैरे सारून स्वारी पुढें आली.

' तुह्मीं मला कां पुढें जाऊं दिलें नाहीं ? ' असें तो रागानें ह्मणाला.

' तूं कां गेला नाहींस ? रस्त्यांत आणखी दोन गाड्या वळविण्याची जागा होती. ' असें जेम्सनें त्यास शांतपणानें उत्तर दिलें.

'मला नाहीं जातां आलं. पण तुह्मीं कां नाहीं जाऊं दिलंत ?'

'त्यांत आमचा काय बोल ? तुझ्या घोड्याला बोल लाव.' असें जेम्स ह्मणाला व ते मुलगे एकमेकांकडे पाहून हसूं लागले. हें पाहून त्या गृहस्थास अधिकच चेव आला व तो चिडून जाऊन त्यांस मारण्यास आला.

'मार बघूं, पहिल्यानें मला मार' असें जेम्स तटकर जागेवरून उठून मोठ्यानें ओरडून ह्मणाला; जणूं काय मला पोर समजतोस. पण तुला पुरून उरेन असें सांगण्याचाच त्याचा उद्देश दिसला.

त्याचा तो अविर्भाव पाहून तो गृहस्थ जरा थबकला व ह्मणाला 'कां तुला काय ह्मणून अगोदर ?'

'कारण, मला मारायला आल्यावर, दुसऱ्यास मारण्याची तुला मेहनत नको,' हें जेम्सचें बोलणें ऐकून त्या गृहस्थानें आपला गाशा गुंडाळला व तो तडक चालता झाला.

पुढें ते मुलगे आपल्या घरीं आले. वाटेंत घडलेल्या प्रसंगावर त्यांचें बरेंच बोलणें झालें. एडविन ह्मणाला 'जेम्स, त्याला बराच दम दिलास ह्मणावयाचा. तो तर पक्का भित्रा होता.'

'अरे, तें तर मला पहिल्यापासूनच वाटलं होतं. नाहींतर या फंदांत मी पडलोंच नसतों. परंतु त्या राजश्रींच्या शिव्या वगैरे ऐकून, जरा गम्मत करावीसें मला वाटलें. मला एखाद्याची कुरापत काढून, भांडण करणें मुळींच आवडत नाहीं. पण ती स्वारीच कांहीं निराळी होती.'

जेम्स मूर्ख नव्हता व हलकटही नव्हता. तो कधीं कोणाच्या कलागतींत व भानगडींत पडत नसे. तरीं, ज्या ठिकाणीं आपला योग्य हक्क आहे असें त्यास वाटे, त्याठिकाणीं तो संपादन करण्यास तो कधींही मागें घेत नसे. तो आपल्या सोबत्यांस योग्य प्रसंगीं धैर्यानें साह्य करी. परंतु अयोग्य बाबतींत त्यांची तो मुळींच कड घेत नसे. सारांश, त्याची प्रत्येक कृति त्याच्या विचाराची द्योतक असे. त्याच्या विचारांत व आचारांत काडीचा फरक नसे. उगाच भरीं भरून हेंकटपणानें तो कोणतीही गोष्ट करावयाचा नाहीं.

त्याच्या प्रत्येक वर्तणुकींत बोलण्याशीं मेळ असे; व लहान कां काम असेना, तें देखील तत्त्वाला धरून असावयाचें; असा त्याचा जन्म-स्वभावच होता.

# भाग ५ वा.

## लहान नावाडी.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें, शेतवाडी करण्याचा हंगाम जेव्हां नसेल तेव्हां जेम्स ट्रेट मेस्त्रींकडे कामास जाई. तो एकदां क्लिव्हल्यांडजवळ असलेल्या गांवीं बार्टन नांवाच्या इसमाकडे कांहीं सुतारकाम करण्याकरितां गेला होता. तो गृहस्थ पोटच्याशच्या कारखान्याचा मालक होता. त्याचें लक्ष्य जेम्सकडे गेलें व त्याची तरतरी वगैरे गुण पाहून त्यास वाटूं लागलें कीं, हा मुलगा आपल्या कारखान्यांत नोकरीस राहिल्यास बरें. हा विचार त्याचे मनांत येतांच, त्यानें त्यास सुमार २८ रुपये दरमहा पगार देऊं करून आपलेकडे चाकरीस राहण्याविषयीं विचारलें. जेम्सला ही चाकरी बरी वाटून त्यानें आईस विचारून आल्यावर काय तो नक्की जबाब देण्याचें ठरविलें. काम आटपल्यावर जेम्स आपल्या घरीं गेला व त्यानें ही गोष्ट आपले आईजवळ काढली. पंधरा वर्षांच्या वयांत अठ्ठावीस रुपये दरमहाची नोकरी व ती कायमप्रमाणें मिळावयाची, हें पाहून त्यास फार आनंद झाला होता. तो घरीं येतांच आपले आईस ह्मणाला "आई, मीं एक नोकरी पाहिली आहे. दरमहा चवदा डॉलर पगार असून, पुन्हां मी करीन तितके दिवस ती चालेल."

'कोठें ?' ह्मणून त्याच्या आईनें मोठें आश्चर्य वाटून विचारिलें.

'पोटॅचाशचा कारखानदार बार्टनसाहेब आहेना, त्याचेकडे.'

'जेम्स, असली नोकरी तुला योग्य नाहीं.'

आला कीं, ईश्वर मार्ग दाखवितो ' व या बाबतींत तोच मला वाट दाखवीत आहे असें मला वाटतें आणि तसं जर नसेल तर सर्व जन्मांत तरी तो मला मार्ग दाखवील कीं नाहीं कोण जाणे. ''

' पोटॅशच्या कारखान्यांत आपल्या मुलाची योजना ईश्वर करील, ' असें त्या माउलीस वाटत नव्हतें. परंतु जेम्सची इच्छा व आपल्याच शब्दांत त्यानें आपणास पकडलेलें पाहून, ती ह्मणाली ' कोणीं सांगावें ? कदाचित् या मार्गानेंच ईश्वराचे मनांत तुला वर आणणें असेल. बार्टन साहेबांच्या कारखान्यांत जाऊन, कोणत्याही मोहपाशांत न पडतां, तूं आपलें वर्तन शुद्ध ठेवलेंस तर खरोखरच ईश्वरानें तुला रस्ता दाखविला ह्मणायाचा. हें सर्व तुजवर अवलंबून आहे. '

' तर मग मला परवानगी दे. '

' हो, माझी परवानगी आहे व तिचा शेवट गोड होवो ह्मणजे झालें. '

असो. याप्रमाणें आईची आज्ञा संपादून जेम्स सोमवारीं बार्टन साहेबांकडे गेला. तो आलेला पाहून त्यांस फार समाधान झालें व आपल्या निजावयाच्या खोलींत त्यास सामान ठेवावयास सांगून, आपणाबरोबर ते त्यास कारखान्यांत घेऊन गेले.

पोटॅश करण्याचा कारखाना ह्मणजे घाणीचें आगर. सगळा कारभार राखाडींत. परंतु जेम्सला हे घाणींचें काम नव्हतें. त्याचें काम हिशेब ठेवण्याचें असून, गिऱ्हाईकांस माल देणें व मजुरांस रोजमुरा चुकता करणें वगैरे दुसरीं कामें त्याजकडे होतीं. तो हीं कामें करून शिवाय इतर सर्व कामांवर देखरेख करी. सकाळीं सर्वांपूर्वी व सायंकाळीं सर्वांमागून कारखान्यांत जाण्यायेण्याचा त्याचा क्रम असे—जेम्सचें चोख वर्तन व काम करण्याची तत्परता पाहून, त्याचा यजमान फार खुश झाला व त्याचा त्यावर पूर्ण विश्वास बसून, त्यावर पोटच्या पोराप्रमाणें तो ममता करू लागला.

एके दिवशीं असें झालें कीं, एका इसमानें राखेची गाडी कारखान्यांत आणली व तींत पंचवीस बुशेल राख आहे ह्मणून तो ह्मणूं लागला.

बार्टनसाहेबांची अशी पद्धत असे कीं, गाडीवाला सांगेल तें माप खरें धरून, त्यास पैसे चुकते करावयाचे. परंतु, जेम्स कामावर आल्यापासून ही पद्धत बदलली. तो स्वतः माप घेई व नंतर पैसे चुकते करी. त्याप्रमाणें गाडीचें माप घेतलें, तों तींत बेवीस बुशेल राख भरली.

' बेवीस बुशेल राख आहे ' असें जेम्सनें गाडीवानास सांगितलें.

' माझ्या मापानें पंचवीस होती ' असें गाडीवान ह्मणाला.

' असेल, पण माझ्या मापानें बेवीस भरली आहे व तितक्याचे पैसे तुला मिळतील, जास्त कांहीं मिळणार नाहीं. '

' मोजण्यांत तुमची कांहीं चूक झाली असेल ? '

' जर कांहीं चूक असेल तर ती तुझी असेल. एका डोक्यापेक्षां तीन डोकीं जास्त हें कोणी सांगेल. मापावर आमचं तिघांचं लक्ष्य होतं. बेवीस बुशेलांचा पैसा तुला घ्यावयाचा आहे का ? '

' बरं द्या ' असें त्यानें तडफडत उत्तर दिलें.

इतक्यांत बार्टनसाहेबही तेथें आले. जेम्सनें झालेली सर्व हकीगत सांगून, लोक त्यांच्या डोळ्यांत अनेक बाजूनें कशी धूळ टाकीत आहेत, हें स्पष्टपणें त्यांचे नजरेस आणून दिलें—या व अशा अनेक प्रसंगांवरून जेम्सवर त्याच्या धन्याची पूर्ण मर्जी बसली व त्यावरील विश्वास उत्तरोत्तर वाढत चालला.

कारखान्यांत काम करणारीं माणसें बहुतेक हलकट असतात, असें जेम्स यास त्याचे आईनें पूर्वींच सांगितलें होतें; परंतु त्यास त्यांपाशीं त्या कामाव्यतिरिक्त कांहीं करावयाचें नसल्यामुळें त्याचें वर्तन मुळींच बिघडलें नाहीं. परंतु जेम्सच्या आईच्या स्वप्नींही नसेल अशा मंडळीपासून जेम्सचे मनावर फार वाईट परिणाम झाला.

पुस्तकें वाचण्याची आवड आहे असा कोणताही मुलगा कोठेंही असेना, हरप्रयत्न करून त्या ठिकाणीं मिळण्यासारखीं पुस्तकें हुडकून काढावयाचाच. त्या नियमास अनुसरून, जेम्स यानें आपल्या धन्याचे घरांतील पुस्तकें हुडकून काढलीं व तीं वाचण्याचा सपाटा चालविला. या पुस्तकांत बहुतेक

पुस्तकें प्रवासवर्णनाचीं व त्यांतून दर्यावरील सफरींच्या वर्णनाचीं फार होतीं. या पुस्तकांतून धाडशी पुरुषांचीं अचाट कृत्यें तिखटमीठ लावून वर्णन केलेलीं असल्यामुळें, तीं सर्व जेम्सनें झाडून वाचून काढलीं. मोठ्या हलकट लोकांपासून जो वाईट परिणाम त्याचे मनावर झाला नसता, तसला दुष्ट परिणाम या पुस्तकावलोकनानें झाला. धाडशी पुरुषांचीं अचाट कृत्यें वाचून, त्याचे अंत:करणावर भलताच परिणाम झाला. स्वभावत:च त्याचे ठायीं अनुकरणशक्ति प्रबल असल्यामुळें, त्या पुस्तकांतील एकतर्फी वर्णनें वाचून त्याचे मनांत आपण अशींच अचाट कृत्यें करून नांवलौकिक मिळवावा असें येऊं लागलें. हाच विचार दिवसरात्र त्याचे मनांत घोळत होता. आपण खलाशी झाल्यास अनायासें आपणास अनेक देश पाहण्यास सांपडतील व पुढें मागें कामांत वाकब झाल्यावर एखाद्या तारवावर आपण कप्तान होऊं. मग आपल्या अक्कलेनें व बुद्धीनें अनेक नवे देश शोधून काढूं व पुष्कळ धनदौलत व लौकिक संपादूं. असे एक ना दोन हजारों विचार त्याचे मनांत येत होते. हा आपला विचार एकदोनदां त्यानें आपल्या धन्यासही बोलून दाखविला. तसें करूं नये ह्मणून त्यानें त्यास बराच बोध केला. त्याचें काम पाहून तो फार खुश झाला होता व त्यानें आपली नोकरी सोडून जाऊं नये, नेहमीं येथेंच चिकटून रहावें ह्मणून, अनेक रीतीनें त्यानें त्यास बोध केला. पगार वगैरे वाढविण्याची लालूचही दाखवून पाहिली व अशा प्रकारें त्याचे मनाचा समुद्रपर्यटनाकडील कल फिरावा ह्मणून अनेक प्रयत्न केले. परंतु त्याचे मनांतील समुद्रपर्यटनाविषयींची उत्पन्न झालेली प्रबलेच्छा कांहीं केल्या कमी होईना.

असो. अशाप्रकारें तो दिवस कंठीत असतां, पुढील अकस्मित प्रसंगानें तो त्या कारखानदाराची नोकरी सोडून निघाला.

जेम्स हा बार्टनसाहेबांकडेच राहत असे. जेवणखाणाची सर्व व्यवस्था त्यानें तेथेंच केली होती. बार्टन साहेबांस एक मुलगी होती, त्याशिवाय त्यास दुसरें अपत्य नव्हतें. ती उपवर झालेली असून, तिच्या विवाहाचा निश्चयही एका गृहस्थाबरोबर ठरला होता. तो गृहस्थ एके दिवशीं रात्रीं

त्यांचे घरीं आला होता. बार्टनसाहेबांच्या घरास तळमजल्यांत एकच वठाण होतें व वरतीं सर्वांच्या निजण्याच्या खोल्या होत्या. जेवणखाण आटपल्यावर, एका कोपऱ्यांत जेम्स, त्याचा धनी व धनीण अशीं एका शेकोटीशीं बसलीं असून दुसरे बाजूस तें भावी दंपत्य बसलें होतें. जेम्सचा बेत धनी उठला कीं, ताबडतोब उठून निजण्यास जाण्याचा होता. परंतु तो एक उदाहरण सोडविण्याचे नादांत गुंतला असल्यामुळें धनी केव्हां वर गेला तें त्यास समजलें नाहीं. जेम्स तेथें असल्यामुळें त्या दंपत्यास मोकळे-पणें बोलण्यास अडचण येऊं लागली व बराच वेळ झाला तरी तो उठत नाहीं असें पाहून, ती मुलगी त्यास उद्देशून मोठ्यानें ह्मणाली ' नोकर लोकांची आतां निजावयास जाण्याची वेळ झाली. ' हे शब्द कानीं पड-तांच जेम्स आपल्या नादांतून जागा झाला. इतकेंच नाहीं तर त्या मुलीचे बोलण्याचा त्याचे मनावर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, तो रागारागानें उठला व कांहीं एक न बोलतां आपले खोलींत गेला. निजावें ह्मणून तो हंतरुणावर पडला मात्र. परंतु सर्व रात्रींत त्यास झोंप लागली नाहीं. त्या मुलीच्या बोलण्यानें त्याची झोंप नाहींशी केली. ' नोकर, पगारी नोकर ' हे शब्द त्याच्या अंतःकरणात सारखे सलत होते. ' या ठिकाणीं नोकरापेक्षां माझी जास्त योग्यता नाहीं होय ? ठीक आहे. मी नोकर नाहीं हें त्यांस उद्यां दाखवितों. नोकरापेक्षां मला जास्त योग्य-ताच नाहीं काय ? नाहीं, मी यापेक्षां जास्त योग्यता संपादीन. पाणी पिण्यास देखील मी येथें राहणार नाहीं. उद्यां मी या मुलीला दाखवितों कीं, मी नोकर नाहीं तर, नोकर ठेवण्याची माझ्यांत योग्यता आहे. ' याप्रमाणें अनेक विचार त्याचे मनांत रात्रभर घोळत होते. सकाळ होतांच त्यानें आपलें गाठोडें बांधलें व धन्याची परवानगी घेण्यास गेला. त्यानें रहावें ह्मणून त्या कारखानदारानें काय काय केलें; पण जेम्सचा घरीं जाण्याचा संकल्प झाला होता; तो काय राहतो ? अखेर धन्यानें हिसाब चुकता केला व ती स्वारी जी निघाली ती तडक घरीं येऊन दाखल झाली.

घरांत शिरतांच आईस हांक मारून ह्मणाला ' आई, झाली नोकरी. '

‘ कां, मध्येंच कां आलास ? जेम्स. ’

‘ दुसरं कांहीं करीन. पण हीं नोकरी नको. ’

‘ ह्मणजे ? धन्याबरोबर कांहीं बोलाचाली झाली कीं काय ? ’

‘ नाहीं, मुळींच नाहीं. बार्टन साहेबांसारखा धनी कोठेंच मिळणार नाहीं. ’

‘ मग ? ’

जेम्सनें त्या रात्रीं घडलेली सर्व हकीगत आईस सांगितली. ती लक्ष्यपूर्वक ऐकून घेऊन, ती बोलली “ जेम्स, तूं थोडेसा उतावळेपणा केलास नव्हे ? ”

‘ उतावळा ह्मण कीं कांहीं ह्मण. झालं तें झालं. ’

‘ नोकरी करीत असतां धन्यानें तुजवर केलेली ममता, तूं ती सोडल्यामुळें त्याची होणारी गैरसोय वगैरे गोष्टींचा तूं कांहींच विचार करूं नयेस काय ? ’

‘ आणि ती मुलगी बोलली त्याचें कांहींच नाहीं ? ’

‘ मी जर असतें तर, तिची मुळींच पर्वा केली नसती. शिवाय ती बोलली त्यांत तिचा कांहीं वाईट हेतु असेल, असें मला नाहीं वाटत. आणखीं, नोकरी करणें ह्मणजे कांहीं मानहानि का आहे ? ’

‘ आई, तसं नाहीं कांहीं. नोकरी करणें ह्मणजे हलकट असें का मी ह्मणतों ? परंतु त्या मुलीनें ज्या तऱ्हेनें ते शब्द उच्चारले तिचाच मला राग येतो व ते शब्द ऐकल्यापासून नोकरी करण्यापेक्षां दुसरें कांहीं करून जगांत नांव काढावें अशी मला इच्छा झाली आहे. ’

‘ ठीक. या एकंदर प्रकाराचा ईश्वरकृपेनें शेवट गोड होवो ह्मणजे ठीक. ’

पुढें बोलतां बोलतां त्यानें आईस समुद्रपर्यटन करण्याची आपली इच्छा दर्शविली. ती ऐकून त्याचे आईस कसेंसेंच वाटलें. आपल्या मुलाच्या मनांत ही दुष्ट कल्पना कोठून आली असें तीस झालें व नानाप्रकारें उपदेश करून त्या वेळेपुरतें तर त्याचें मन तिकडून फिरविलें. परंतु जेम्सच्या नेहमींच्या एकं-

दूर वर्तनावरून त्या धूर्त बाईच्या तेव्हांच लक्ष्यांत आलें कीं, आपणांस वाईट वाटेल, दुःख होईल व आपली अवज्ञा करूं नये ह्मणून, जेम्स आपली इच्छा दाबीत आहे इतकेंच; पण त्याचें मन त्या विचाराकडून पूर्णपणें वळलें नाहीं. तिला त्याच्या स्वभावाची पूर्ण पारख होती. आपल्या मुलाची महत्त्वाकांक्षा उत्कट, दुसऱ्यानें त्याच्यावर ताबा करावा व त्यानें त्याच्या ओंजळीनें पाणी प्यावें अशी त्याची वृत्तिच नाहीं, हें ती पूर्णपणें जाणून होती. तेव्हां धाकदपटशा अगर दुसऱ्या एकाद्या प्रकारानें त्याचा बेत फिरविण्यापेक्षां नेहमीं युक्तीयुक्तीनें व त्याच्याच कलानें त्यास वाटेवर आणण्याचा ती प्रयत्न करी. जेम्सनें पुन्हां जेव्हां पूर्वींचीच आपली इच्छा दर्शविली, तेव्हां तिनें त्यास 'पहिल्यानेंच लांबच्या सफरीवर जाणें चांगलें नाहीं. तुला तो धंदा आवडतो कीं नाहीं तें तूं प्रथम जवळपासच एखाद्या मचव्यावर नोकरी धरून पहा. ह्मणजे त्यांतील सुखदुःखें तुला समजतील व नंतर पाहिजे तर मोठ्या सफरीवर जा.' असा बोध करून, जवळच्या नदींत खलाशीपणाचा धंदा करण्याची त्यास परवानगी दिली. ही परवानगी देण्यांत गार्फील्ड बाईचे अनेक हेतु होते. तिनें विचार केला कीं, कपाळीं जर वाईटच असेल तर, तें कधींही चुकणें नाहीं. तेव्हां यास मनाई करण्यापेक्षां जवळपास खलाशीपणा करण्यास परवानगी देणें बरें. तसें केल्यानें ईश्वरी कृपेनें त्याचे डोळे उघडल्यास ठीकच. दूर देशीं जाऊन संकटांत पडल्यास निराश्रित स्थितींत नाश पावण्यापेक्षां हें बरें. बरा वाईट प्रसंग गुदरल्यास जवळच असल्यामुळें, उपाय करितां येईल. याप्रमाणें दूरवर विचार करून, तिनें त्यास परवानगी दिली होती. जेम्स हा महत्त्वाकांक्षी होता पण हेंकट नव्हता. अमुक एक गोष्ट अनुभवानें वाईट असें समजल्यावर, कशीही इच्छा होईना, तो ती करीत नसे. तेव्हां अशा मुलास अनुभवानेंच ताळ्यावर आणणें चांगलें, हा जो त्याचे आईनें विचार केला, तो योग्य होता हें कोणीही सांगेल.

असो. याप्रमाणें जुलमाची कां होईना, जेम्स आपल्या आईची परवानगी घेऊन, एके दिवशीं सकाळींच निघाला, तो सुमार सतरा मैल चालून दोनप्रह-

रच्या सुमारास क्लिव्हल्यांड येथें आला व तसाच बंदरावर जाऊन, धक्याशीं असलेल्या एका तारवावर चढून, त्यांतील खलाशास ‘ तुमच्या तारवावर नवीन एखादा नोकर ठेवावयाचा आहे का ? ’ ह्मणून त्यानें प्रश्न केला. त्यावर ‘ तारवाचा कप्तान येथें नाहीं, तो लवकरच येईल ’ असा त्या खलाशानें जबाब दिला.

कांहीं वेळानें ‘ ते कप्तान आले ’ असें त्यास एकानें सांगितलें. हें ऐकून तो पाहूं लागला तों एक छाकटा, रागावलेला व निव्वळ पशूप्रमाणें वर्तन करणारा एक गृहस्थ मोठमोठ्यानें शिव्या देत येतांना त्याच्या नजरेस पडला. जेम्सनें कांहीं वेळ त्याकडे पाहिलें व नंतर सभ्यपणानें त्यास मुजरा करून विचारिलें ‘ कप्तानसाहेब, तारवावर आणखीं एकदा नोकर तुह्मांस ठेवावयाचा आहे काय ? ’

‘ जा, ठेवायाचा असला तरी तुला घाणेरड्याला कोण ठेवतो ? ’ याप्रमाणें शिव्या देतच त्यानें त्यास तारवावरून खालीं होण्यास सांगितलें.

जेम्सनें तसदी दिल्याबद्दल सभ्यपणें त्याची माफी मागितली; परंतु त्याचा शिव्यांचा वर्षाव चालूच होता व मधून मधून, ‘ माझ्या तारवावरून खालीं उतर, नाहींतर लाथ मारून खालीं काढीन ’ हें त्याचें दरडावणें चालूच होतें.

जेम्स घाईघाईनें तारवावरून धक्यावर आला. त्याच्या स्वप्नींही नसेल असा हा देखावा पाहून, त्यास किती आश्चर्य वाटलें असेल बरें ! पुस्तकांतील वाचलेलीं कप्तानांचीं वर्णनें कोणीकडे आणि प्रत्यक्ष अनुभव कोणीकडे ? याचा मेळ कसा घालावयाचा, हें मुळीं त्यास समजेना. पुस्तकांतील सर्व गोष्टी ह्मणजे विश्वसनीय असतात असें नाहीं, असें आतां त्यास वाटूं लागलें. खलाशाचा धंदा करण्याकरितां जितक्या हौशीनें तो निघाला होता, तितकी हौस आतां त्यांत राहिली नाहीं. त्याचा बराच हिरमोड झाला; परंतु ही स्थिति फार वेळ राहिली नाहीं.

या घडलेल्या एकंदर प्रकारावर विचार करीत बरोबर आणलेली शिधोरी सोडून जवळच असलेल्या एका लांकडांचे राशीवर तो बसला.

कप्तानाच्या एकंदर वर्तनाचें कांहींच तत्त्व त्यास उमगेना. बराच वेळ विचार करितां करितां त्यास वाटूं लागलें कीं, आपला गचाळ पोषाख, रीतीभातींबद्दल आपलें अज्ञान वगैरे गोष्टी पाहून त्यास राग आला असेल. अशा प्रकारच्या विचारांनीं तो आपल्या मनाचें समाधान करूं लागला व जसजशी या विचारांकडे त्याची प्रवृत्ति होऊं लागली तसतशी खलाश्याचे धंद्याबद्दल त्याचे मनांत उत्पन्न झालेली अप्रीति कमी होत जाऊन, त्याचें मन पुन्हां पूर्व पदावर आलें.

याप्रमाणें विचारतरंगांत तो गढून गेला असतां, आपणास कोणी हांक मारीत आहे असें त्यास वाटून, तो वळून पाहतो तों, आपला मावसभाऊ एमॉस लिचर हा एका मचव्यांतून आपणास हांक मारीत आहे, असें त्याच्या नजरेस आलें व तो जलदीनें त्या मचव्यावर गेला. नंतर थोडेशी विचारपूस झाल्यावर, त्यास समजलें कीं, एमॉस हा त्या मचव्याचा कप्तान आहे. त्याचे मचव्यावर एका वल्हेंवाल्याची जरूर होती व त्या जागीं बारा डॉलर पगारावर तो राहिला.

कप्तान लिचरच्या मचव्याचें नांव ईव्हिनिंग स्टार ( रात्रीचा तारा ) असें होतें व तो त्या खाडींत मोठ्या तारवांवरून माल नेण्याआणण्याचे काम करीत असे. दोन सुकाणे, दोन वल्हेंवाले, एक नालीवर काम करणारा व एक सैंपाकी इतके नोकर व सातवा कप्तान, इतकीं माणसें त्या मचव्यावर असत.

खलाशी ह्मटले ह्मणजे बहुतकरून अडदांड, हलकट व दारूबाज असे असावयाचे. सभ्यपणा तर त्या लोकांत नांवाला मिळणें नाहीं. दारू व तंबाखू ह्मणजे त्यांच्या देवता. एक वेळ जेवण नसलें तर चालेल. पण गुडगुडीशिवाय पळ जावयाचें ह्मणजे प्राणसंकट. धर्म, नीति, रीतिरिवाज यांचा गंधही त्यांस नसावयाचा. पुष्कळ व अचकट विचकट लावण्या ह्मणणारा, दारूच्या बाटल्यांवर बाटल्या ठासणारा ह्मणजे त्यांच्या मतानें मोठा श्रेष्ठ व हुशार. तेव्हां असली मंडळी जेम्सच्या संगतिलायक नव्हती हें सांगणें नको. परंतु असल्या मंडळींत देखील त्यानें आपलें वर्तन चोख ठेवून, तो सर्वत्रांस प्रिय झाला व त्याची त्यांवर छाप बसली.

जेम्स नोकरीवर लागला ते दिवशींच एका पुलाखालून मचवा जात असतां, कामाच्या गडबडींत वल्ह्यासुद्धां मचव्यावरून तो पाण्यांत पडला; पण मंडळीनें तावडतोब खबरदारी घेतल्यामुळें, तो लागलाच वर आला. मंडळीनें त्याची बरीच थट्टा केली. अखेरीस कप्तानही हंसत हंसत जेम्स यास ह्मणाला ' जेम्स, तूं खालीं काय करीत होतास ? '

' मी सकाळची आंघोळ करीत होतों ' असें जेम्सनें उत्तर दिलें.

जेम्सची कामाची पाळी आटपल्यावर तो व कप्तान एके जागीं बसले असतां कप्तानानें आपल्या हुशारीच्या बऱ्याच गोष्टी त्यास सांगितल्या. जेम्सच्या हुशारीबद्दलही त्यानें बरेच वेळां ऐकिलें होतें, तेव्हां त्याची पारख पहावी ह्या हेतूनें, त्यानें त्यास कांहीं प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें जेम्सनें लागलींच दिलीं; परंतु जेम्सनें घातलेल्या प्रश्नांचीं त्यास उत्तरें देतां येत ना.

जेम्सची अलौकिक बुद्धिमत्ता पाहून, एमॉस त्यास ह्मणाला ' जेम्स, तूं फार बुद्धिवान् आहेस व खरें पहातां खलाशासारख्या हलकट धंद्यांत तूं आपल्या बुद्धीचा दुरुपयोग करूं नयेस. दुसऱ्या योग्य कामीं तूं आपली बुद्धि लावणें चांगलें. '

' हें तूं खरोखर ह्मणतोस ? '

' हो. अगदीं खरोखर. '

' तर मग मीं काय करावें असें तुला वाटतें ? '

' मास्तरचा धंदा कर. कांहीं दिवस शिक्षण संपादल्यास, तुला खात्रीनें मास्तरचें काम चांगलें करितां येईल; व मग तूं मनांत आणशील तें करशील. '

' हें करण्यापेक्षां बोलणें फार सोपें आहे. बरें मीं खलाशी व्हावें का ? '

' खरें पुसशील तर या धंद्यांत तूं मुळींच पडूं नयेस. हा धंदा फार वाईट. यांत अनेक संकटें हरदम येणार व असल्या धंद्यांत निरर्थक बुद्धीचा व्यय तूं करणें मला योग्य वाटत नाहीं. '

' पण नेहमींच हें काम करण्याचा माझा उद्देश नाहीं. पुढें मागें मी कप्तान होईन. '

' खलाशी असलास काय व कप्तान असलास काय सारखेंच. दुसऱ्या

धंद्यांत शिरल्यास तूं नांव काढशील अशी माझी मनोदेवता सांगते. ज्याची योग्यता मोठा शिक्षक अगर मोठासा अधिकारी व्हावयाची आहे, त्यानें मी खलाशी होईन ह्मणून हट्ट धरणें ह्मणजे मूर्खपणाच. माझ्यासारखा असता तर आपली आई सांगत असतां तें न ऐकून, असल्या फंदांत पडताच ना. माझें ऐकशील तर, इतका उन्हाळाभर तूं नोकरी कर व पावसाळ्यांत एखाद्या शाळेंत शिकण्यास जा. तो खर्च भागण्यापुरता पैसा तुला याच चार महिन्यांत मिळेल.'

हा उपदेश जेम्स यास बराच पटला. खरोखरच महत् कृत्य करण्यासारखी बुद्धि आपले ठायीं असेल, तर तिचा दुरुपयोग करणें योग्य नव्हे असें त्यास वाटूं लागलें. त्याच्या मावसभावानें जें त्यास सांगितलें तेंच बऱ्याच मंडळींनें त्यास सांगितलें होतें; तेव्हां सर्वांस चूक कसें ह्मणावें ? असें आतां त्यास वाटूं लागलें.

तो त्या मचव्यावर नोकरी करीत असतां, सुमार चवदा वेळां पाण्यांत पडला. ही गोष्ट हलगर्जीपणामुळें घडे असें नव्हे, तर तो आपलें काम कायावाचामनेंकरून नेहमीं करीत असे व तें करीत असतां त्याच्या जिवाची देखील शुद्ध त्यास नसे. हेंच अनेकवार पाण्यांत पडण्यास कारण होय. अखेरच्या वेळीं तो जेव्हां पाण्यांत पडला, तेव्हां ती गोष्ट कोणास समजली देखील नाहीं. त्याचे आयुष्याची दोरीच बळकट, ह्मणून तो त्यावेळीं वांचला. पाण्यांतून वर आल्यावर तो आपल्याशीं ह्मणूं लागला कीं, "मला कोणीं वांचविलें बरें ? या संकटसमयीं ईश्वरावांचून मला कोणीं वांचविलें नाहीं खास. खलाशांपैकीं एकासही मी पाण्यांत पडलेला ठाऊक नाहीं. बरें, ज्या दोराच्या हिसक्यासरसा मी खालीं गेलों, तोच दोर फटींत अडकतो काय व रात्रीच्या प्रसंगीं माझ्या हातास लागून मी वर येतों काय ! सर्वच अघटित. 'ईश्वरी करणी अतर्क्य व अघटित असते' असें जें नेहमीं आई ह्मणत असते तें कांहीं खोटें नाहीं. मीं जगावें असें त्याच्या मनांत होतें ह्मणूनच त्यानें माझें रक्षण केलें. माझ्या हातून दुसऱ्या कांहीं चांगल्या गोष्टी घडाव्या असा ईश्वरी संकेत दिसतो, तेव्ह

यापुढें मी आपला जीव या हरहम्मेष संकटें येणाऱ्या दर्यावर्दीपणांत घाल-विणार नाहीं. मी हा धंदा आतां सोडणारच."

याप्रमाणें आपल्या मनाशीं बोलत असतां, तो दोर पूर्वीप्रमाणें पुन्हां फटींत अडकावा ह्मणून त्यानें आपली शिकस्त करून पाहिली; परंतु तसें कांहीं झालें नाहीं व त्यामुळें, आपण ईश्वरी कृपेनेंच वांचलों अशी पूर्णपणें त्याची खात्री झाली.

या शेवटल्या प्रसंगानें त्याचे मनावर फारच चांगला परिणाम झाला. त्याचें चित्त आपल्या घराकडे वळलें. 'आपल्या आईची प्रार्थना ऐकून तर देवास दया आली नसेल ना ? अनेक संकटांतून आपला बचाव होण्यास त्या माउलीचीच प्रार्थना कारणीभूत होय असें त्याचे मनानें घेतलें. असल्या माउलीची अवज्ञा करून, तिला दुःख देण्यास आपण प्रवृत्त व्हावें ना ? तो जरी कधींही तिची अवज्ञा करीत नसे तरी हा विचार त्याचे मनांत येतांच त्यास शर-मल्यासारखें झालें. आजपर्यंत आपल्या वियोगामुळें व काळजीमुळें तिची काय दशा झाली असेल ! त्याचा यत्किंचित् तरी विचार आपल्या मनांत यावयाचा होता ' वगैरे अनेक विचार त्याचे मनांत उभे राहूं लागले व इतःपर तीस दुःख होईल असें वर्तन कधींही करावयाचें नाहीं असा कृत संकल्प करून, खलाशाची नोकरी सोडून जाण्याचा त्याचा पक्का निश्चय ठरला.

ही गोष्ट घडल्यावर कांहीं दिवसानीं तो अतिशय आजारी पडला व त्याच्यानें कांहीं काम होईना. हींच आपला संकल्प सिद्धीस नेण्यास उत्तम संधि आहे असें पाहून, तो आपल्या धन्यास ह्मणाला ' कप्तानसाहेब, मी घरीं जातों, माझ्यानें आतां राहवत नाहीं. '

' जिम, हा तुझा फार चांगला बेत आहे. तूं फार अशक्त झाला आहेस व आजारी मनुष्यास सुधारण्यास घरासारखी दुसरी जगाच नाहीं. मला व एकंदर मंडळीला तूं गेल्यानें चुकल्यासारखें होईल, परंतु तूं जावंस हेंच चांगलें. '

' मला तुमची नोकरी सोडून जाण्याचें फार वाईट वाटतें. परंतु मागें

तुह्मीं जो मला उपदेश केलांत, त्याचा मी इतके दिवस विचार करीत होतों व तसें कांहीं करतां आलें तर पहावें असें मला आतां वाटूं लागलें आहे. '

' वः जेम्स, तुझ्या मनांत हा विचार आला हें फार चांगलें झालें. '

असें बोलून त्यानें जेम्सचा सर्व पगार चुकता केला. तो घेऊन जेम्स तावडतोब घरीं यावयास निघाला. वाटेनें चालतांना त्यास जें दुःख होत होतें तसें त्यास आजपर्यंत माहीत नव्हतें. तो तापानें अगदीं अशक्त झाला होता. शिवाय इतके दिवसांत आपले आईस आपण खुशालीचा निरोपही पाठविला नाहीं, याचें त्यास राहून राहून दुःख होत होतें. सारांश, शारीरिक व मानसिक पीडांनीं तो अगदीं त्रस्त झाला होता. मचव्यावरून निघाला तेव्हां सायंकाळचा सुमार होता, तेव्हां घरीं येण्यास त्यास सहजींच रात्रीचे अकरा वाजले.

तो जसजसा घराजवळ येऊं लागला, तसतसा शेकोटीचा उजेड खिडकींतून बाहेर पडला होता, तो त्यास दिसूं लागला. घराजवळ जातांच एकदम घरांत न जातां खिडकी उघडी होती तींतून त्यानें डोकावून पाहिलें, तेव्हां घरांतील एका कोपऱ्यांत खुर्चीवर पुस्तक ठेवून, तीपुढें गुडघे टेंकून आपली आई कांहीं करीत आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. तिचे डोळे पुस्तकाकडे नसून, खालीलप्रमाणें ईश्वराचा धांवा त्यानें ऐकला. ' हे परमेश्वरा, तुझ्या दासीवर दया कर व तिला धीर दे आणि तिच्या मुलास संकटांतून पार पाडून योग्य मार्गास लाव '. त्याच्यानें पुढें उभें राहवेना ! तो एकदम घरांत गेला. मातापुत्रांची भेट झाली व एकमेकांस त्यानीं प्रेमालिंगन दिलें. त्या वेळची त्या मायलेंकरांची स्थिति शब्दांनीं वर्णन करणें अशक्य; इतकेंच नव्हे तर ती कल्पनेनेंही कळणारी नसून त्यास अनुभवच पाहिजे.

# भाग ६ वा.

## महत्त्वाचें स्थित्यंतर.

मायलेंकरांची भेट झाल्यामुळें झालेला आनंद जरा कमी झाल्यावर, गार्फील्ड बाई जेम्सला ह्मणाली ' जेम्स, तूं आजारी दिसतोस, तुला काय होत आहे ? '

आईचा हा प्रश्न ऐकून जेम्सनें घरून निघाल्यापासून परत येईपर्यंतची सर्व हकीगत तीस सांगितली. ती ऐकून घेऊन ती ह्मणाली ' जेम्स, ईश्वरानें तुला मोठ्या चमत्कारिक रीतीनें वांचवून मजकडे परत लावून दिलें ह्मणावयाचें. '

' खरेंच आई, त्या रात्रीं मला ईश्वरानेंच वांचविलें. ' असें जेम्सनें अंतःकरणापासून उत्तर दिलें.

जेम्स ज्या दुखण्यामुळें आजारी होता तें बरेंच जड होतें. त्यामुळें बरेच दिवस तो हंतरुणांत खितपत पडला होता. त्याचे आईनें तो बरा व्हावा ह्मणून पुष्कळ श्रम केले व त्यांत तीस यश येऊन, तो हळू हळू बरा होत चालला. दुखण्यांत व पुढेंही त्याचें मन विद्यार्जनाकडे वळावें ह्मणून, त्या माउलीनें हर प्रयत्न केले; परंतु त्याच्या मनांतील समुद्रपर्यटनाची लालसा कांहीं कमी होईना. तो नेहमीं आपल्या आईस ह्मणे ' आई, तुझ्या मनांत मीं शिकून चांगला विद्वान् व्हावें असें आहे. पण तसें घडेल कीं नाहीं याची मला मोठी शंका आहे. मी आतां खलाशीपणा पुरे ह्मणून जरी घरीं आलों आहें तरी, मी जसाजसा बरा होत आहें तशीतशी ती पूर्वींची इच्छा माझे मनांत प्रबळ होऊं पाहत आहे. '

' नाहीं, जेम्स, तुला शंका बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. मी खात्रीनें सांगतें तूं विद्वान् होणार. तुझ्या बापानें मरतांना हेंच भाकीत केलें आहे व तें सिद्धीस जावें ह्मणून मी जिवापाड श्रम करीत आहें व त्यांत ईश्वर मला यश देईल, अशी मला पूर्ण आशा आहे. '

जेम्सचें मन विद्येकडे वळावें ह्मणून, गार्फील्ड बाईचे सतत प्रयत्न चालू होते. जेम्स आतां बहुतेक बरा झाला होता. कांहीं दिवसांनीं शाळेंत अगर दुसऱ्या कोणत्या धंद्यावर जाण्यास आतां कांहीं अडचण उरली नव्हती. यावेळीं हिंवाळ्याचा सुमार असून, गार्फील्ड बाईच्या घराजवळील शाळाहीं उघडली होती. यावेळीं तीवर स्यामुएलबेट्स नांवाचा एक तरुण शिक्षक होता. तो चांगला हुशार असून, लहान मुलांस ममतेनें व काळजीपूर्वक शिकविणारा असल्यामुळें, शेजारींपाजारीं तो बराच माहीत झाला

होता. गार्फील्ड बाईनें या गृहस्थाची भेट घेतली. तिला आपल्या मुलाचें मन विद्येकडे वळावें अशी बळकट इच्छा होती व तसें करण्यास या पंतोजीची मदत झाली तर पहावी अशा उद्देशानें ती त्यास भेटण्यास गेली होती. पहिल्याच प्रसंगीं जेम्सच्या स्वभावाबद्दल तिनें त्यास पूर्ण ओळख करून दिली. त्या शिक्षकानें या गरीब बाईस आपल्या मुलाचें मन विद्येकडे वळावें असें फार वाटत असून, त्या कामीं आपण कांहीं श्रम घ्यावे अशी तिची इच्छा असलेली पाहून, त्यानें ती गोष्ट मनापासून कबूल केली.

तो शिक्षक वारंवार गार्फील्ड बाईकडे येऊं लागला. जेम्सचें व त्याचें बरेंच संभाषण चाले. जेम्सला त्याची संगत आवडूं लागली व गप्पागोष्टी चालतां चालतां, एके दिवशीं योग्य संधि पाहून त्या शिक्षकानें मुख्य मुद्याकडे बोलणें वळविलें आणि तो ह्मणाला ‘ जेम्स, खरं ह्मणशील तर विद्वान् व खलाशी या दोहोंमध्यें सजीव व निर्जीव वस्तूंत जितकें अंतर आहे तितकें आहे. विद्वानाशीं तुलना करितां खलाशी ह्मणजे कांहींच नाहीं. तेव्हां मार्च महिन्यांत मी जेव्हां शाळेंत जाईन, तेव्हां मजबरोबर चेस्टर येथील शाळेंत चल. पहिल्यानें ही गोष्ट करावयाची असें ठरलें ह्मणजे बहुतेक काम झालें. ’

वरील एकंदर बोलणें ऐकून, जेम्स याच्या तोंडांतून “ होय, मी येईन ” असे शब्द आले. ते शब्द उच्चारण्याच्या एकंदर आविर्भावावरून त्याचा या बाबतींत पक्का निश्चय झाला असें दिसलें.

पंतोजी ह्मणाले “ ठीक. याला ह्मणतात काम करण्याची हतोटी. आतां तेथें तूं पैशाची तजवीज काय करशील किंवा अभ्यास मध्येंच सोडून देशील वगैरे कांहीं मी विचारीत नाहीं. योग्य वेळीं ह्या सर्व गोष्टी नीट जमतील व सर्व ठीक जुळेल. ‘ मी येईन ’ ह्या दोन शब्दांत सर्व कांहीं आलें. आयुष्यांतील एका महत्त्वाच्या कामाला तूं लागणार हें यावरून ठरलें व हेंच मोठें महत्त्वाचें स्थित्यंतर झालें ह्मणावयाचें. आतां चेस्टरच्या शाळेकडे तूं आपलें तोंड फिरविलेंस व परत आतां नावाडी होण्याच्या अगर दुसऱ्या एखाद्या फंदांत, झालेला संकल्प टाकून, तूं शिरशील व आपणास

नामर्द ह्मणवून घेशील असें मला मुळींच वाटत नाहीं. सर्व कांहीं एके बाजूस ठेवून, जेव्हां शिकण्याचा मीं निश्चय केला, तेव्हां माझ्या आयुष्यांत मोठें महत्त्वाचें स्थित्यंतर झालें व माझ्या आयुष्यांतील मोठी गोष्ट तीच अशी माझी समजूत आहे."

या बोलण्याचा जेम्सचे मनावर फार नामी ठसा उमटला. उपदेश करणाराचें वर्तन, करीत असलेल्या उपदेशाप्रमाणें असलें ह्मणजे नेहमीं त्या उपदेशाचें कार्य घडतेंच. तो शिक्षक कांहीं वांगी पुराणीक नव्हता. तो जो उपदेश करीत होता त्याचें प्रत्यक्ष उदाहरण तो स्वतः होता. तेव्हां त्याच्या उपदेशाचा ठसा कां बरें उमटूं नये? जेम्सच्या मनावर तो उपदेश तात्पुरताच ठसला नाहीं तर, तो जसजसा वाढत चालला तसतसा तो त्याच्या मनावर जास्त दृढ होत गेला. पुढें त्यास जेव्हां उपदेश करण्याची पाळी येई, तेव्हां त्याचें नेहमींचें सांगणें असें कीं, " जेव्हां एखादा होतकरू मनुष्य कांहीं अमुक एक काम करावें ह्मणून, कांहीं दिवस मनापासून प्रयत्न करण्याचा संकल्प करितो, तेव्हां त्यानें मोठीच गोष्ट केली असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं."

सारांश, आईच्या अश्रांत परिश्रमांचें साफल्य झालें. शाळेचा खर्च चालविण्यास पैसा कुठून येणार वगैरे कांहीं काळजी त्या बाईस वाटली नाहीं. मुलाच्या मनानें घेतल्यावर, हरप्रयत्न करून ती गोष्ट तो सिद्धीस नेणार, अशी तिची पूर्ण खात्री होती. जेम्सनें आपल्या विल्यम व हेनरी नांवांच्या दोघा मावसभावांस आपला चेस्टर येथील शाळेंत जाण्याचा संकल्प कळविला व आपल्याबरोबर त्या दोघांनींही यावें असा आपला मानस आहे असें त्यांस दर्शविलें. त्यांच्या घरांत या बाबतींत सुमार आठ दहा दिवस वाटाघाट होऊन, त्या मुलांनीं सुद्धां जेम्सबरोबर जावें असें ठरलें.

झालें. याप्रमाणें ते तीन मुलगे पांच मार्च रोजीं चेस्टर येथें जावयास निघाले. जेम्सच्या आईनें त्याबरोबर आपली झाडून सर्व शिल्लक ह्मणजे सुमार अकरा डॉलर दिले होते. त्याशिवाय त्यांबरोबर कांहीं पुस्तकें, थोडेशी अन्न सामग्री व सैंपाकाचीं भांडीं इतकें सामान होतें. शाळा ज्या

दिवशीं सुरू व्हावयाची त्याच दिवशीं ते चेस्टर गांवीं येऊन दाखल झाले व तसेच शाळेचे प्रिन्सिपालचे घरीं गेले. त्या वेळीं ड्यानिअल क्यांच नांवाचे अध्यक्ष शाळेंत असत. त्यांची व या मुलांची नजरानजर होतांच, जेम्स त्यांस सलाम करून ह्मणाला " आह्मीं तुमच्या शाळेंत यावें ह्मणून ऑरेंज येथून आलों आहों. "

" तुमचें नांव काय ? " असा अध्यक्ष साहेबांनीं प्रश्न केला.

' माझें नांव जेम्स एब्राम गार्फील्ड व या दोन मुलांचीं नांवें विल्यम व हेनरी बॉयन्टन. '

' बरें, आलेंत हें ठीक झालें. तुह्मी गरीबच दिसतां. '

त्या मुलांचे कपडे वगैरे लक्ष्यपूर्वक पाहून, प्रिन्सिपाल साहेबांनीं हा प्रश्न केला होता. जेम्सचे कपडे जुनेच असून, तुमान तर धड पायांपर्यंत देखील नव्हती. त्याप्रमाणेंच त्या दोन्ही मुलांचेही कपडे होते. प्रिन्सिपाल साहेबांचा वरील प्रश्न ऐकून जेम्स ह्मणाला ' हो, आह्मी अगदीं गरीब आहों आणि आमच्याबरोबर जीं गाठोडीं आहेत त्यांत भांडीकुंडीं व सैंपाकाचें सामान आहे. '

' तर मग तुह्मी हातानें जेवायाचें करणार वाटतें ? '

' हो; आणि कोठें जागा असेल तर आह्मांस सांगा. '

' होय. जवळच आहे. आमच्या शाळेंतील बरींच मुलें हातानेंच जेवायचें करितात. त्यांना जर तें करतां आलें नाहीं तर, त्यांचें शिक्षणच होणार नाहीं. ' असें ह्मणत प्रिन्सिपाल साहेब घराचे दाराबाहेर आले व जवळच बोट करून ह्मणाले ' तें जुनें घर दिसतेंना, तेथें जा, तेथें तुह्मांप्रमाणेंच एक गरीब ह्मातारी राहते. तेथें बहुतकरून तुह्मांस जागा मिळेल. तिला विचारा जा. '

हें एकून, प्रिन्सिपाल साहेबांस पुन्हां सलाम करून, ते मुलगे निघाले ते त्या बाईकडे आले व तिला थोडेंसें भाडें कबूल करून, त्यांनीं एक खोली घेतली. तींत तीन जुन्या खुर्च्या, दोन बिछाने व विस्तवाची व सैंपाक करण्याची एक जागा, इतकी सामग्री होती. या ठिकाणीं ते आळीपाळीनें

सैंपाक करून राहूं लागले. प्रत्येकास आठवड्यास सुमार बारा आणे खर्च येई. पुढें कांहीं दिवसांनीं बरेंच काम त्यांनीं मजुरीनें बांईस दिलें व त्यांची ठीक सोय जमली.

जेम्स यास ही शाळा ह्मणजे एक नवीनच देखावा होता. तींत मुलें व मुली मिळून सुमार शंभर विद्यार्थी होते. पहिल्यापहिल्यानें जेम्स यास त्या ठिकाणीं कसेंसेंच होई व मुलींशीं संबंध आला ह्मणजे त्याची धांदलच उडे. परंतु हळू हळू तो निरढावत चालला.

या ठिकाणीं जेम्सनें व्याकरण, पदार्थविज्ञानशास्त्र, अंकगणित व बीजगणित या विषयांचा अभ्यास चालविला; परंतु पुढें थोडेच दिवसांनीं त्यानें व्याकरण सोडून दुसरा विषय घेतला. व्याकरणांत शिक्षकांचें व जेम्सचें पटेना. ब्रयांच साहेब विद्वान् गृहस्थ होते खरे, परंतु जरा चमत्कारिक होते. त्यांची व्याकरणपद्धत इतर सर्व ग्रंथकारांहून अगदीं वेगळी व जेम्स हा मुलगा विचाराच्या कसोटीस उतरल्याविना कोणतीही गोष्ट पंतोजी सांगतात ह्मणून खरी मानणारा नसल्यामुळें, वर्गांत व्याकरणाच्या वेळीं वादविवादावर येई व त्याचें योग्य प्रकारें समाधान करणें गुरुजींस बरेंच जड जात असे. असें असल्यामुळें त्यानें व्याकरण सोडून, निराळा विषय घेतला तरी, ब्रयांच साहेबांस वाईट वाटलें नाहीं व जेम्सचा रागही आला नाहीं. कारण, जेम्स हा मोठा अलौकिक मुलगा आहे अशी त्यांची पूर्ण खात्री होती.

याप्रमाणें सर्व कांहीं सुयंत्रित चालू असतां, जेम्सजवळील सर्व पैसे सरले; तेव्हां त्यानें कोठें तरी काम मिळाल्यास पहावें ह्मणून प्रयत्न चालविला. त्याच्या बिऱ्हाडासमोरच एका सुताराचें दुकान होतें. त्यापाशीं जाऊन ' आपणास कांहीं काम मिळेल का ? ' ह्मणून त्यानें शोध केला. त्या सुताराचें नांव वुडवर्थ असें होतें. त्यानें जेम्सला विचारलें ' तुला या धंद्यांत काय समजतें ? '

' मीं ऑरेंज येथील ट्रेट मेस्त्रींजवळ काम केलें आहे. '

' हं, मी त्यांना ओळखतों. तूं त्यांजवळ काय करीत असस ? '

' मला कोठारें बांधणें वगैरे बरींच बारीकसारीक कामें येतात. शिवाय रंध्याचें कामही मी चांगलें करितों. '

'रंध्याचें काम करण्यासारखा तूं सशक्त दिसतोस खरा. तूं आपला शाळेचा खर्च स्वतः चालवितोस वाटतें ?'

'हो. मी आलों तेव्हां मजजवळ सारे अकरा डॉलर होते व ते फार दिवस कसे पुरणार ?'

'खरेंच. येथल्या खर्चाच्या मानानें नाहीं पुरणार खरेंच. येथें जेवणाचाच खर्च फार येतो.'

'मी स्वतः जेवायाचें करितों' असें जेम्स हंसत ह्मणाला.

'स्वतः जेवण करतोस ? तें फार कठीण काम बोवा.'

'अं: त्यापेक्षां कितीक त्रासाचीं कामें पडलीं आहेत !'

'हो असतील, पण हेंही कांहीं सुखकर काम नाहीं. बरें, सायंकाळीं शाळा सुटल्यावर ये. मी पाहतों तुझी कांहीं तजवीज.'

'निव्वळ माझीच नका पाहूं, तुमचीही पहा. तुह्मांला मला मजुरीवर ठेवून कांहीं फायदा वाटला नाहीं, तर उगाच तुमचें नुकसान करून मला ठेवूं नका.'

वुडवर्थ मेस्त्रींना हें त्या मुलाचें बोलणें ऐकून, फार आश्चर्य वाटलें व 'व सायंकाळीं ये तर खरा' असें ते ह्मणाले. तो सायंकाळीं आला व त्याला काम मिळालें. दररोज शाळेंत जाण्यापूर्वीं सकाळीं व सायंकाळीं शाळा सुटल्यावर, तो त्या दुकानांत कामास जाई. याप्रमाणें शाळेची पहिली टर्म भरेपर्यंत त्याचा क्रम चालू होता.

त्या शाळेंत त्याचें मन विशेष वेधण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे तेथील पुस्तकसंग्रह होय. त्यांतील बरींच पुस्तकें जेम्सनें फावल्या वेळांत वाचलीं. त्याला दिवसास पुस्तकें वाचण्यास फारसा वेळ सांपडत नसे. परंतु रात्रीचा तो बराच वेळ जागे. शाळेंत असा नियम असे कीं, महिन्यांतून प्रत्येक मुलानें ऐच्छिक विषय घेऊन दोनदां निबंध लिहून आणावा व त्याप्रमाणें जेम्सवर पाळी आली. तो कधीं कधीं शिक्षक तपासीत अगर वर्गांतच वाचून घेत. जेम्सनें पहिल्यानें जेव्हां निबंध वाचला तेव्हां बरीच मंडळी पाहून तो घाबरला. परंतु त्यानें आपली झालेली तारंबळ विशेष कोणास कळूं दिली नाहीं.

तो घरीं आल्यावर आपल्या सोबत्यांस ह्मणाला " मी निबंध वाचण्यास उभा राहिलों होतों त्या टेबलापुढें खालच्या बाजूस पडदा होता हें माझें नशीबच ह्मणावयाचें. "

' कां बोवा ? ' असें विल्यमनें त्यास विचारलें.

' अरे, माझे पाय इतके कांहीं कांपत होते कीं सांगण्याची सोय नाहीं. '

' अं: त्याचं काय मोठंसं घेऊन बसला आहेस ? '

' मोठं ह्मण का लहान ह्मण, पण इतका मी कधींही घाबरलों नव्हतों. '

' अरे, घाबरलास ह्मणून काय मोठेंसें बिघडलें. तुझा निबंध तर अत्युत्तम ठरला. असा निबंध मला लिहितां येता आणि मग मी थोडेसा घाबरलों असतों तरी त्याचें मला कांहीं वाटलें नसतें. कांहीं कांहीं मुलें तर असें ह्मणू लागलीं कीं, असल्या भिकारी पोशाखाचे आंत असले उदात्त व प्रगल्भ विचार आहेत तर ! '

' शाबास विल्यम ! तूं तर माझ्या कपड्यांबरोबर निबंधाची तुलना करूं लागलास. निबंध काय मी मोठ्या खुशीनें लिहीन, तो लिहिण्यास काय विचार लागतात इतकेंच. पण कपडे करण्यास बाबा पैसा लागतो. '

असा त्यांचा वारंवार संवाद चाले. सारांश, ते तीन मुलगे आनंदांत विद्याभ्यास करीत होते. शाळेंत मुलामुलांची वादविवाद करण्याची एक सभा होती. या सभेपासून जेम्स यास फार मौज वाटे. तो सभेंत जाऊन वादविवाद करी व त्या योगानें त्याच्या स्वप्नींही नव्हता असा हा गुण आपणांत चांगला आहे असें त्यास आढळून आलें, त्याची भाषेवर उत्तम प्रकारची छाप असल्यामुळें, वादविवादांतील कोणत्याही प्रश्नावर त्यास आपले विचार सहज व्यक्त करितां येत. शाळेंत जाण्यापूर्वी वर्गांतील अभ्यास जसा करावयाचा तसा ... वादविवादास जाण्यापूर्वी तेथें निघणाऱ्या प्रश्नांचा चांगला अभ्यास करी. ... कामीं लागणारी माहिती नाना ग्रंथांतून तो मिळवीत असे व यामुळें ...चें वाचन उत्तम होऊन, संभाषणामुळें तो विषय त्याचे अंतःकरणांत ...गला ठसे. वादविवादासंबधीं विषयांत त्याची तरतरी पाहून, सर्व विद्या...र्थ्यांस व शिक्षकांस मोठें नवल वाटे. त्याच्या आयुष्याच्या शेवटील पंधरा

वर्षांत देशांतील राजकारणी सभेंत तो जो प्रसिद्धीस आला व नामांकित वक्ता ह्मणून गणला गेला, त्या वक्तृत्व शक्तीचा पाया त्यानें प्रथम चेस्टर येथील शाळेंत घातला. प्रत्येक विषयांत वादविवाद करण्यापूर्वी पारंगतता संपादन करण्याची आतां जी संवय त्यास लागली ती त्याचे आयुष्य संपेपर्यंत टिकली व तीमुळें राष्ट्रांत तो अत्युत्तम वक्ता बनला.

शाळेंतील सभेंत त्यानें चांगलें नांव मिळविलें. प्रत्येक सभेंतील वादविवाद सर्व शाळेंत महत्त्वाचे व मनोरंजक वाटूं लागले. या सर्वांचें बीज जेम्स होय. तो काय बोलतो यावर सर्व विद्यार्थ्यांचें लक्ष्य लागलेलें असे. त्याचे असे अनेक अलौकिक गुण पाहून त्याच्या गरीबीबद्दल कोणास कांहीं वाटत नसे तर, ती गरीबी त्यास मानास्पदच झाली.

शाळेस सुट्टी होण्यापूर्वी जेम्सच्या वाचण्यांत हेनरी राईट यांचें चरित्र आलें. त्या महात्म्याची विद्या प्राप्त करून घेण्याची पद्धत व वागण्याची रीत त्यानें पूर्ण अवगत करून घेतली. बरेच बाबतींत त्या पद्धतीचें अनुकरण करण्याचा त्यानें निश्चय केला व त्यांची जेवणाची पद्धत सुट्टी सरून परत येतांच अमलांत आणण्याचा त्याचा संकल्प झाला.

शाळेस सुट्टी होतांच जेम्स घरीं आला. त्याचा भाऊ थामस हाही तेव्हां घरींच होता. त्याचे मनांतून धान्य ठेवण्याकरितां कोठार करावयाचें होतें. जेम्स यास कोठार बांधण्याची पूर्ण माहिती होतीच. तेव्हां, त्यानें व थामसनें मिळून तें पूर्णपणें बांधलें. तें झाल्यावर जेम्स शेजारींपाजारीं कामास जाई व सायंकाळचा अभ्यासांत गढलेला असे. हें पाहून गार्फील्ड-बाईस फार समाधान होई. समुद्रपर्यटनाची त्यानें गोष्टही कधीं काढली नाहीं व तिनेंही तो विषय मुळींच उच्चारला नाहीं.

अखेर सुट्टी सरून, शाळेंत जाण्याची वेळ आली. चेस्टर येथें जाण्याच्या आदल्या दिवशीं त्याची आई त्यास ह्मणाली " जेम्स, तुला बरोबर न्यावयास कांहीं पैसे पाहिजेत का ? "

' मला नकोत आणखीं पैसे. ' असें ह्मणून आपलेजवळील नऊ आणे बाहेर काढून, त्यानें तीस दाखविले व तो हंसत हंसत ह्मणाला ' इतके

मजजवळ आहेत ते बस. मी वुडवर्थ मेस्त्रींजवळ कामाची तजवीज लावली आहे व तितक्यावर माझा खर्च सहज भागेल.'

'हो, तें खरें. पण थोडेसे जवळ असावे हें बरें.'

'सुरवातीस बरोबर कांहीं घेऊन, कफल्लक होऊन येण्यापेक्षां, कांहीं न घेतां अखेरीस थोडेंसें संपादून येणें मला जास्त बरें वाटतें.'

'तर मग पुढील सुट्टींत कांहीं पैसा घेऊन येणार वाटतें ?'

'हो. कारण, हिंवाळ्यांत जर शाळामास्तरचा धंदा करावासा वाटला, तर कांहीं थोडेंसे पैसे जवळ असणें बरें.'

'तर मग येत्या हिंवाळ्यांत शाळा चालविण्यापुरती तुझी तयारी होणार तर ?'

'माझा बेत आहे. परंतु कदाचित् तो फसेलही.'

'तूं शिकविशील असें मला सुद्धां वाटतें व तसें झालें तर चांगलेंच झालें. मग हिवाळ्यांत शाळा चालवून वर्षभर शाळेंतील खर्च चालविण्यापुरता पैसा तुला सहज मिळेल आणि मग शाळेच्या पूर्वी व सायंकाळीं शाळा सुटल्यावर काम करण्यास नको.'

'अशी वेळ येईलसें मला नाहीं वाटत. मला काम पडतें यांत समाधान आहे. त्याचें कांहीं मोठेंसें मला वाटत नाहीं.'

जेम्स, बरोबर नऊ आण्यांची पुंजी घेऊन चेस्टर येथें आला. तेथें आल्यावर नित्य नियमाप्रमाणें रविवारीं देवळांत तो प्रार्थनेस गेला असतां, प्रार्थना आटपल्यावर गरीबांस मदत ह्मणून पैसे जमविण्याची पेटी मंडळींतून फिरूं लागली. जेम्स आपल्या खिशांत हात घालून पाहतो तों, ते नऊ आणे लागले. ते त्यानें त्या पेटींत घातले व उदरनिर्वाहाकरितां काम करण्यास तो तावडतोब मोकळा झाला. तो वुडवर्थ मेस्त्रींकडे कामास जाऊं लागला. मागें ठरल्याप्रमाणें राईटसाहेबांची जेवणाची पद्धत त्यानें अमलांत आणली व तीमुळें खाण्याचा खर्चही कमी येऊं लागला. मांसमच्छर न खातां धान्य, दूध व भाजीपाला खाऊन तो राहत असे. वनस्पत्याहार ही राईटसाहेबांनीं फायद्याची पद्धत शोधून काढली होती व ती स्वीकारल्यामुळें अन्नखर्च कमी लागून, जेम्सची बुद्धिही चांगली चाले.

कोणतेंही काम करावयाचें असो, जेम्स यास त्या कामीं मागून नेट देणारा लागत असे, ह्मणजे स्वशक्तीवर कोणीं उत्तेजन दिल्याविना त्याचा विश्वास उत्पन्न होत नसे. अमुक एक गोष्ट खात्रीनें आपल्या हातून घडेलच असें त्यास वाटत नसे. असें होतें तरी तो कर्तव्य करण्यास माघार घेत असे, असें नव्हे. परंतु, त्याचे कृतीस व विचारास दुजोरा मिळाल्यास तें काम कितीका कठीण असेना, तें झालेंच ह्मणून समजावें. त्याच्या मनांतून हिंवाळ्यांत शाळा शिकवावी असें होतें. परंतु ती गोष्ट अद्याप त्यानें आपल्या शिक्षकास कळविली नव्हती. ब्र्यांच साहेबांनींच एके दिवशीं तो विषय काढला. त्यांस जेम्सची गरीबी माहीत असल्यामुळें, त्याविषयीं त्यांचे मनांत विशेष काळजी असे. असल्या हुशार मुलास वरिष्ठ प्रकारचें शिक्षण मिळावें असें त्यांस वाटे व हिंवाळ्यांत शाळा शिकविण्यापेक्षां दुसरा चांगला उपाय या कामीं नाहीं असें पाहून; ते जेम्सला ह्मणाले ‘ तुला शाळामास्तरचा धंदा करावासा वाटतो का ? ’

‘ मला जर शाळा मिळाली तर, येत्या हिवाळ्यांत तें काम कसें काय साधतें तें मी पाहणार आहें. माझी आई नेहमीं ह्मणत असते कीं, तुझ्यांत जर शाळा शिकविण्याचें सामर्थ्य येईल तर तुला विद्या संपादन करितां येईल.’

यावेळीं ब्र्यांच साहेब मोठ्या खुषींत होते. ते जेम्सला ह्मणाले ‘ जेम्स, खरोखर फार नामी युक्ति आहे. तुझ्या आईच्या व माझ्या मतांत कांहीं-चेंही अंतर नाहीं. तुला शाळा शिकविल्यानें फार फायदा होणार आहे. असें केल्यानें तुला नुसती मदतच होईल असें नाहीं तर, यांत स्वार्थ साधून परमार्थही आहे. या जगांत आपण आपणा स्वतःकरितांच जन्मास येतों असें नाहीं, तेव्हां आपण आपल्यापुरतीच नजर ठेवून चालणें चांगलें नव्हे. निव्वळ स्वार्थावर नजर देणें ह्मणजे अति अप्पलपोटेपणाचें व मोठें नीच कृत्य होय. ’

‘ मला एखादी शाळा मिळेल असें तुह्मांला खात्रीनें वाटतें काय ? ’

‘ निःसंशय मिळालीच पाहिजे. पूर्वीपेक्षां आतां शिक्षक जरी फार झाले आहेत तरी, शाळाही ठिकठिकाणीं झाल्या आहेत. शिवाय

माझी आणखी खात्री आहे कीं, या धंद्यांत तुला यश येईल. सगळ्यांनाच ह्मणजे यांत यश येतें असें नाहीं.'

'मला यांत यश येईल असें तुह्मांस कां वाटतें ?' असा जेम्सनें प्रश्न केला. शिक्षकाच्या धंद्यांत कोणत्या गोष्टीमुळें यश येतें, कोणते गुण अंगीं असल्यावर ह्या धंद्यांत पडण्यास हरकत नाहीं वगैरे माहिती करून घेण्याची जेम्स यास उत्कट इच्छा होती.

'पहिली गोष्ट ही कीं, तो धंदा करण्याचें चांगलें सामर्थ्य हिंवाळा येईपर्यंत तुझ्या अंगीं येईल. दुसरें तुझे ठायीं आपले विचार उत्तम रीतीनें व्यक्त करण्याची शक्ति आहे व हाच गुण शिक्षकांत प्राधान्येंकरून असावा लागतो. आणखीं कार्यकारण समजण्याच्या कामीं तुझी बुद्धि मोठी, तीव्र व कुशाग्र आहे. तुला शाळा उत्तम प्रकारें चालवितां येईल असें मला वाटतें. जो मुलगा शिकत असतां आपले सौंगड्यांस फार प्रिय असतो, तो पुढें खात्रीनें उत्तम शिक्षक होतो.'

प्रिन्सिपाल साहेबांचें हें सर्व बोलणें खरें होतें. जेम्सइतका मनमिळाऊ मुलगा सर्व शाळेंत नव्हता. वरील बोलण्यानें जेम्स यास चांगलाच हुरूप आला व त्यानें त्या कामीं प्रयत्न करून पाहण्याचा संकल्प केला.

चेस्टर येथील शाळेंत असतां, एक गोष्ट घडली व त्या बाबतींत जेम्सनें जें वर्तन केलें त्यावरून त्याच्या अंगचें नीतिधैर्य, स्वावलंबन व न्यायीपणा हीं त्याचे सोबत्यांचे पूर्णपणें दृष्टोत्पत्तीस आलीं. प्रत्येक बाबतींत त्याचें स्वतःचें ह्मणून कांहीं मत असे व तें योग्य प्रकारें चुकीचें ठरेपर्यंत कधींही सोडावयाचें नाहीं असा त्याचा पक्का निश्चय असे. मोठा जिवलग मित्र कां असेना, त्याचे हातून अन्याय घडला असल्यास त्याची कड तो कधींही घ्यावयाचा नाहीं, परंतु त्यास त्याच्या अपराधाची पूर्ण उपरती झालेली त्याचे नजरेस आली तर त्यास संकटांतून पार पाडण्यास तो जिवापाड श्रम करी.

शाळेंत कांहीं मुलें दांडगीं असतात व त्यांवर नजर ठेवून शाळेंत एकंदर शिस्त ठेवणें हें शाळेंतील अधिकाऱ्यांचें मुख्य कर्तव्य असतें. चेस्टर येथील विद्यालयांतही अशीं कांहीं अडदांड मुलें होतीं व त्यांपैकीं एकानें

गांवांतील एका गृहस्थाची टवाळी केली व ती गोष्ट प्रिन्सिपालसाहेबांचे कानापर्यंत आली. शाळेचा व आपला बोज राखण्याकरितां त्या उद्धट मुलास शिक्षा करणें त्यांस भाग पडलें. तेव्हां हें कृत्य करणाऱ्या मुलास व शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांस चांगली दहशत बसावी म्हणून, त्यांनीं त्यास चांगलीच शिक्षा करण्याचा निश्चय केला होता.

असा कांहीं प्रसंग आला कीं, मोठमोठ्या शाळांतून नेहमीं असें घडतें कीं, बहुतेक विद्यार्थी द्वाड मुलाची बाजू घेतात. शाळेंत असतांना लहान मुलांचीं अंतःकरणें कांहीं एका बंधनानें परस्परांशीं बद्ध झालेलीं असतात व कोणतीही गोष्ट असेना, तिच्याबद्दल विचार न करितां, ते अपराधी मुलाचीच कड घेतात. या बाबतींतही असेंच घडलें.

'शाळेंतील मुलांपैकीं एकजण ह्मणाला' जर बेलला ( अपराधी मुलाचें नांव ) घालविलें तर आपणही जाणार.'

आतां या बोलण्यांत विचारापेक्षां विकाराचें प्राबल्य किती आहे हें दिसतेंच आहे. परंतु, बेलला जर प्रिन्सिपाल साहेबांनीं घालवून दिलें तर, ह्याप्रमाणें सुमार पंचवीस मुलें शाळा सोडून जाण्यास तयार झालीं. याप्रमाणें व्यूह रचून, तीं सर्व मंडळी जेव्हां जेम्सकडे आली, तेव्हां त्यांस त्यांच्या बेतांत उत्तेजन मिळण्याचें एकीकडेसच राहून, त्यानें त्यांची चांगली कानउघाडणी केली.

'एखाद्या मुलाला शाळेंतून घालवून दिलें तर मीं शाळा सोडून कां जावें याचें योग्य कारण तर मला तुह्मी सांगाल ?' असें त्यानें त्या मुलांस विचारलें.

यावर तीं काय बोलणार ? परंतु त्यांपैकीं एकजण ह्मणाला 'असें करण्यांत आमचा हेतु इतकाच कीं, ह्या कृत्यामुळें आह्मांस आलेला राग प्रिन्सिपाल साहेबांस चांगला समजला पाहिजे.'

'राग कसला ?' असा जेम्सनें प्रश्न केला.

'बेलला घालवून लावतील त्याचा.'

'परंतु त्याला अजून तर घालवून दिलें नाहींना ? व पुढें देतील ह्मणून कशावरून तुह्मी ह्मणतां ?'

‘ तें कांहीं असो; पण अशाप्रकारें आपल्या सोबत्याला वागविणें मला नाहीं बरें वाटत. आज त्यावर प्रसंग, तो उद्यां आपणांवर. ’

‘ ह्मणजे काय ? ’

‘ त्याला वर बोलावून त्या मनुष्याशीं तो अशा अशा तऱ्हेनें वागला ह्मणून त्यावर इतका गहजब करणें चांगलें काय ? ’

‘ तो असें बोलला तरी काय ?

‘ तो गृहस्थ ह्मणतो ‘ त्यानें माझा अपमान केला ’. परंतु आपल्याला त्याशीं काय करावयाचें आहे ? आपण आपल्या सोबत्याची कड घेतली पाहिजे. ’

‘ आणि ती न्यायअन्याय कांहीं न पहातां ! ’

‘ हो, प्रसंग पडल्यास तसेंही केलें पाहिजे. ’

‘ मी कधींही तसें करणार नाहीं. जर एखादा आपला सोबती कांहीं लचांड करून आला व त्यांतून योग्य रीतीनें त्याची सुटका करितां येत असेल तर, मी त्यास खुषीनें मदत करीन; नाहींतर मी कधींही त्याची कड घेणार नाहीं, हें तुह्मी पक्कें समजा. ’ असें जेम्सनें खडखडीत उत्तर दिलें.

‘ मुलानें कोठें एखाद दुसरा वाईट शब्द वापरला ह्मणून, त्या गृहस्थानें इतक्या थरावर गोष्ट आणणें ह्मणजे नीचपणाच होय, असें मला वाटतें ’ असें तो मुलगा ह्मणाला.

‘ माझें मत या बाबतींत फार निराळें आहे. अगोदर बेलनें अपशब्द बोलावयाचा नव्हता व तसें करून, त्यानें जर आपणावर संकट आणलें असेल तर, तें त्याचें त्यानें भोगावें. ’

‘ तें सर्व खरें. पण तो मूर्खपणानें कां होईना, जर संकटांत पडला आहे तर, त्याला आपण मदत करूं नये कां ! मी तर त्यास मदत करण्यास तयार आहें. ’

‘ आणि मी कोठें नाहीं ? परंतु मदत करण्याचे मार्ग निराळे आहेत. त्याला आपल्या अपराधाचा पूर्ण पश्चात्ताप झाला पाहिजे व योग्य मार्गानें संकटांतून पार पडण्यास तो राजी असला पाहिजे ’

'यावरून आमची जी त्यास मदत करण्याची रीत आहे ती तुला नापसंत आहे तर ?'

'हो. मला नापसंत आहे. अशा रीतीनें तो कधींही सुधारावयाचा नाहीं व उलटा तो दुर्गुण त्याचे ठायीं जास्त रुजेल. बेलनें त्या गृहस्थाची क्षमा मागावी, आपणांस पूर्ण उपरती झाली आहे असें प्रिन्सिपाल साहेबांचे अंतःकरणांत ठसवावें व मध्यस्थी करण्याचे कामीं त्यानें स्वतः पुढाकार घेतला पाहिजे. सारांश, मदत करूं लागणारांपूर्वीं संकटांतून मुक्त होण्याकरितां त्यानें प्रयत्न सुरू केले पाहिजेत. सर्वांपूर्वीं स्वतःस मदत करण्यास त्यानें तयार झालें पाहिजे.'

या एकंदर संवादावरून वाचकांस जेम्सच्या स्वभावाचें बहुतेक स्वरूप कळणार आहे. जेम्सच्या वरील बोलण्याचा त्याचे सोंगड्यांवर चांगला परिणाम झाला. ते आपली चूक समजले. बेलनें माफी मागितली व शाळेंतील दंगल मोडली. शाळेला हिंवाळ्याची सुट्टी झाली, तेव्हां खर्चवेंच जाऊन, जेम्सजवळ कांहीं पैसा शिल्लक राहिला. तो सुट्टी होतांच घरीं आला व लागलाच मास्तरची नोकरी शोधण्याचे उद्देशानें दुसरे दिवशीं बाहेर पडला. तो दोन चार गांवीं हिंडून आला, परंतु त्यास कोठें नोकरी मिळेना. सर्व ठिकाणीं पूर्वींच शिक्षक ठेवले होते. त्याची बहुतेक निराशा होऊन तो घरीं आला. ही त्याची स्थिति पाहून त्याचे आईनें त्याचें समाधान केलें व ती ह्मणाली 'जेम्स, निराश होऊं नको. तूं आतां फार दमून आला आहेस, तर जरासें खा व नीज. सकाळीं एमॉस काकांजवळ ही गोष्ट काढ ह्मणजे तुला कांहीं तरी ते युक्ति सांगतील.'

गार्फील्ड कुटुंबास एब्रामच्या मरणानंतर अडचणीच्या प्रसंगीं मदत करणारा व सल्लामसलत देणारा हाच सज्जन गृहस्थ होता. तेव्हां त्यास ही गोष्ट सांगण्यास गार्फील्ड बाईनें सांगितलें व त्यासही तें पसंत पडलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच जेम्स उठण्यापूर्वीं गार्फील्ड बाईस 'तुझा मुलगा कोठें आहे ?' असें विचारीत एक गृहस्थ आला.

'तो घरींच आहे, अजून उठला नाहीं' असें तिनें उत्तर दिलें.

‘ तो लेज येथील शाळा पतकरील काय ? ’ असा त्यानें प्रश्न केला। जेम्स हा हंतरुणांत जागा असून, त्यांचा चाललेला संवाद तो तेथूनच ऐकत होता. त्याच्या कानीं हे वरील शब्द पडतांच तो तटकर उठून बाहेर आला. आलेला गृहस्थ त्याच्या चांगला माहितीचा असून, तो जवळच रहात असे व तो जी शाळा सांगत होता ती तेथेंच जवळ होती.

‘ काय जिम, एवढा हिंवाळाभर आमची शाळा पतकरतोस का ? ’ असें त्या गृहस्थानें जेम्स यास विचारलें.

‘ मला शाळेची जरूर आहे आणि त्याच शोधांत मी आहें. ’ असें जेम्स ह्मणाला. त्यानें एकदम कबुली न देण्याचें कारण त्या शाळेंतील एकंदर मुलें द्वाड आहेत असें त्यास माहीत होतें व ह्मणून तो टाळाटाळी करीत होता.

‘ शाळेंतील मुलें ह्मणजे निव्वळ रानटी आहेत हें तुला ठाऊक आहेच. ’

‘ हो, मला ठाऊक आहे. ती शाळा चालवणें ह्मणजे जरा जडच आहे. तुह्मांला वाटतें का ती मला संभाळतां येईल ? सर्व मुलें माझ्या ओळखीचीं आहेत. ’

‘ तीं सर्व तुला ओळखतात व मनांत आणलेंस तर तूंच तें काम करशील. या कामीं तूंच योग्य दिसतोस. मागील दोन हिंवाळ्यांत त्यांनीं दोन मास्तर पळवून लावले. या हिंवाळ्यांत त्या शाळेवर कोणी तरी इसम मिळावा अशी माझी फार इच्छा आहे. मग त्यानें कांहीं शिकविलें नाहीं तरी चालेल. मारून, ठोकून कसा तरी दरारा त्या मुलांवर त्यानें ठेवला ह्मणजे पुरें. त्यांना चांगलीं चोपलीं कीं तीं आतां ताळ्यावर येतील. मग कसें काय ? जेवून खाऊन बारा डॉलर देऊं. ’

ही एकंदर शाळेची पूर्वपीठिका ऐकून जेम्सची निराशाच झाली; परंतु त्यास कांहीं धीर द्यावा या हेतूनें गार्फील्डबाई मध्यें ह्मणाली ‘ जेम्सला हें बोलावणें अवचित आलें आहे तर, आज विचार करून उद्यां तुह्मांस तो नक्की जबाब देईल. ’

‘ बरें तर. पण ही जागा तूं नाकारूं नयेस अशी माझी फार इच्छा आहे ’ असें ह्मणून, तो इसम गेला.

या बाबतींत काका काय ह्मणतात तें पहावें ह्मणून, तो त्यांकडे गेला व त्यांनींही रुकार दिला. ते ह्मणाले ‘ जेम्स, तूं ती शाळा पतकर व हुशारीनें व युक्तीनें तूं ती चालवलीस तर, शिक्षकाचे धंद्यांत तुझी कीर्ति अजरामर झाली असें समज व हें तुझ्या हातून घडेल अशी मला पूर्ण आशा आहे. ’

असा दुजोरा मिळाल्यावर जेम्सनें ती शाळा पतकरली. दुसरे दिवशीं तो त्या गांवीं गेला. छडीचा उपयोग केल्यावांचून, शाळा सुयंत्रित चालवावयाची असा त्यानें पूर्ण संकल्प केला होता. शाळेंत शिस्त उत्तम असणें अगत्याचें आहे; परंतु ती ठेवतांना कडक उपाय करण्याऐवजीं दयेनें व विचारपूर्वक वागल्यास कार्य चांगलें साधतें. पहिल्याच दिवशीं त्यानें उपक्रम मोठ्या शहाणपणानें केला. तो आपल्या विद्यार्थ्यांस ह्मणाला ‘ मुलांनों, तुमचा अभ्यास लवकर व चांगला व्हावा ह्मणून मी तुह्मांस मदत करण्याकरितां आलों आहें. तुह्मां सर्वांस शाळेपासून होणारा फायदा, तींत आल्यापासून होणारी ज्ञानप्राप्ति व तिची आवश्यकता पूर्णपणें कळत आहे. तेव्हां ज्ञानप्राप्तीचे कामीं सर्वजण एकदिलानें वर्तन ठेवाल अशी मला फार आशा आहे. माझ्यानें होईल तितकें करून आपली शाळा उत्तम ठरावी ह्मणून मी प्रयत्न करीन व तुह्मीं या कामीं मला पूर्ण मदत करण्याचा संकल्प केल्यास तुह्मांस व मला मेहनत करण्यास पुष्कळ वेळ सांपडून आपलें कार्य उत्तम साधेल. ’

अशा प्रकारें शाळेचे कामास सुरवात झाली व त्या कामीं जेम्सला पूर्ण यश प्राप्त झालें. अखेरीस, मुदत पुरी झाल्यावर जेम्स जेव्हां परत येण्यास निघाला तेव्हां ‘ आह्मांस जे शिक्षक आजपर्यंत मिळाले, त्यांत हा उत्तम शिक्षक होता ’ असें मुलांच्या वडिलांचें व मुलांचें मत पडलें.

हिंवाळा सरतांच जेम्स पुन्हां शाळेंत आला. आतां तो स्वतः जेवण करीत नसे. त्यानें आपली जेवणाची व्यवस्था वुडवर्थ मेस्त्रींकडे केली व त्याबद्दल तो त्यांचें काम करी. जेम्सनें चेस्टर येथील शाळेंत तीन वर्षें काढलीं. पुढें शिकण्याचा त्याचा कांहीं विचार नव्हता. आपल्या अति गरीबीमुळें पाठशाळेंत

आपला प्रवेश होणें फार कठीण आहे असें त्यास वाटे. शेवटच्या वर्षी तो चेस्टर येथें असतां, न्यू इंग्लंडकॉलेजमधील एक इसम त्यास भेटला. त्या गृहस्थाचा व त्याचा संवाद होऊन, त्याच्या उत्तेजनामुळें आपणांस कॉलेजमधील शिक्षण संपादितां येईल असें त्यास वाटूं लागलें. त्यानें प्रयत्न करण्याचा निश्चय करून, कॉलिजमध्यें लागणाऱ्या लॅटिन व ग्रीक भाषांचे अध्ययनास सुरवात केली.

चेस्टर येथील शाळेंत असतांच ख्रिश्चियन धर्मांतील एका पंथास तो मिळाला होता व त्या वर्तीनें तो चेस्टर येथें व आजूबाजूच्या खेड्यांत व्याख्यानें देई. त्यावरून बहुतेकांस असें वाटूं लागलें कीं, हा पुढें उपदेशक होणार. त्याची भाषण करण्याची शैली उत्कृष्ट असून, अगदीं साधी व स्वाभाविक अशी असे. यामुळें, त्याचे व्याख्यानास फार मंडळी जमे. त्यांच प्रिन्सिपाल तर ह्मणूं लागले कीं, 'तो जन्मतःच वक्ता आहे व या धंद्यांत तो चांगलें नांव काढील.' त्यावर दुसरा एक गृहस्थ ह्मणाला 'त्याच्या उत्तम वक्तृत्वाचें मुख्य तत्त्व हें आहे कीं, 'त्याच्या वक्तृत्वशक्तीबद्दल तो अगदीं अज्ञानी आहे; व त्याच्या सर्व यशाची गुरुकिल्ली यांत आहे. तो बोलूं लागला कीं, त्याला आपलें भानच रहात नाहीं. भीति वगैरे ती त्याला कशी ती माहीत नसते. भाषण करितांना त्यांत अगदीं तो गढून गेलेला असतो.'

जेम्सच्यासंबंधीं बरेच मंडळीचें असें मत होऊं लागलें होतें; परंतु त्याचें या बाबतींत कांहींच ठाम मत नव्हतें. सोबती सोबती बोलत असतां, त्यांनीं त्यास विचारल्यास तो इतकें ह्मणे कीं, 'बघूं पुढें काय होईल तें. आतांच काय त्याचें. मला उपदेशक होणें आवडतें तसें शिक्षकही होणें आवडतें. कदाचित् वकीलही होईन, पण वैद्य होणें मला मुळींच आवडत नाहीं.'

पुढील शिक्षण संपादण्याकरितां शेतकाम, सुतारकाम वगैरे कामें करून, त्यानें बराच पैसा जमविला. याच सुमारास हिराम शाळेंतील एका विद्यार्थ्याची व त्याची गांठ पडली. त्यांचें बोलणें होऊन, कॉलेजमध्यें जाण्याची तयारी करण्याकरितां त्या शाळेंत त्यानें जावें असें ठरलें.

या वेळीं अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांत गुलामगिरीच्या संबंधानें मोठी धामधूम चालली होती. शाळेंतील वादविवादाच्या सभेंतही ' या लोकसत्तात्मक राज्यांतून गुलामगिरी नाहींशी केली पाहिजे काय ? ' असे विषय घेऊन त्यांवर वाद चालत. जेम्सला गुलामगिरीचा एव्हांपासूनच तिटकारा होता. या विषयावर तो एकदां ह्मणाला कीं, ' आपण स्वतः स्वतंत्र व्हावें ह्मणून, लोकांनीं जिवापाड श्रम करावे, त्या कामीं निकराच्या लढाया कराव्या व दुसऱ्यांना गुलामगिरींत कुचंबत ठेवावें ही गोष्ट राष्ट्रास कालिमा लावणारी आहे. ' या विषयासंबंधी माहिती त्या वेळेपासून त्यानें संपादन करण्याचा सपाटा चालविला व पुढें राजकारणी सभेंत या विषयावर त्यानें पूर्णपणें जय मिळविला.

जेम्सची चेस्टर येथील शाळेंतील बहुतेक मुदत भरत आली. याच सुमारास त्या शाळेंत लुक्रेशिया या नांवाची साधी, सज्जन व हुशार मुलगी शिकण्याकरितां आली. ही मुलगी असाधारण बुद्धिमान् व सद्गुणी आहे असें थोडेच दिवसांत जेम्स यास आढळलें. स्वभावतः विद्यार्थीमुलींत जेम्स यास बसणेंउठणें आवडत नसे; परंतु या मुलीशीं त्याचें बरेंच संघट्टण झालें. तिची सज्जनपणाची व एखाद्या पोक्त स्त्रीप्रमाणें असलेली चालचलणुक, भाषणांतील सभ्यपणा व हुशारी व एकंदर अभ्यासांत तिची तरतरी पाहून, तिच्याकडे जेम्सचें मन वेधलें. यापूर्वीं कोणत्याही मुलीकडे त्याचें इतकें लक्ष्य वेधलें नव्हतें. आतां ह्मणजे कांहीं मनोविकारानें त्याची अशी प्रवृत्ति झाली असें ह्मणाल तर, तसेंही नव्हे; तर या मैत्रीस मुख्य कारण समान शील होय. तिची वर्तणूक व हुशारी पाहून त्याची तिजशीं मैत्री जमली. तीं अभ्यासांत एकमेकांस मदत करीत, ही गोष्ट येथें नमुद करण्याचें कारण इतकेंच कीं, या चरित्रांत पुढें या व्यक्तींची वारंवार गांठ पडणार आहे.

पावसाळ्याची टर्म संपल्यावर, चेस्टर येथील शाळेचा व जेम्सचा संबंध सुटला. शाळेंतील वार्षिक समारंभाचे वेळीं जेम्सचा मान करण्याकरितां त्यास एक भाषण करण्याची मोकळीक दिली होती व तें त्यानें उत्कृष्टपणें केलें. हें त्याचें पहिलें भाषण होय. अशाप्रकारें सहाध्यायी मंडळींत मान

व गुरूंची प्रीति संपादून पुढील अभ्यास करण्याकरितां १८५० च्या नेवेंबर महिन्यांत चेस्टर येथील शाळेंत आपलें नांव ठेवून, तो बाहेर पडला.

# भाग ७ वा.

## हिरामचें विद्यालय.

हिराम येथील शाळेंत जाण्यास बराच अवधि होता, तितक्या दिवसांत त्यानें अनेक धंदे करून बराच द्रव्यसंचय केला. कॉलेजमधील उच्च प्रतीचें शिक्षण आपणास संपादितां यावें अशी त्यास उत्कट इच्छा होती व ती पूर्ण व्हावी ह्मणून त्याचे जिवापाड श्रम चालू होते. हें पाहून त्याचे आईस किती आनंद होत होता ह्मणून सांगावें!

इ. स. १८५१ च्या ऑगष्ट महिन्यांत जेम्स हिराम येथें गेला व तसाच शाळेंत जाऊन, तेथील देवडीवाल्यास ' मला संस्थेच्या अध्यक्षांस भेटावयाचें आहे ' असें त्यानें सांगितलें.

त्या वेळीं शाळेच्या व्यवस्थापक मंडळीची सभा भरली होती व तींत अध्यक्ष आहेत असें देवडीवाल्यानें सांगितल्यावर तो ह्मणाला ' तर मग मला त्यांस भेटतां यावयाचें नाहीं काय ? '

' हो, येईल कदाचित्. ' असें तो पाहरेकरी ह्मणाला व त्यानें वर जाऊन मंडळीस सांगितलें कीं, ' खालीं एक तरुण गृहस्थ आला आहे व आतांच्या आतां तुह्मांस भेटण्याची त्याची इच्छा आहे. '

' वर येऊं दे त्याला ' असें अध्यक्ष ह्मणाले.

जेम्स वर आला व नम्रपणें त्यांस सलाम करून ह्मणाला ' महाराज, माझे मनांत विद्यासंपादन करावी अशी फार इच्छा आहे आणि कांहीं साधलें तर पहावें ह्मणून मी येथें आलों आहें. '

' ठीक. विद्या संपादन करण्यास ही चांगली जागा आहे ' असें अध्यक्ष ह्मणाले व जेम्स यास पुढें बोलण्याची फुरसत न देतां ते ह्मणाले ' तूं कोठून आलास ? '

' ऑरेंजहून. माझें नांव जेम्स एब्राम गार्फील्ड. मला बाप नाहीं. मी लहान असतांच तो वारला. माझी आई आहे, तिचें नांव एलिझा गार्फील्ड.'

' या शाळेंत जें शिक्षण मिळतें तें तुला पाहिजे तर ?'

' होय महाराज. पण माझा खर्च मला झेंपेल तर.'

' तूं गरीब आहेस तर ?'

' हो. परंतु मी आपला खर्च चालवीन. शाळेची घांट वाजविण्याचें व झाडण्याचें काम मला द्याल तर बरें, ह्मणजे माझा खर्च त्यांतून भागेल.'

' तूं किती शिकला आहेस ?'

' मीं चेस्टर येथील शाळेंत सुमार तीन वर्षें अभ्यास केला आहे.'

' वः तेव्हां तुझा बराच अभ्यास झाला आहे तर ?'

' नाहीं, फारसा नाहीं. मीं ल्याटिन व ग्रीक नुकतेंच सुरू केलें आहे.'

' तर मग तुझा कॉलेजांत जाण्याचा विचार दिसतो ?'

' आणि तेवढ्याकरितां तर मी प्रयत्न करीत आहें.'

' मला वाटतें कांहीं दिवसपर्यंत या मुलाला आपण काम देऊन पहावें' असें त्या मंडळीपैकीं एकजण अध्यक्षांस उद्देशून ह्मणाला. त्याला जेम्सचा अर्ज ऐकून फार दया आली होती व होईल तितकें करून त्यास मदत करावी असें त्यास वाटलें.

' होय, उत्तम हेतु धरून तो येथें आला आहे व साधल्यास त्यास मदत करणें आपलें कर्तव्य आहे' असें अध्यक्ष ह्मणाले.

' आमच्या मर्जीनुरूप काम तूं करशील असें आह्मीं कसें समजावें ?' असा दुसऱ्या एका सभासदानें जेम्स यास प्रश्न केला.

' मला ठेवून पहा आणि जर तुमच्या मर्जीप्रमाणें काम झालें नाहीं तर, मी निमूटपणें चालता होईन.' असें जेम्सनें उत्तर दिलें.

जेम्सला यावेळीं एकोणिसावें सरून विसावें वर्ष नुकतेंच लागलें होतें. त्याच्या विनंतीप्रमाणें त्या मंडळीनें त्यास काम दिलें. शाळेच्या अध्यक्षांचें मत घेऊन त्या धोरणानें त्यानें अभ्यासास सुरवात केली. त्यानें एक भाड्यानें जागा घेतली, त्याठिकाणींच दुसरे चार विद्यार्थी रहात होते. जेम्स यास

त्याचें काम करण्याकरितां फार लवकर उठावें लागे. सकाळचे पांचाचे ठोक्याबरोबर घांट द्यावी लागे व त्यांत एक मिनिट मागें कीं एक मिनिट पुढें चालत नसे. याशिवाय शाळा झाडावयाची असे, तेव्हां फारच लवकर तो उठे. असें जरी होतें तरी या कामांत त्याची एक दिवसही कसूर दिसली नाहीं. तत्परता हा त्याचा स्वभावगुणच होता. कोणतेंही व कसेंही काम असेना, तें उत्तम करावयाचें हा त्याचा नेहमींचा धडा असे. त्याचे खोलींतील सोबत्यांपैकीं एके दिवशीं एकजण त्यास ह्मणाला ' जेम्स, तूं आपलें झाडण्याचें काम देखील वर्गांतील धड्याप्रमाणें उत्तम करितोस ! '

' कां बरें करूं नये ? ' असें जेम्स ह्मणाला.

' पुष्कळ लोक महत्त्वाचीं कामें असतात तीं काळजीपूर्वक व उत्तम करितात व धडा हा झाडण्यापेक्षां जास्त महत्त्वाचा आहे. '

' तुझें बोलणें मला मोठेंच चमत्कारिक दिसतें; आणि सर्वच बाबतींत जर असें तुझें मत असेल तर, या जगांत तुझा प्रवास सुरक्षित होणें कठीण आहे. माझ्या मतें प्रत्येक गोष्ट आपापल्यापरी फार महत्त्वाची आहे. ग्रीक किंवा ल्याटिन भाषेचा धडा जितका महत्त्वाचा आहे तितकेंच झाडणेंही आहे व तूं ह्मणालास त्याप्रमाणें धड्यासारखें तें केलें पाहिजे. '

' जेम्स, खरोखर तुझें बोलणें अक्षरशः खरें आहे. मी आपली चूक कबूल करितों. '

' माझें तर असें मत आहे कीं, जो मुलगा यत्किंचित् झाडण्यासारखी गोष्ट उत्तम करीत नाहीं, त्याचे हातून अभ्यासही होणार नाहीं. आतां या गोष्टीस कांहीं अपवाद निघतील, पण हा नियम अगदीं खरा आहे. '

त्याचा सोबती ह्मणाला:– जेम्स, तुझें बोलणें खरें आहे, पण या नियमाप्रमाणें चालणारे फारच थोडे असतात. अशीं पुष्कळ कामें आहेत कीं, तीं करण्याकडे बहुतेक लोक दुर्लक्ष्य करितात.

' हें तुझें ह्मणणें खरें असेल; त्या बाबतींत माझा तुझ्याशीं वाद नाहीं. परंतु, बरेच लोकांना त्यांच्या कामांत जें यश येत नाहीं त्याचें इंगित यांत आहे. अमुक ह्मणजे चांगलें करावयाचें असें मुळीं त्यांचें ठरलेलेंच नसतें.

मीं थोडे दिवसांपूर्वीं फ्रँकलिनचें चरित्र वाचलें, त्यांत त्याचें असें मत आहे कीं, ' मनुष्याच्या एकंदर क्रियेचें तत्त्व पक्केपणा हें असावें '. ह्मणजे हरएक काम त्यानें होतां होई तों उत्तम व परिपूर्ण करण्याचा नियम ठेवावा. '

' आणि ह्मणूनच तूं झाडण्याचें काम इतकें नामी करतोस तर ? '

' हो, ह्मणूनच. अमुक एक काम मनुष्यानें पूर्ण व उत्तम करावें व अमुक करूं नये, याचें कारण मला मुळींच समजत नाहीं. माझ्या मतें अर्धपडें काम करण्यास जी मेहनत लागते त्यापेक्षां काम पूर्ण व उत्तम प्रकारें करण्यास उलटी कमीच मेहनत पडते. '

या एकंदर संवादावरून जेम्सची हरएक काम करण्याची पद्धत कशी होती याचें पूर्ण अनुमान होतें. पूर्वीं त्यानें शाळेचे व्यवस्थापकांस त्याला काम देऊन पाहण्यास सांगितलें होतें व तें उत्तम प्रकारें बजावलें जात आहे असें पाहून, त्या कामावर त्याची कायमची नेमणूक झाली.

हें त्रासदायक काम असून, जेम्स तें कसें करी याबद्दल अनेकांचे उत्तम अभिप्राय आहेत. त्यांपैकीं जेम्सच्या वेळींच शाळेंत असलेल्या एका स्त्रीचें खालीलप्रमाणें मत आहे. " जेम्स पहिल्यानें शाळेंत आला तेव्हां तो शाळा झाडण्याचें व घांट वाजविण्याचें काम करून शाळेची फी वगैरे देत असे. उजाडतें आहे नाहीं तोंच घांटेची दोरी हातांत धरून, शिक्षकांस व विद्यार्थ्यांस इशारा देण्यास तो उभा आहे असें नेहमीं आढळे. इतकेंच नाहीं तर आज कितीक वर्षें झालीं तरी त्याची मूर्ति माझे अंतःकरणांत उभी आहे. आह्मी त्याचे जवळून वर्गांत जाऊं लागलों कीं, प्रत्येकाशीं कांहींना कांहीं तरी तो विनोद करावयाचाच. परंतु त्याचा कोणास राग आला नाहीं. सर्व मंडळीस तो अगदीं प्रिय असे. त्याचें नेहमींचें वर्तन चांगलें असून, संभाषणाचा तो तर मोठा शोकी. त्याचें भाषण मोठें मार्मिक व विनोदी असे व त्या योगानें सर्वत्रांस आनंद होई. जाणून बुजून दुसऱ्याचें अंतःकरण तो कधींही दुखवावयाचा नाहीं. या एकंदर गुणांमुळें तो मोठा लोकप्रिय असे. "

हा अभिप्राय वाचकांनीं फार विचार करण्यासारखा आहे. झाडणें व घंटा वाजविणें हीं हलकीं कामें करणारा मनुष्य लोकप्रिय होण्यास त्याचे ठायीं खात्रीनें कांहीं अलौकिक गुण असले पाहिजेत. मोठ्या महत्त्वाच्या कामाप्रमाणेंच यत्किंचित् काम देखील नीट मन लावून करणें हा त्याचें ठायीं मोठा अलौकिक गुण होता. या गुणापासून फार महत्त्वाचा धडा शिकतां येणार आहे. खरें पाहूं जातां त्यानें आपल्या वर्तनानें यत्किंचित् घांट वाजविण्यासारखें कामही मोठें मानास्पद केलें. जें काम हलकट समजून पूर्वीं कोणीही मुलगा करण्यास तयार नसे तें मोठ्या हौसेनें आतां कित्येक मुलें करण्यास तयार झालीं. कोणतेंही जरूरीचें व उपयोगीं काम हें महत्त्वाचें असतें. कोणत्याही कृत्याचा मोठेपणा अगर हलकेपणा हा बहुतांशीं तें करणारावर अवलंबून असतो. हें तत्त्व त्या शाळेंतील मुलांस जेम्सनें शिकविलें ह्मणावयाचें.

त्या शाळेच्या पुस्तकसंग्रहांत सुमार हजार निवडक ग्रंथ होते. फावल्या वेळांत या ज्ञानभांडारांतून ज्ञानधन लुटण्याचा त्याचा क्रम चालू होता. जेम्सची पुस्तकें वाचण्याची तऱ्हा पद्धतशीर असे. प्रत्येक पुस्तक वाचतांना त्यांत कोणकोणत्या निरनिराळ्या विषयांचें विवरण केलें आहे तें पुन्हां जरूर लागल्यास सहज सांपडावें ह्मणून, तो आपल्या स्मरणवहींत विषय व पानें पद्धतशीर टिपून ठेवी. असें केल्यानें त्यास दुसरा एक फायदा असा होई कीं, पुस्तकांतील मुख्य मुद्दे त्याचे अंतःकरणांत चांगले ठसत. वाचन, संभाषण व लेखन हे ज्ञानप्राप्तीचे जे मार्ग त्यांचें तो पूर्णपणें अवलंबन करी. कोणतेंही पुस्तक त्याच्या हातांत पडो, तें ह्या तिन्ही चाळणींतून गेल्याविना कधींही राहिलें नाहीं. या त्याच्या पद्धतीमुळें त्याच्या सोबत्यांसही फार फायदा घडे. तो आपल्या मित्रांस वारंवार ह्मणे कीं, " दूरवर विचार केला तर या वाचनाचे पद्धतीनें मी आपला पुष्कळ वेळ वांचवीत आहें असें मला वाटतें. पुढें जेव्हां मला जरूर लागेल तेव्हां हे सर्व श्रम माझे फार उपयोगीं पडतील. पुढें संभाषण करितांना, एखाद्या विषयावर वादविवाद करितांना अगर कांहीं लेख लिहितांना, मला जेव्हां विविध माहितीची

जरूर लागेल तेव्हां हींच माझीं टांचणें मोठीं अमोलिक ठरतील. कोणती माहिती कोठें मिळेल हें त्यांवरून मला तेव्हांच समजेल. माझा वेळ मुळींच मोडणार नाहीं." यावरून शिक्षणाचें खरें महत्त्व जेम्स याचे मनांत पूर्णपणें बिंबलें होतें असें दिसतें.

जेम्स शाळेंत आल्यावर कांहीं दिवसांनीं शाळेचे अध्यक्षांनीं शाळेंतील मुलांस अशी सूचना केली कीं, प्रत्येक विद्यार्थ्यानें शेजारच्या रानांत जाऊन एक एक लहान झाड आणावें व तें शाळेच्या पटांगणांत लावावें. अशा योगानें दहा वीस वर्षांत चांगली गर्द झाडी होऊन, पुढें येणारे विद्यार्थ्यांस चांगलें क्रीडांगण तयार होईल. ही सूचना जेम्स यास फारच पसंत पडली. 'दसका लकडी एकका बोजा' या न्यायानें विशेष श्रम न पडतां चांगलें कार्य घडणार आहे हें पाहून, सर्वत्रांस तो विचार मान्य झाला; इतकेंच नव्हे तर शाळेंत ज्या कांहीं मुली होत्या त्यांचे ऐवजीं झाडें आणून लावण्याचेंही मुलांनीं खुषीनें पतकरिलें व थोड्याच दिवसांत शाळेचे पटांगणांत व पुढील रस्त्यावर दुतर्फा झाडांची लागवड झाली.

जेम्सचे अंगीं न्यायनिष्ठा उत्तम प्रकारें वसत असे. त्याचें एक उदाहरण पूर्वींच दिलें आहे. यत्किंचित् बाबींतही अन्याय झालेला त्यास खपत नसे. त्यास सर्व मर्दानी खेळ मनापासून आवडत, परंतु ते खेळण्यास त्यास क्वचित्च वेळ सांपडे. परंतु वेळांत वेळ काढून तो ते खेळण्यास येई. असाच एकदां चेंडुफळीचा खेळ खेळण्याकरितां शाळेंतील सर्व मंडळी जमली असतां, तो आला होता. लहानमोठ्या सर्व मुलांनीं खेळांत असावें असें त्यास वाटे. खेळण्याकरितां जेम्सनें दांडू उचलला व आतां खेळास सुरवात होणार तों जवळ उत्सुकतेनें व हिरमुसलीं तोंडें करून, उभीं असलेल्या लहान मुलांकडे त्याची नजर गेली; व त्यानें दुसऱ्या मुलांस विचारलें "हीं मुलें खेळांत नाहींत का?"

"काय, हीं लहान पोरें! नाहींत. त्यांना घेतलीं तर उगाच खेळांत गोंधळ मात्र होईल" असें एक मुलगा ह्मणाला.

"पण त्यांना खेळावेंसें वाटत आहे. येत ना कां तीं?"

‘ नाहीं, उगाच खेळ बिघडवून टाकण्याची आमची इच्छा नाहीं. त्यांना काय खेळतां येत आहे ? ’

‘ त्यांना जर घ्यावयाचीं नसतील तर आपणही येत नाहीं ’ असें ह्मणून जेम्सनें आपल्या हातांतील दांडू टाकून दिला.

‘ बरं, येऊं द्या त्यांना ’ असें एक मुलगा ह्मणाला. ‘ मुळींच खेळ बंद पाडण्यापेक्षां तुझे मनांतून तो बिघडावा असें असेल तर बिघडेना बापडा. ’

जेम्सनें हातांत दांडू घेतला व त्या लहान मुलांस खेळण्यास हांक मारून तो ह्मणाला ‘ ह्या लहान मुलांस खेळाला घेतल्यानें जी कांहीं मजा होणार आहे ती निराळीच. असें केल्यानें खेळ ह्मणजे अगदीं शास्त्रोक्त होईल असें नाहीं; परंतु सर्वत्रांचें मनरंजन होईल व खेळाचा उद्देश तो काय ? हाच. ’

या व मागील एक दोन प्रसंगांवरून जेम्स जो सर्वत्रांस प्रिय होता त्याचें इंगित सहज कळणार आहे. ही गोष्ट घडण्यास त्याची वर्तणूक व त्याचे अंगीं असलेले गुण मुख्यत्वें कारणी होत.

सुमार वर्ष झाल्यावर जेम्सकडून झाडण्याचें व घांट वाजविण्याचें काम काढून, त्या शाळेंत प्राचीन व इंग्लिश भाषेचा असिस्टंट शिक्षक या जागीं त्याची नेमणूक झाली. आतां जेम्स हा विद्यार्थी, शिक्षक व सुतार बनला. सुतारकाम ह्मणजे त्याच्या आवश्यक कामांपैकींच एक बनून गेलें होतें. केव्हांही सकाळीं व सायंकाळीं पहा, तो त्या कामावर असावयाचाच.

जेम्सला सुतारकाम करीत असतां पाहिलें ह्मणजे त्याच्या सोबत्यांत त्याविषयीं वारंवार संभाषण होई. कोणतेंही काम तो उत्तम करितो हें पाहून त्यांस फार आश्चर्य वाटे. अभ्यास असो, शिकवणें असो, अगर खेळ असो, प्रत्येक काम तो मनापासून करी व त्याचें यश सर्वस्वीं या काम करण्याचे पद्धतींत आहे असें त्यास वाटूं लागून, तसें आपण वागावें असें त्यांच्या मनांत येऊं लागलें. त्यांनीं त्यास काम करितांना पाहिलें ह्मणजे बेन्टले नांवाच्या धर्मोपदेशकाची त्यांस आठवण होई. ‘ तुमच्यावर कोणतेंही काम पडो, तें तुह्मी मनापासून व कसून करा ’ हा जो त्यांचा उपदेश तो उदाह-

रणानें व्यक्त करून दाखविण्याकरितांच जेम्सचें येथें आगमन नसेलना ? ते उपदेश करितात व हा उदाहरण घालून देतो; व जोंपर्यंत जेम्स शाळेंत आहे तोंपर्यंत त्यांचा उपदेश कोणीही विसरणार नाहीं असें तीं ह्मणत.

हिराम येथील विद्यालयांत जेम्स यास तीन अलौकिक व्यक्ति आढळून आल्या, त्यांपैकीं अलमेडा बूथ नांवाच्या स्त्री विद्यार्थ्यांशीं त्याचा बराच स्नेह जमला. ही स्त्री त्या शाळेंत शिक्षकाचें काम करीत असून, तेथें गणिताचा व भाषाविषयाचा तिनें अभ्यास चालविला होता. ती नामांकित हुशार असून फार सुस्वभावी होती. जेम्स यास या बाईचें बरेंच साह्य झालें. तिच्या ठायींही जेम्सबद्दल पूर्ण आदर होता. तीं दोघें एके ठिकाणीं अभ्यास करीत व त्यामुळें जेम्स यास बराच फायदा झाला. एखादे वेळीं कांहीं विषयावर संभाषण अगर विचार करीत तीं बसलीं ह्मणजे रात्र केव्हां गेली हेंही त्यांस समजत नसे.

ख्रिश्चियन धर्मापैकीं जेम्स हा ज्या पंथास मिळाला होता त्या पंथाचे लोकांनीं चालविलेलीच हिराम येथील शाळा होती. त्या पंथाचें जें गावांत देऊळ होतें त्यांतील धर्मोपदेशक पूर्वीं सांगितलेले बेन्टले साहेब हे असत. या धर्मपंथाच्या लोकांच्या वारंवार सभा भरत व जेम्स प्रसंगोपात्त त्यांत संभाषण करी. त्याची वक्तृत्वशैली व उपदेश करण्याची कळकळ हीं पाहून, बेन्टले साहेबांस फार समाधान होई व एखादे वेळेस तो जर सभेंत नसला तर त्यांस चैन पडत नसे. ते वारंवार देवळांत उपदेश करण्याकरितां त्यास बोलावीत व आपले गैरहजेरींत आपलें उपदेश करण्याचें काम त्यावर टाकीत व जेम्स तें त्यांच्या मर्जीनुरूप नव्हे तर कांकणभर सरस पार पाडीत असे.

एकदां असें झालें कीं, नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें व्यासपीठावर बेन्टलेसाहेबांच्या शेजारीं आपलें दर आठवड्याचें नेमलेलें काम करण्याकरितां जेम्स बसला होता. बेन्टले साहेबांची प्रार्थना संपल्यावर त्याचे कामास सुरवात व्हावयाची होती. इतक्यांत गावांत एक राजकीय प्रकरणांत सभा भरली होती, तींत भाषण करणारा वक्ता ऐत्या वेळीं फसल्यामुळें, जेम्स यास तिकडून बोलावणें आलें. जेम्स आपल्या जागेव-

रून उठून कांहीं पावलें जाईपर्यंत, बेन्टले साहेबांस काय चाललें आहे हें कांहीं कळलें नाहीं. जेम्सला जातांना पाहून तें त्यास हाक मारून ह्मणाले " जेम्स, जाऊं नको. " परंतु तितक्यांत आपण करीत आहों ही गोष्ट चुकत आहे असें त्यांस वाटून कीं काय, ते जमलेल्या मंडळीस ह्मणाले " बरं, जाऊं द्या. मी खात्रीनें सांगतों, हा मुलगा पुढें मागें स्वतंत्र संस्थानांचा प्रेसिडेन्ट होईल. "

त्याची सहाध्यायी व इतर त्यावेळीं हिरामचे विद्यालयांत असलेली मंडळी त्याचे वक्तृत्वासंबधी असें ह्मणते कीं, " त्याची भाषा जोरदार असून बोलणारांचे मनांतील कळकळ पूर्णपणें व्यक्त करणारी होती. त्याचें भाषण चर्वितचर्वण नसून, स्वाभाविक व नवीन विचारांनीं भरलेलें असे. उगाच दुसऱ्या ग्रंथकारांच्या विचाराचा अनुवाद त्यांत नसे. विषय प्रतिपादन करण्यांत नवीनपणा असणें हें त्याचे भाषणाचें प्रथम तत्त्व असे. तें तयार करण्यांत तो आपलें बुद्धिसर्वस्व खर्ची. इतकें असून, भाषेवर त्याची अशी कांहीं छाप असे कीं, संभाषण करीत असतां ती त्यापुढें हात जोडून उभी असे. त्याचें भाषण सुरू झालें कीं, एखाद्या मोठ्या नदीप्रमाणें त्याचा सारखा ओघ सुरू होई. तें मुद्देसूद व प्रोक्त असून, मनोरंजक असे व त्यामुळें, श्रोत्यांस कंटाळा असा कधींही येत नसे. त्यानें तोंड उघडण्याची मात्र खोटी कीं, यंत्रांतून जसें कापड नीटसर बाहेर यावें त्याप्रमाणें व्यवस्थित रीतीनें व सर्वालंकृत अशी वाग्देवीच त्याचे मुखांतून अवतीर्ण होत आहे कीं काय असें वाटे. फार काय सांगावें, जेम्स यास श्वासोच्छ्वास करणें व संभाषण करणें हीं दोन्हीं सारखीं होतीं. "

जेम्स हा हिरामचे विद्यालयांत असिस्टंट शिक्षकाचें काम करीत असतां, चेस्टर येथील शाळेंत ज्या मुलीशीं त्याचें चांगलें सख्य झालें होतें ती लुक्रेशिया नांवाची मुलगी त्याचे वर्गात विद्यार्थी होती. तिची पुन्हां भेट झालेली पाहून, जेम्स यास आनंद झाला. असला अलौकिक विद्यार्थी आपले हाताखालीं शिकत आहे हें पाहून त्यास फार समाधान वाटे. विद्यार्थी व शिक्षक यांपेक्षां आपला अधिक निकट संबंध या मुलीशीं घडेल असें त्याच्या स्वप्नींही

नव्हतें. परंतु हळू हळू तिची तरतरी, सुस्वभाव, सद्वर्तन व बुद्धिमत्ता पाहून, त्याचें तीवर अतिशय प्रेम जडलें. याचा एकंदर शेवट असा झाला कीं, जेम्स शाळा सोडून कॉलेजमध्यें जाण्यापूर्वी त्यांची परस्परांवर निस्सीम प्रीति बसली व जेम्सचा विद्याभ्यास पुरा झाल्यावर त्याची पत्नी होण्याचें तिनें कबूल केलें. या वेळीं जेम्सचें वय बावीस वर्षांचें असून, लुक्रेशिया त्यापेक्षां एका वर्षानें लहान होती.

जेम्सनें हें कृत्य फार महत्त्वाचें केलें व त्याचा शेवट गोडच झाला. कांहीं लोकांनीं जेम्सच्या या कृत्यामुळें, त्याच्या पुढील अभ्यासांत व्यत्यय येईल असें अनुमान केलें होतें; परंतु तें खोटें ठरलें. इतर तरुण मंडळीप्रमाणें नीतिधैर्याचा अभाव त्याचे ठायीं नसून मोहपाशांत गुंतून जाण्याइतका तो मूर्ख नव्हता. या घडलेल्या गोष्टीमुळें, आपणावर विशेष जबाबदारी पडली असें त्यास वाटूं लागून, त्याचेमध्यें असलेल्या उणिवी भरून काढण्याचा त्यानें विशेष प्रयत्न चालविला. खरें प्रेम हें मोठ्या अलौकिक बुद्धिमत्तेपेक्षांही श्रेष्ठ व आनंददायक आहे व त्याच्या सान्निध्याचा शुद्ध परिणाम बुद्धीवर झाल्यावर त्यापासून होणाऱ्या फलप्राप्तीचें महत्त्व काय वर्णन करावें ?

जेम्सचा स्वभाव फार मनमिळाऊ होता. तो मंडळींत असला ह्मणजे तेथें आनंदीआनंद असावयाचा. तो मोठा बोलका होता, परंतु त्याचें बोलणें अश्लिष, निरर्थक असें कधींही नसे. तें नेहमीं खुबीदार, भारदस्त व शिक्षण घेण्यालायक असे. त्याची स्मरणशक्ति तर अशी कांहीं तरतरीत होती कीं, प्रसंगोपात्त कविता, पुस्तकांतील दुसरे वेंचे, तो जसेच्या तसे व केव्हांही ह्मणत असे.

तो ज्या कामांत हात घाली त्यांत त्यानें यश संपादलेंच ह्मणून समजावें. अमुक एक गोष्ट हातांत धरली व तींत त्यास यश आलें नाहीं असें कधींच झालें नाहीं. त्यानें चित्रकलेचा अभ्यास करून तींत बरेंच प्रावीण्य संपादिलें. या एकंदर यशप्राप्तीची गुरुकिल्ली ह्मणाल तर, हरएक कामीं दृढ निश्चयानें सतत परिश्रम करणें ही होय. तो जरी बुद्धिमान् होता तरी, त्याचे ठायीं सतत परिश्रम करण्याची शक्ति नसती तर एकट्या बुद्धीनें

इतकी तयारी होतीना. त्याच्या यशाचें गूढ स्वावलंबन व सतत उद्योग ह्यांत होतें. जेम्सची विलक्षण तयारी व बुद्धिमत्ता पाहून शाळेचे व्यवस्थापकांत त्याविषयीं महत्त्वाचें संभाषण होऊं लागलें.

शाळेच्या व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष एकदां मंडळी जमली असतां ह्मणाले " जेम्सचा कॉलेजमधील अभ्यास पुरा झाल्यावर, तो आपल्या संस्थेस येऊन मिळेल असें करणें मला अवश्य दिसतें; कारण, पुढें तो मोठा नामांकित व सर्वांस प्रिय असा शिक्षक होईल, असा माझा तर्क आहे. "

' हो, हें खरें आहे. कोणत्या विषयावर तुह्मी त्यास नेमणार ? ' असें एकजण बोलला.

' ज्या विषयाची जागा रिकामी असेल त्या विषयावर. त्याला कोठेंही घाला तो तें काम उत्तमच करणार. माझ्या तर असें अनुभवास आलें आहे कीं, आपण अमुक एक विषय तो चांगला शिकवील ह्मणून त्यास नेमावें तर दुसऱ्या एकाद्या विषयांतही तो तितक्या उत्तम तऱ्हेनें काम करूं शकेल असें आपणास आढळून येतें. मला तर वाटतें कीं, शाळेंतील एखाद्या उच्च जागीं त्यास नेमलें तर, शाळेचा चांगला लौकिक वाढेल व ही गोष्ट त्यासही नापसंत होणार नाहीं ' असें मंडळीचे अध्यक्ष ह्मणाले.

हा विषय इतकाच थांबला. व्यवस्थापक मंडळीचे अध्यक्ष व शाळेचे प्रिन्सिपाल यांनीं ही गोष्ट जेम्सजवळ काढली व कॉलेजशिक्षण पुरें झाल्यावर तो संस्थेस येऊन मिळणार असें बहुतेक ठरल्यासारखें झालें.

हिरामचे शाळेंत शिक्षकानें काम करीत असतां, त्यानें चांगलें नांव मिळविलें. मुलांमध्यें ज्ञानप्राप्तीची लालसा व ईर्षा उत्पन्न करण्याचें व मुलांचे मनांत कोणताही विषय पूर्णपणें बिंबवून देण्याचें सामर्थ्य त्याचे ठायीं अलौकिक होतें. त्याला माणसाची पारख फार नामी असून, कोणत्या मुलांत काय गोम आहे हें तो तेव्हांच समजे. वर्गांत जीं कांहीं आळशीं व भित्रीं मुलें असतील त्यांवर त्याचें विशेष लक्ष्य असून, त्यांस उत्तेजन देऊन व विशेष साह्य करून त्यांचे ठायीं ज्ञानप्राप्तीबद्दल आवड व स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल योग्य अभिमान तो उत्पन्न करी. तो शिकवीत असला ह्मणजे विद्यार्थ्यांस कंटाळा ह्मणून कधीं

आला नाहीं. नानाप्रकारचीं व प्रसंगास साजेशीं उदाहरणें देऊन, हंसत खेळत तो मुलांस शिकवी. गणितासारखा कंटाळवाणा विषय असला तरी सर्व विद्यार्थ्यांचें लक्ष्य त्याचेकडे वेधलेलें असे. वर्गांत ह्मणजे कोणीं दांडगाई अगर गैरशिस्त वर्तन कधीं केलें आहे असें मुळींच घडत नसे.

शाळेंतील अभ्यास पूर्ण झाल्यावर कॉलेजमध्यें जाण्यापूर्वीं त्यानें दोन चार कॉलेजांच्या अध्यक्षांस पत्रें पाठवून, खर्च वगैरे काय येईल व शिक्षण किती दिवसांत पुरें होईल वगैरे तपास केला. सर्वांकडून शिरस्त्याप्रमाणें उत्तरें आलीं; परंतु विल्यम्स् कॉलेजचे प्रिन्सिपाल यांचे पत्रांत इष्ट ती माहिती असून अखेर त्यांनीं असें लिहिलें होतें कीं, "तूं जर आमचे कॉलेजमध्यें आलास तर आमच्यानें होईल ती मदत आह्मी तुला आनंदानें करूं" हें पत्र वाचून जेम्सनें त्या कॉलेजांत जाण्याचा निश्चय केला.

कॉलेजमध्यें जाण्यास थोडे दिवस उरले, तेव्हां एकदां जेम्सला त्याचा भाऊ ह्मणाला 'जेम्स, पैशाची काय तजवीज केली आहेस ! कॉलेजचा खर्च भागण्यापुरता पैसा तुजजवळ नसेल.'

'नाहीं. सुमार अर्धा खर्च भागण्यापुरेशी शिल्लक मजपाशीं आहे. परंतु हिवाळ्यांत मी शाळा शिकवीन व कदाचित् कॉलेज सुरू असतां मला कांहीं कामही मिळेल व असें करून मी खर्च चालवीन.'

'पण तूं तर मदतीपूर्वीं दोन वर्षें कॉलेजमध्यें जात आहेस, तेव्हां तुला अभ्यास बराच पडेल व तो करून, आणखी दुसरी मेहनत करणें फार त्रासदायक होईल. तेव्हां मी तुला आतां उसने पैसे देतों व ते तूं अभ्यास आटपल्यावर सहज फेडशील.'

'पण कल्पना कर कीं, मी जर मध्येंच मेलों तर तुला पैसा कसा मिळणार ?'

'त्याचें तुला काय ? तें जोखीम माझ्यावर.'

'हें बरें नव्हे. मजकरितां तूं बुडावेंस असें मला वाटत नाहीं. याला एक युक्ति आहे. तूं मला पैसा उसना दे. मी पांचशें डॉलरला माझा विमा उतरतों. जर कदाचित् मेलोंच तर तुझ्या पैशाला बूड नको.'

‘ बरें, ठीक आहे. ’ असें भावानें उत्तर दिलें.

‘ झालें तर, ठरलें. या रीतीनें माझी एक काळजी दूर झाली व मला कॉलेजमध्येंही दोन वर्षे चांगला अभ्यास करावयाला सांपडेल. ’

याप्रमाणें ठरून जेम्सनें आपल्या आयुष्याचा विमा उतरला व पॉलसी भावापाशीं देतांना ह्मणाला ‘ जर मी जगलों तर तुझे पैसे परत करीन, नाहींतर तुला तोटा नाहीं. ’

जेम्सनें हिरामचे विद्यालयांत तीन वर्षे काढलीं. इतक्या अवधींत कॉलेजमध्यें प्रवेश होण्यास लागणाऱ्या चार वर्षांत होणारे अभ्यास, शिवाय कॉलेजमधील दोन वर्षांचा अभ्यास असा एकंदर सहा वर्षांचा शिक्षणक्रम त्यानें तीन वर्षांत पुरा केला व तो करीत असतां घांट वाजविण्याचें, सुताराचें व शिकविण्याचें वगैरे कामें करून, शाळेचा सर्व खर्च सोडवून, कॉलेजमध्यें खर्चाकरितां ह्मणून कांहीं शिल्लक पाडली.

---

# भाग ८ वा.

## कॉलेज.

उन्हाळ्याची सुट्टी होण्याचे पूर्वी थोडे दिवस विल्यमस् कॉलेजची नवीन मुलें घेण्याची प्रवेशपरीक्षा झाली. डॉक्टर हॉफाकिन्स साहेबांस जेम्सनें जें पूर्वी पत्र पाठविलें होतें त्याचें अंतरंग व बहिरंग जसें उत्तम होतें तसा खुद्द जेम्स नव्हता. तो दिसण्यांत उंच व गांवढळ असून, त्याचा पोषाख कसा तरी असे. त्याचें कपाळ उंच व भव्य असून त्यावर रांठ व उभे तरतरीत असे केंस असत. त्याची एकंदर चर्या गंभीर असून, पाहणारास तो दयाळु व मोकळ्या मनाचा आहे असें तेव्हांच वाटे. अति श्रम व काबाडकष्ट केल्याचें चिन्ह त्याचे चेहऱ्यावर मुळींच दिसत नसे. तो पुढें येतांच हा कॉलेजांत येणाऱ्या उमेदवारांपैकीं एक आहे असें त्यांस मुळींच वाटलें नाहीं व जेम्सच्या एकंदर चेहऱ्यामोहऱ्यावरून तसें होणें साहजिक होतें.

'माझें नांव गार्फील्ड व मी ओहिओहून आलों आहें' असें जेम्स ह्मणाला. इतकीच प्रस्तावना पुरे झाली. वरील शब्द ऐकतांच डॉक्टर साहेबांच्या पुढें जेम्सनें पाठविलेलें पत्र उभें राहिलें व त्यांनीं आपल्या पत्रांत लिहिलेलें उत्ते-जनपर वाक्य पुन्हां उच्चारिलें. जेम्सला हें पाहून जो कांहीं आनंद झाला तो अवर्णनीय होय. त्याला आपल्या पित्याची मुळींच आठवण नव्हती, परंतु डॉक्टर हॉफकिन्स हे आपणास विद्यादान करणारे पितेच भेटले असें त्यास वाटूं लागलें. विद्वत्तेची व बुद्धिमत्तेची पूर्णपणें साक्ष देणारें तें डाक्एर साहे-बांचें भव्य डोकें व गंभीर चेहरा पाहून त्याच्या अंत:करणांत त्यांविषयीं एक प्रकारचा पूज्यभाव व दरारा उत्पन्न झाला. आपण अगदीं योग्य स्थळीं आलों असें त्यास वाटूं लागलें.

जेम्स हा प्रवेशपरीक्षेंत पसार होऊन, त्यास कॉलेजमध्यें घेतलें. त्यास ज्या वर्गांत घेतलें त्या वर्गांतील मुलें त्याचे पूर्वीं दोन वर्षें कॉलेजमध्यें आलेलीं होतीं. तेव्हां हिराम शाळेंत असतांना त्यानें स्वत:च्या मेहन-तीनें व विशेष कोणाचें साह्य न घेतां जी तयारी केली होती ती कशाप्र-कारची होती याचें चांगलें अनुमान होतें.

उन्हाळ्याच्या रजेची वेळ आली, तेव्हां डॉक्टर हॉफकिन्स हे त्यास ह्मणाले 'जेम्स, तुला जर वाचनाची गोडी असेल, तर सुट्टी सरेपर्यंत कॉले-जच्या पुस्तकालयाचा उपयोग करण्याची तुला मोकळीक आहे. तूं सुट्टींत कोठें बाहेर गांवीं न जातां जर येथेंच राहशील तर, तुला तुझी ग्रंथवाच-नाची लालसा पूर्ण करण्यास उत्तम संधि आहे.'

'मी रजेंत येथेंच राहीन व तुह्मीं मला पुस्तकालयाचा उपयोग करून घेण्याची जी मोकळीक दिली आहे तीबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. इतके दिवसपर्यंत माझी मनीषा पूर्ण करण्यास मला वेळच मिळाला नाहीं; कारण, शिक्षणाचा खर्च भागविण्याकरितां मला स्वत: खपावें लागे. तेव्हां अशाप्रकारें दुसरें कांहीं काम नसतां कांहीं दिवस निव्वळ वाचनांत घाल-विण्यास मला सांपडले तर, मोठा फायदाच होणार आहे.' असें जेम्सनें उत्तर दिलें.

डॉक्टरसाहेबांनीं त्यास रजेंत व कॉलेज चालू असतां कसें वागावें या बाबतींत चांगला उपदेश केला व हरएक गोष्टींत ते त्यास उत्तेजन देत असत. जेम्सनें वाचनास सुरवात केली. असला प्रचंड ग्रंथसंग्रह त्यानें पूर्वी कधींही पाहिला नव्हता. रजेंत त्यानें शेक्सपिअरसारख्या इंग्रजी ग्रंथकारांचे ग्रंथ वाचले व त्यांत चांगलेंच प्रावीण्य संपादलें. कादंबऱ्या तो मुळींच वाचीत नसे. अशारीतीनें रजा कॉलेमध्यें घालविल्यामुळें त्यास बराच फायदा झाला.

हल्लीं शिक्षणाचा खर्च भागविण्याकरितां कोणतेंही शारीरिक अगर मानसिक काम त्यास करावयाचें नसल्यामुळें, वाचनास व अवलोकनास त्यास पुष्कळ वेळ मिळे व ही स्थिति पुष्कळ बाजूनें फायदेशीर होती. आंगमेहनतीचें कांहीं काम नसल्यामुळें, कांहीं तरी व्यायाम असावा ह्मणून सभोंवारच्या प्रदेशांत सकाळसायंकाळ तो सहल करण्यास जाई. मोठमोठ्या डोंगरांवरून, अनेक दऱ्याखोऱ्यांतून मैलचे मैल तो सहल करी व अशारीतीनें व्यायामचा व्यायाम होऊन, सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्यासही सांपडे. एकंदरींत विद्यार्थीदशें-तील सर्व काळांत जेम्सला हा काळ फारच हितप्रद झाला.

कॉलेजची रजा संपून, अभ्यासक्रमास सुरवात झाली. जेम्सचा साधा पोषाख व कांहींशी गांवढळ वागणूक पाहून, पहिल्या पहिल्यानें इतर विद्यार्थ्यांस मोठी मजा वाटे; परंतु थोड्याच दिवसांत त्याचें बुद्धिसामर्थ्य त्यांचे नजरेस आलें व त्याची योग्यता त्यांस कळून, हिरामचे विद्यालया-प्रमाणें कॉलेजांतील सर्व विद्यार्थ्यांस तो प्रिय झाला.

कॉलेजमधील विद्यार्थ्यांत त्याचेसंबंधानें नेहमीं संवाद चालत. एकदां हिल नांवाचा एक विद्यार्थी आपल्या मित्रास ह्मणाला 'तो हिरामच्या शाळेंतून आलेला विद्यार्थी मोठा वक्तशीर काम करणारा दिसतो. त्याला चुकणें कसें तें माहीत नाहीं व इतके दिवसांत प्रश्न त्याचेवरून पलीकडे गेलेला आपण तर पाहिला नाहीं. असा मुलगा आजपर्यंत आपण पाहिला नव्हता.'

'याचें कारण तो सर्व विषयांत पारंगत आहे हें होय.' असें तो दुसरा

विद्यार्थी ह्मणाला ' त्यानें एकदां मला कॉलेजांत येण्याची आपण कशी तयारी केली तें सांगितलें. त्यावरून तो जबर स्वावलंबी मुलगा दिसतो. अमुक एक गोष्ट त्यानें हातीं घेतली ह्मणजे तिची पूर्ण माहिती झाल्याविना तिचा तो कधींच पिच्छा सोडीत नाहीं; व त्याचें त्याला फळ मिळतें. आपल्या कॉलेजांतील एका मुलाचेंही त्याचें इतकें वाचन नसेल व त्यांत विशेष हें कीं, जें कांहीं त्यानें वाचलें आहे तें त्यास अगदीं मुखोद्गत आहे.'

' हें तुझें बोलणें शाळेंतील सभेंत जेव्हां वादविवाद चालतो, तेव्हां अगदीं पटतें. वादविवादांत त्यावर कडी करणारा येथें तर मला दिसत नाहीं. '

' अरे, तो उपजतवक्ता आहे. शाळेंतील पाठ ह्मणणें व संभाषण करणें हीं दोन्हीं त्यास सारखीं आहेत. '

' आपल्या मागून दोन वर्षांनीं जरी तो कॉलेजमध्यें आला आहे तरी, तो वर्गांत पहिला नंबर खास मारणार. '

' एकंदर सर्व चिन्हांवरून तसें दिसतें खरें. '

याप्रमाणें मुलामुलांत अनेकवार संवाद होत. जेम्सविषयीं एकंदर विद्यार्थ्यांची जी कल्पना होती ती कांहीं चुकीची नव्हती. त्याचेबद्दल त्याच्या सहाध्यायी गृहस्थानें कॉलेजांतून गेल्यावर पंचवीस वर्षांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून ही गोष्ट खरी ठरते.

' सुमार चाळीस पंचेचाळीस मुलांचे वर्गांत त्यानें लवकरच प्रत्येक विषयांत पहिला नंबर मारला. मुख्यत्वेंकरून लेखक, वादविवाद करणारा व तत्त्वज्ञ ह्मणून त्याची ख्याती असे. जो जो विषय त्याचेपुढें येई त्याचे मुळाशीं जाऊन, तो नवीन तऱ्हेनें लोकांपुढें मांडण्यांत त्याचा मोठा लौकिक असे. त्यावेळचे त्याचे लेख साधारण नसून हल्लींही ते विचार करण्यालायक आहेत. तो जबर मेहनती असून, काम करण्याचा त्यास मुळींच कंटाळा नसे. रिकामें बसणें त्यास जरी आवडत नसे तरी तो एकलकोंड्या नव्हता. संगत करण्यास त्यासारखा मनुष्य मिळणें दुर्मीळ. तो गुणी असून त्याची भाषणशैली मनोरंजक, विनोदी व विचारपरिप्लुत

असे. ज्या मंडळीशीं त्याचा सहवास घडे त्या मंडळीमधील गुण व ज्ञान उचलून घेण्याची त्याच्यांत असाधारण शक्ति असल्यामुळें, त्याचा ज्यांच्या ज्यांच्याशीं संबंध घडे त्यांपासून तो आपला कांहीं तरी फायदाच करून घेई. आपणाभोंवतीं नानाप्रकारचीं माणसें जमवून, त्यांचे योग्यतेनुरूप त्यांस कामें लावून द्यावयाचीं हा जो गुण पुढें त्याच्या सार्वजनिक आयुष्यांत मुख्यत्वें नजरेस आला, तो यावेळींही त्याचे ठायीं दिसत होता.'

कॉलेजमध्यें आल्यावर जेम्सनें सडकून अभ्यास केला, परंतु तो हिराम येथें केलेल्या अभ्यासापुढें कांहींच नव्हे. हल्लीं त्यास अभ्यासाशिवाय कामच नव्हतें. येथें त्यानें जर्मन शिकण्यास सुरवात केली व त्या भाषेंत थोड्याच काळांत त्यानें प्रावीण्य संपादिलें. अभ्यासाशिवाय नानाप्रकारचे खेळ खेळण्यासही त्यास आतां वेळ मिळे व आंगमेहनत कांहीं नसल्यामुळें शरीरप्रकृति उत्तम राहण्यास खेळ खेळणें आतां त्यास अगदीं अवश्य होतें.

कॉलेजमध्यें एक त्रैमासिक निघे व त्यांत जेम्स वारंवार लिही. हिंवाळ्याचे सुट्टींत तो अक्षर शिकविण्याचे वर्ग शेजारच्या गांवीं काढी. यामुळें, त्यास पैसा मिळून आजूबाजूच्या प्रदेशांत त्याचें बरेंच वळण पडलें व त्यास बरेच सन्मित्र पैदा झाले. एका हिंवाळ्यांत न्यूयॉर्क संस्थानांत ट्राय या शहराजवळील एका खेड्यांत त्यानें वर्ग काढला होता. आसपासच्या खेड्यांतून व शहरांतून फावल्या वेळीं तो उपदेश करण्यास जाई व त्यामुळें त्याचा बराच लौकिक झाला.

ट्राय येथील बरेच शिक्षक मंडळींची व त्याची ओळख झाली. त्याठिकाणीं शाळा होती. तिच्या व्यावस्थाक मंडळींचा व त्याचा बराच परिचय होऊन, त्यांपैकीं ब्रूक्स् नांवाच्या इसमानें त्याजवळ खालील गोष्ट काढली.

'आमच्या शाळेंत हेडमास्तरची जागा रिकामी झाली आहे व ती तुह्मीं पतकरावी अशी आमची फार इच्छा आहे. ही जागा विशेष त्रासाची नसून, पगार १२०० डॉलर आहे.'

'आतांच्या आतांच या जागीं मी रुजू झालें पाहिजे तर ?'

'हो, एक आठवड्यानें शाळा उघडली कीं.'

'तर कॉलेजांतील पदवी मिळविण्याचा हेतु मला सोडला पाहिजे.'

'हो. तें तर खरें, पण तसें तुह्मी करणें मला बरें दिसतें.'

'नाहीं. पदवी मिळविण्याचा आज माझा किती तरी दिवसांचा हेतु आहे व अगदीं हातातोंडाशीं आल्यावर तो मार्ग सोडणें ह्मणजे मूर्खपणाच.'

'तुमचें बरेंवाईट तुह्मांस कळतच आहे. परंतु तुह्मीं ही जागा पतकरावी अशी आमची फार इच्छा आहे व यांत कांहीं तुमचा तोटा नाहीं.'

'तसें करण्यास आणखी दुसरी एक अडचण आहे. कॉलेजमध्यें येण्याची तयारी मीं हिरामचे शाळेंत केली व त्या संस्थेचा मी थोडेसा ऋणी आहें. त्यांचा माझा ह्मणजे ठराव झाला आहे असें नाहीं, परंतु त्या शाळेचे व्यवस्थापक मंडळीस, कॉलेजमधील शिक्षण संपल्यावर मी त्या शाळेंत शिक्षकाची जागा पतकरीन, अशी आशा आहे. ती शाळा नवीनच असून, स्थायिक होण्याच्या झटापटींत आहे. तेव्हां माझ्या थोड्या बहुत गुणांचा तिला लाभ व्हावा अशी माझी फार इच्छा आहे.'

'तुह्मी आतांच निकालीचाच जबाब द्या, असें मी ह्मणत नाहीं. विचार करा व विचाराअंतीं आपलें मत बदलेल.'

'नको. मी आतांच जबाब देतों. तुह्मीं पुढें केलेली जागा मोह पाडणारी आहे. ती पतकरल्यास मला माझें कर्ज लवकर फेडतां येईल. शिवाय हिरामचे शाळेंत मला इतका पगार मिळेल असें नाहीं. परंतु पदवी संपादन करण्याची माझी फार इच्छा आहे; व ज्या संस्थेचे मजवर इतके उपकार झाले आहेत, तिच्याकरितां माझें आयुष्य खर्चीं घालण्याचा माझा कृतनिश्चय झाला आहे. तेव्हां तुह्मीं पुढें केलेली जागा मला पतकरितां येत नाहीं.'

याप्रमाणें त्यानें त्या गोष्टीचा निकाल लावला. कॉलेजमधील शिक्षणाचे आड कोणतीही गोष्ट येऊं देणें त्यास इष्ट नव्हतें व तशी एखादी गोष्ट येऊं लागल्यास तो तिचा तावडतोब त्याग करी. याशिवाय इतक्या मोठ्या पगाराची जागा यावेळीं त्यानें नाकारली हें त्यानें फार मोठ्या धैर्याचें काम

केलें ह्मणावयाचें. तो हल्लीं फार अडचणींत होता. त्याचा भाऊ कांहीं संकटांत पडल्यामुळें, त्याकडून पैसे येणें बंद झालें होतें. त्याच्या अंगांतील कपडे फाटले होते, पण ते नवे करण्यासही त्याजवळ दिडक्या नव्हत्या. अशाप्रकारें तो मोठ्या गर्गशांत होता.

कॉलेज उघडल्यावर तो कॉलेजमध्यें आला व त्याच्या ओळखीचा एक रॉबिसन नांवाचा डॉक्टर होता, त्यास त्यानें आपली हकीकत कळवून, त्याजपासून त्यानें कर्जाऊ पैसे आणले. कॉलेजमध्यें असतांही सुट्टीचे दिवसांत तो आपल्या आईस भेटून येई व त्यावेळीं आपला मुलगा हुशार झालेला पाहून तीस जो आनंद व अभिमान वाटे त्याचें कोण वर्णन करूं शकेल?

जेम्स हा कादंबऱ्या मुळींच वाचीत नसे असें पूर्वीं सांगितलें आहेच. परंतु अतिगहन विषयांचा अभ्यास करून, आपल्या मानसिक शक्तीस अजीर्ण झालें आहे असें त्यास वाटूं लागलें. त्याची स्मरणशक्ति कमी कमी होऊं लागली, तेव्हां कादंबऱ्या वाचण्याची त्यास कोणीं शिफारस केली, 'गोड पक्वान्नें ग्रहण करितांना रुचि कायम राहण्यास व वीट न यावा ह्मणून चटण्या व भाजीपाला सेवन करणें अवश्य आहे, तसें गहन विषयांचा अभ्यास करीत असतां मनाची तरतरी कायम राखण्यास कादंबऱ्याचें वाचन अत्यावश्यक आहे.' हा उपदेश जेम्सला पटून, त्यानें नामांकित कादंबरीकारांचे ग्रंथ वाचले व त्या योगानें त्याचा इष्ट हेतु साध्य झाला. त्याची स्मरणशक्ति पुन्हां पूर्ववत् चालूं लागली. हिरामशाळेपासून त्याची जी ग्रंथवाचनाची पद्धत होती तीच अखेरपर्यंत होती.

सन १८५६ मध्यें कॉलेजमधील सर्वांत मोठी परीक्षा उतरून त्यास पदवी मिळाली इतकेंच नव्हे तर पहिले नंबरचीं सर्व बक्षिसें त्यानें मिळविलीं.

जेम्स कॉलेजमधून गेल्यावर आठ वर्षांनीं डॉक्टर हॉफकिन्स साहेबांनीं त्याविषयीं जे उद्गार काढले आहेत ते विचार करण्यासारखे आहेत 'सेनापति गार्फील्ड याचा आयुष्यक्रम मनन करून देशांतील तरुण होतकरू मंडळीनें त्यापासून फार बोध घेण्यासारखा आहे. लष्करी व मुलकी कामांत इतका जलद

वर चढलेला मनुष्य या देशांत सांपडणें कठीण. त्यानें सर्व विद्या स्वावलंबनानें संपादन केली व ती संपादन करण्याकरितां कराव्या लागणाऱ्या श्रमांचा त्यास जो आनंद वाटे तो शिक्षण ह्मणजे नित्य परिपाठ ह्मणून समजणाऱ्यांस स्वप्नांतही कळणें नाहीं. तो धार्मिक, सरळ, सभ्य व मनमिळाऊ असा होता; व आयुष्याची इतिकर्तव्यता त्यानें उत्तमप्रकारें बजावली. तेव्हां असे पुरुष देशांत निपजतील तितके थोडेच.'

याप्रमाणें जेम्स आपल्या वयाचे पंचविसावे वर्षी उत्तम विद्वान्, प्रसिद्ध वक्ता व खरा धर्माभिमानी ह्मणून प्रसिद्धीस आला. मनांत धारलेला उद्देश सिद्धीस नेऊन, त्यानें आपल्या आईस सुख दिलें व हें करण्यास त्यास सुमार ४५० डॉलर कर्ज झालें. तें पुढें त्यानें लवकरच फेडलें.

---

## भाग ९ वा.

### हिराम शाळेचा अध्यक्ष.

सन १८५६ मध्यें कॉलेजमधील पदवी प्राप्त झाल्याबरोबर जेम्स हा परत हिराम शाळेंत आला. खलाशीपणाचा धंदा सोडून विद्यार्जनाकडे वळल्यास आज काय तीं नऊ वर्षे झालीं होतीं. परंतु तितक्या अवकाशांत काय फरक झाला पहा! जेम्सच्या आयुष्यांतील हीं नऊ वर्षे ह्मणजे परिश्रम, झटापटी व जय वगैरे अनेक अमानुष प्रसंगांनीं भरलेलीं आहेत व त्यांचें येथपर्यंत बरेंच वर्णन आह्मीं केलें आहे. कॉलेजमधील शिक्षण पुरें झाल्यावर जेम्स हा परत शाळेंत आलेला पाहून, शाळेचे व्यवस्थापक मंडळीस फार आनंद झाला व त्यास त्यांनीं प्राचीन भाषा व वाङ्मय यांचा अध्यापक नेमिलें. त्यानें ती जागा पतकरल्यावर एकदां तो आपल्या स्नेह्याला ह्मणाला 'ईश्वरकृपेनें माझ्या मनांतील कॉलेजमधील पदवी मिळविण्याचा माझा हेतु पूर्ण झाला आहे व यापुढें मी आपलें सर्व सामर्थ्य या शाळेंत खर्च करणार.'

धर्मोपदेश करण्याचें काम जेम्स यास जरी मनापासून आवडे तरी, त्या धंद्यांत कायमप्रमाणें आयुष्य घालविण्याचा त्याचा संकल्प नव्हता व सार्वजनिक व राजकारणी भानगडींत पडणें त्यास मुळींच आवडत नव्हतें. हिराम शाळेंत शिक्षकाचें काम करून, साधल्यास ती शाळा चांगली ऊर्जित दशेस आणावी हा त्याचा मुख्य हेतु होता व यांत त्यास समाधान होतें. दुसऱ्या कोठें जर त्यानें नोकरी पतकरली असती तर, हिराम येथें मिळत असलेल्या पगाराच्या दुप्पटही पगार त्यास मिळाला असता; परंतु त्याचें सर्व लक्ष्य हिरामच्या शाळेकडे होतें व तीपुढें त्यास स्वार्थ वगैरे कांहीं दिसत नव्हतें हें मागील एका प्रसंगावरून स्पष्ट होत आहे.

तो ज्या कॉलेजमध्यें शिकला होता तेथील प्रिन्सिपाल डॉक्टर हॉफकिन्स ह्याबद्दल त्याचे मनांत विलक्षण प्रेम व आदर असे व एकंदर बाबतींत शक्य तितकें त्यांचें अनुकरण करावयाचें असा त्याचा संकल्प होऊन, त्या कामीं तो फार प्रयत्न करी. जेम्स हा कॉलेजमध्यें जाण्यापूर्वींच तो उत्तम शिक्षक आहे अशी शाळेचे व्यवस्थापक मंडळीची खात्री झालेली होती व त्या कामांत त्यानें विशेष प्रावीण्य संपादिलें आहे असें त्यांच्या आढळण्यांत येऊन, दोन वर्षांतच बढती होत होत तो शाळेचा अध्यक्ष झाला.

गार्फील्ड हा उत्तम प्रतीचा शिक्षक होता. वर्गांतील मुलांत हुशार असलेलीं मुलें हुडकून काढून, विद्येकडे त्यांचें मन वळविण्याच्या कामांत त्याचा हातखंडा असे. कधीं कधीं या कामांत मुलांचीं वडील माणसें आडवीं येत, परंतु युक्तिप्रयुक्तीनें तो त्यांचें मन वळवी. हीं मुलें हुडकून काढण्याची व त्यांचे वडील मंडळीपासून पटकावण्याची त्याची तऱ्हा कशी असे याची कल्पना व्हावी ह्मणून त्याचेच तोंडची एक गोष्ट देतों.

" शिक्षणाचे कामीं होतकरू तरुण मंडळीच्या मनाचा ओघ वळवणें या कामीं मला मोठी हौस वाटे. मी आपल्या पूर्वींच्या आयुष्याचें अवलोकन केलें ह्मणजे ह्या प्रसंगांचें मला स्मरण होऊन, फार धन्यता वाटते. मुलास शिक्षणाकडे वळविण्यास व उच्च प्रतीचें शिक्षण त्यांनीं संपादन करावें ह्मणून त्यांस तयार करण्याच्या कामीं मुख्य अडथळे ह्मणजे मुलांची वडील

ग्रा. न. ६८



मंडळी होय. मुलांच्या वडील मंडळीपासून मुलें उदार शिक्षणासाठीं मिळवणें बरेंच कठीण असतें. त्यांतील कांहीं प्रसंग मला अद्याप आठवत आहेत. त्यांपैकीं बरेच मुलगे मोठमोठ्या थोर हुद्यांवर आहेत. मोठ्या मिनतवारीनें शिक्षणाकडे प्रवृत्त केलेला एक मुलगा आज एका कॉलेजचा अध्यक्ष आहे. माझ्या मतें मीं अगर दुसऱ्या कोणीं उदार व उच्च प्रतीच्या शिक्षणाकरितां हा मुलगा त्याचे आईबापांचे हातून सोडविला नसता तर, तो तसाच कुचंबत पडता व देशाचें मोठें नुकसान झालें असतें. मुलांच्या आयुष्यांत असा एक काळ येत असतो कीं, त्यावेळीं यत्किंचित् गोष्टीनें तो वर चढतो अगर खालीं पडतो. त्यावेळीं त्याला स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल खात्री नसते व काय करावें या बाबतींत त्याचें ठाम मत झालेलें नसतें. त्याचीं आईबापें साधारणतः गरीब असतात व तशीं तीं नसल्यास, तीं असें ह्मणत असतात कीं, ' झालें तितकें शिक्षण पुरे. जास्त शिकून काय करावयाचें आहे ? ' उच्च प्रतीचें शिक्षण मिळवून आपला मुलगा काय करणार याची त्यांस मुळींच कल्पना नसते. मला माझ्या आयुष्यांतील या काळाची पूर्ण आठवण आहे. तेव्हां अशा आणीबाणीच्या प्रसंगांत असलेल्या तरुण मंडळीची मला मोठी कींव येते. मीं वर सांगितल्यापैकीं एक मुलगा मे महिन्याची सुट्टी व्हावयाची त्या दिवशीं मजकडे आला व त्यानें मला सलाम केला. त्याचा सलाम घेऊन, तो आतां जाईल असें वाटून मी पुन्हां लिहिण्यास सुरवात केली. परंतु, तो मुलगा न जातां तेथेंच गुटमळतांना मी त्यास सहज ह्मणालों 'हेनरी, पुन्हां शाळा उघडल्यावर तूं येशीलच.' त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तेव्हां मीं त्याजकडे पाहिलें तों त्याचे डोळे पाण्यानें भरून आले आहेत व तोंड अगदीं गोरेमोरें झालें आहे, असें माझ्या नजरेस पडलें. सरते शेवटीं तो मुलगा ह्मणाला ' नाहीं. मी आतां परत हिरामला येणार नाहीं. बाबा ह्मणतात कीं—झालें तेवढें शिकणें पुरे. मी आतां शेतवाडी पाहण्यास लागावें असें त्यांचें मत आहे. ते ह्मणतात ' शेतकऱ्याला फारसें शिक्षण कशाला पाहिजे ? त्याचा त्याला कांहीं मोठासा उपयोग नसतो. '

' तुझा बाप येथें आला आहे का ? ' असा मीं त्यास प्रश्न केला. त्याला जसें

वाईट वाटत होतें तसेंच किंवा किंबहुना त्यापेक्षां अधिक मला वाटत होतें. हा मुलगा मोठा सशक्त, अलौकिक बुद्धिमान् व कांहींसा लाजाळू होता व पुढें संधि मिळाल्यास चांगलें नांव काढील अशी माझी खात्री होती. तो ह्मणजे सर्वगुणसंपन्न होता असें नव्हे, परंतु श्रमांची किंमत त्यास पूर्णपणें कळत होती.

' माझा वरील प्रश्न ऐकून तो ह्मणाला ' हो, बाबा येथें आले आहेत व माझें सर्व सामान अखेरचें घरीं नेण्याचा त्यांचा विचार आहे. '

' बरें तर, वाईट वाटूं देऊं नको. त्यांना घरीं जाण्यापूर्वी भेटून जाण्यास मीं सांगितलें आहे ह्मणून सांग, ह्मणजे झालें. तुजसंबंधी कांहीं बोलावयाचें आहे वगैरे कांहीं सांगूं नको. फक्त मीं बोलावलें आहे इतकेंच सांग. '

सुमार अर्ध्या तासानें एक खेडवळ मनुष्य माझे खोलींत आला व बसला. मीं त्याचेकडे निरखून पाहिलें व कशी सुरवात करावी हें ठरवून, मीं त्यास एकदम विचारिलें ' तर मग तुह्मी हेनरीला नेण्याकरितां आलां आहां एकूण. '

' हो ' असें त्या वृद्ध गृहस्थानें उत्तर दिलें.

' हेनरीच्या पुढील आयुष्याबद्दल दोन शब्द बोलावे ह्मणून मीं तुह्मांस बोलावलें होतें. रजा सरल्यावर तो परत येणार असेलच. '

' अ हं: तो पुन्हां येईल असें नाहीं. मला त्याला पुढें शिकविण्याची ऐपत नाहीं. शेतकऱ्यास पुरेसें शिक्षण आतां त्याचें झालें आहे व फार शिकणें झालें कीं मुलें आळशीं होत असतात. शिकलेले शेतकरी ह्मणजे आळशी. त्यांना आंग मोडून काम करायाला नको. हेनरींचीच गोष्ट घ्याना, त्याला इतकें शिक्षण मिळालें आहे तोंच त्याचें कामापेक्षां पुस्तकांत लक्ष्य फार. सुट्टींत घरीं आला तर कांहीं गुरांकडे पाहील, का कांहीं काम करील तर कांहीं नाहीं. एकसारखा पुस्तकांत. जगांत सर्व प्राणी शेतकऱ्यांवर अवलंबून आहेत व माझ्या मतें शिकलेले लोक आतां इतके झाले आहेत कीं, तितकेच पोसणें शेतकऱ्यांस जड जाणार आहे. '

' तुमचें हें बोलणें ऐकून मला फार वाईट वाटतें. हेनरी हा एक हुशार मुलांपैकीं मुलगा आहे आणि त्याबद्दल मला मोठा अभिमान आहे. त्याला

आजपर्यंत शिकविण्याचा जसा तुह्मीं खर्च केला आहे तसा आणखीं एक चार सहा महिने केल्यास, तो शाळा शिकवूं लागेल. बरें, हिंवाळ्यांत शेतांत खपून जो पैसा मिळवणार त्यापेक्षां शाळा शिकवून जास्त पैसा कमावील. मग कसें काय तुमचें मत आहे ? '

माझ्या बोलण्याचा इष्ट तोच परिणाम झाला. वरील विचार त्याचे डोक्यांत आलाच नव्हता. तो ऐकून तो ह्मणाला ' तर येत्या हिंवाळ्यांत शाळा शिकविण्याची कुवत त्याच्यांत येईल असें तुह्मांस वाटतें ? '

' हो, माझी खात्री आहे येईल अशी आणि पुढल्याच हिंवाळ्यांत न आली तरी लवकरच येईल. '

' बरें मी विचार करीन. त्यालाही शाळेंत यावें असें फार वाटत आहे व त्याला पाठवावें असें मलाही आतां वाटूं लागलें आहे. ही कल्पना पूर्वी माझ्या डोक्यांत आली नव्हती. '

झालें, माझें कार्य झालें. हेनरी शिकवूं लागल्यावर पैसा मिळवून आपला रस्ता काढील अशी पूर्ण खात्री होती. तो पुढें शाळेंत आला व माझ्या कल्पनेप्रमाणें पदवीही त्यानें मिळविली. "

याप्रमाणें विद्येच्या मार्गाकडे मुलें वळवून आणण्याची त्याची पद्धत असे. त्याची शिकविण्याची पद्धतही फार चांगली असे. तो शिकवीत असला ह्मणजे सर्व विद्यार्थ्यांचें लक्ष्य त्याकडे वेधलेलें असे. तो फार नियमित वेळीं व शिस्तीनें काम करणारा होता व तसें सर्व विद्यार्थ्यांनीं वागावें ह्मणून त्याचे सतत प्रयत्न असत. शाळेंत येण्यास त्यास कधीं उशीर झाला आहे असें घडलेंच नाहीं. घांटेचा शेवटचा टोला पडतांच वर्गांत याचें पाऊल पडलें नाहीं असें कधींही घडलें नाहीं. कोणत्याही गोष्टींत दिरंगाई ही त्यास कधींही खपली नाहीं. त्याच्या एकंदर शिक्षणाचा मुलांच्या मनावर जो उत्तम ठसा उमटे त्यांतील मूळ बीज हें होतें कीं, तो जसें मुलांस वागावयास सांगे तसा स्वतः वागत असे. जी गोष्ट तो करीत नसे किंवा त्यानें केली नसेल, ती तो मुलांस कधींही करावयास सांगत नसे. प्रत्येक बाबतींत तो आपल्या मुलांस नुसता उपदेश करून राहत नसे तर, स्वतः उदाहरण घालून देई व तसें त्यांस वागण्यास सांगे.

तो आपल्या शिष्यांस नानाप्रकारचे विषय घेऊन वारंवार उपदेश करी. मनुष्याचे स्थितींत यत्किंचित् गोष्टीनें कसा बदल होतो, हें त्यांस अनेक दाखले देऊन समजावून सांगे व अशा रीतीनें यत्किंचित् गोष्टींत सुद्धां दुर्लक्ष्य करणें चांगलें नव्हे हें त्यांच्या मनांत भरवी. तो शाळेचा अध्यक्ष असतां अनेक विषयांवर वारंवार व्याख्यानें देई व असें करून शाळेंतील एकंदर विद्यार्थ्यांचीं मनें सन्मार्गाकडे व विद्येकडे वळवी.

गरीब विद्यार्थ्यांचा तर तो वालीच होता. तो त्यांस आपणांस आपला मार्ग कसा काढतां येईल व तो काढतांना वाटेंत अडचणी आल्यास न डगमगतां इष्ट कार्यावर नजर देऊन कसें वर्तन करावें वगैरे बाबतींत नेहमीं स्वानुभवावरून, अमोलिक बोध करीत असे व त्याच्या उत्तेजनानें व बोधानें कितीक कमाल स्थितींतील विद्यार्थी मोठ्या पदवीस चढले. गार्फील्ड याची भाषण करण्याची शैली, हावभाव, आवाज व विषयप्रतिपादनाची हतोटी अशी कांहीं असे कीं, श्रोत्यांच्या मनावर उपदेशाचा ठसा ताबडतोब उठत असे.

हिरामचे शाळेंतील जागा पतकरल्यावर पहिल्यानें तो कर्जमुक्त झाला. नंतर त्यानें पूर्वी ठरल्याप्रमाणें लुक्रेशियाशीं विवाह केला व हा संबंध त्यास फार सुखकर झाला. लुक्रेशियाची शरीरकाठी सदृढ असून, ती फार उंचही नव्हती व फार ठेंगणीही नव्हती. तिची अंगकांति सतेज असून, ती नेहमीं आनंदी असे. ती मोठी विद्वान् होती तरी, तिचे ठायीं गर्वाचें वारें देखील नव्हतें. ती साध्वी, सद्गुणी व पतिव्रता होती. नवऱ्यापलीकडे सगळ्या जगांत तिला दुसरें दैवत नव्हतें व त्यास जेणेंकरून सुख व समाधान होईल तें करण्यास ती सदा तत्पर असे. घरांतील कामधंदा संभाळून गार्फील्ड यास व्याख्यानें वगैरे तयार करण्याचे कामीं वेळोवेळीं ती मदत करी. याप्रमाणें अनुरूप स्त्री प्राप्त झाल्यामुळें, त्यांच्या संसारसुखास दुसरा जोडा नव्हता. असा योग घडून येणें ह्मणजे पूर्वपुण्याईच होय.

गार्फील्ड यांच्या वर्गांतच असलेल्या एका विद्यार्थ्याचे, जो पुढें मोठा नामांकित पुरुष झाला, त्यांविषयींचे उद्गार सांगून, हा भाग पुरा करूं.

' वर्गांत मुलें कितीही मोठालीं असोत, ते आह्मांस आमच्या लहान-

पणच्या-नांवानें हांक मारीत, नेहमीं आमच्याबरोबर फिरायला येत व आमच्या खेळांतही मिळत. वर्गांतून बाहेर पडलें कीं, मास्तर व मुलें हें नातें बाजूस राही व एखाद्या सौंगड्याप्रमाणें ते आमच्याशीं वागत. तरी त्यांची शिस्त मोठी कडक. वर्गांत टारगटपणा कधींही नजरेस येत नसे. बरें, इतकें असून, ते आमच्याशीं कधींही कठोरपणानें वागत नसत. एखाद्या मुलाची त्यांस कानउघाडणी करणें असल्यास, ते त्यास जवळ बोलावीत व त्याच्या खांद्यावर हात टाकून, हळूं हळूं व गोड गोड शब्दांनीं त्यास ते वाटेवर आणीत. वर्गांत जर एखादा गरीब मुलगा असला तर घटका घटका त्याच्याशीं बोलत बसत, कधीं कधीं कांहीं गोष्टींत त्याचें मत घेत व असें करून, त्यास आपण ह्मणजे यत्किंचित् असें कधीं देखील वाटूं देत नसत. मी जेव्हां झाडण्याचें व घांट वाजविण्याचें काम करीत असे, तेव्हां वर्गांत जातांना कोणत्याना कोणत्या तरी बाबतींत कितीदां तरी त्यांनीं माझें मत घेतलेलें मला आठवत आहे. आतां त्यावेळीं मी जें मत देई ते कितपत किंमतवान् होतें हें मला पूर्ण कळतच आहे. परंतु तसें करण्यांत त्यांचा इतकाच हेतु असे कीं, माझेविषयीं मला योग्य अभिमान असावा व मीं गरीब ह्मणून इतरांकडे पाहून निराश व खट्टू न होतां उत्साहानें प्रयत्न करावा.'

"मीं एकदां त्यांस अमुक एक विषय शिकण्याचा उत्तम मार्ग कोणचा ह्मणून विचारिलें, त्याचें जें त्यांनीं मला उत्तर दिलें तें मला अद्याप आठवत आहे. ते ह्मणाले—जो विषय शिकावयाचा असेल त्या विषयासंबंधी जितकीं पुस्तकें वाचण्यास सांपडतील तितकीं वाच, ह्मणजे तुला त्याचें पूर्ण ज्ञान होईल व तुझा हेतु पूर्णपणें सिद्धीस जाईल. मी याच रीतीनें अभ्यास करितों. आमची अवलोकनशक्ति वाढावी, यत्किंचित् गोष्टींकडेही आह्मीं दुर्लक्ष्य करूं नये ह्मणून, वारंवार 'शाळेला दरवाजे किती आहेत? जिन्याच्या पायऱ्या किती? अमक्या खोलीचा रंग कोणता आहे?' असे दिसण्यांत क्षुल्लक पण सांगण्यास कठीण असे प्रश्न ते विचारीत असत. त्यांची अवलोकनशक्ति मोठी सूक्ष्म असे. वर्गांतील मुलांच्या कपड्यांचीं बटणें देखील

त्यांस माहीत असत. तेव्हां अशा नजरेला चुकवून कोण जाणार ?-सारांश, असा शिक्षक मिळणें ह्मणजे मोठें दैवच ह्मणावयाचें ! ”

हिरामचे शाळेंत शिक्षकाचें काम करीत असतां गार्फील्डनें कायद्याचा अभ्यास केला व त्यास लवकरच वकिलीची सनद मिळाली. त्यानें कायद्याचा अभ्यास वकील होण्याच्या उद्देशानें केला नव्हता; तर तो करण्याचा त्याचा उद्देश त्याचें ज्ञान असावें एवढाच होता. त्याला शिकविण्याचा धंदाच फार प्रिय होता. परंतु अनेक कारणांमुळें सार्वजनिक व राजकीय बाबतींत त्यांस पडावें लागलें. त्याचें पुढील भागांत थोडक्यांत दिग्दर्शन करूं.

# भाग १० वा.

## प्रेसिडेंट गार्फील्ड.

येथवर वर्णन केलेली चरित्रनायकाची हकीगत, ज्या उद्देशानें हें चरित्र लिहिण्यास घेतलें आहे तो पूर्णपणें साध्य करून देण्यास, पुरे आहे. परंतु, चरित्रनायकाचा पुढील आयुष्यक्रम वाचकांस कळावा व त्याचे व त्याच्या आईचे स्वप्नींही नसलेली सार्वजनिक लोकप्रियता व मानमान्यता त्यानें कशी मिळविली अगर ईशकृपेनें त्यास कशी प्राप्त झाली, ही माहिती त्यांस समजावी ह्मणून ती या भागांत थोडक्यांत देण्याचा आमचा मानस आहे.

मागें सांगितलेला गुलामगिरीसंबंधानें अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांत पडलेला लढा यावेळीं अगदीं हातघाईवर आला होता. या प्रसंगीं शाळेचें काम संभाळून गार्फील्ड हा गुलामांच्या प्रकरणासंबंधानें जाहीर व्याख्यानें देई. त्यानें या विषयाचा पूर्णपणें अभ्यास केला होता व या प्रकरणासंबंधी वादविवादांत प्रतिपक्षास तो अगदीं चीत करी व श्रोत्यांस आपल्या अलौकिक ज्ञानानें व बुद्धिमत्तेनें थक्क करून सोडी. तो गुलाम बाळगण्याच्या पद्धतीचा अति तिटकारा करी. इतका बुद्धिमान्, असाधारण वक्ता व-

न्यायपक्षपाती मनुष्य अमेरिकेसारख्या लोकमतानें राज्यव्यवस्था चालणाऱ्या देशांत राजकारणांतून व लौकिक गोष्टींपासून अगदीं अलग राहणें शक्यच नव्हतें. शिवाय ज्या पक्षाचें मत गुलाम नसावे ह्मणून होतें त्या पक्षाचा तर त्यावर विशेष डोळा होता व त्यानें आपणास येऊन मिळावें ह्मणून त्या पक्षाचे हरप्रयत्न चालले होते. तेव्हां मनांत नसतां मित्रमंडळीच्या भिडेनें. व देशकार्य ह्मणून त्यास राजकारणी बाबींत पडावें लागलें. हिराम शाळेच्या व्यवस्थापक मंडळीनेंही मोठ्या खुषीनें देशकाजीं व सत्याप्रीत्यर्थ आपलें तनमनधन खर्च करण्यास जेम्स यास अनुमोदन दिलें व अशा रीतीनें गार्फील्ड हा आपल्या जन्मभूमीच्या ह्मणजे ओहिओ संस्थानांतील लोकांच्या वतीनें राज्यकर्त्या प्रांतिक सभेचा सभासद ह्मणून बहुमतानें सन १८६० च्या जानेवारी महिन्यांत निवडून आला.

गार्फील्ड यानें, गुलामप्रकरणासंबंधी उत्तरवाले व दक्षिणवाले यांत जो लढा पडला होता तो मिटविण्याकरितां, बराच प्रयत्न केला. परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. त्याच संधींत संस्थानांच्या प्रेसिडेंटची जागा रिकामी झाली व ती जर गुलाम नसावे या मताचे पक्षांतील गृहस्थास मिळाली तर आह्मी लढाई करूं अशी प्रतिपक्षी जे दक्षिणवाले त्यांनीं धमकी घातली होती. तरी सन १८६० च्या नवेंबर महिन्यांत एब्राम लिंकन हा गुलामगिरीचा फार तिटकारा करणारा गृहस्थ बहुमतानें अध्यक्ष निवडून आला तेव्हां उत्तरवाल्यांत व दक्षिणवाल्यांत आतां रण माजणार हें ठरल्याप्रमाणें झालें.

इसवी सन १८६१ च्या मार्च महिन्याचे चवथ्या तारखेस नवीन अध्यक्षांनीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं व त्याच दिवशीं दक्षिणवाल्यांनीं बंड उभारिलें. बंडवाल्यांचा पाडाव करण्याकरितां ७५ हजार सैन्य तयार झालें पाहिजे, ह्मणून निरनिराळ्या संस्थानांतून प्रेसिडेंटांचा जाहिरनामा फिरला. ओहिओ संस्थानांतून २० हजार लोक व ४५ लक्ष रुपये इतकें साह्य देण्याविषयीं गार्फील्डच्या खटपटीनें ठरलें. इतकें करूनही त्याची तृप्ति झाली नाहीं. त्याला स्वतःला लढाईचा जरी तिटकारा असे तरी देशकार्याकरितां ‘ इच्छा

असेल त्यानें सैन्यास मिळावें ' असा जेव्हां लिंकनचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला, तेव्हां गार्फील्ड हा सैन्यांतील शिपाई बनला. पुढें बंडवाल्यांची सरशी होऊं लागलेली पाहून, अनेक लोक सैन्यास मिळूं लागले. याच सुमारास गार्फील्ड यास लेफ्टन्ट केलें व लवकरच ओहिओ बेचाळीस इन्फंटरीचा तो मुख्य झाला. याच तुकडींत हिराम शाळेंतील कांहीं विद्यार्थी, शिक्षक, वकील व शेतकरी वगैरे अनेक धंद्यांतील लोक देशकार्यासाठीं तरवार घेऊन निघालेले होते. अशी ही तुकडी शिकवीत असतां गार्फील्डनें बरेंच लष्करी ज्ञान संपादलें व सुमार तीन महिन्यांत ती तुकडी तयार झाली.

लवकरच गार्फील्ड यास बंडवाल्यांविरुद्ध लढण्यास पाठविलें. तो आपले लोक घेऊन, केंटकीच्या पूर्व बाजूवर ५००० बंडवाल्यांनीं स्वारी केली होती त्यांचे पारिपत्यास, गेला. मुख्य तळावर गेल्यावर सर्व सैन्याच्या अधिपतीनें ' तुला जर केंटकीच्या पूर्व बाजूवर चालून आलेल्या बंडवाल्यांवर धाडलें तर तूं कशी स्वारी करणार ?' असा प्रश्न केला. त्याचा जबाब सर्व रात्रभर केंटकीचे नकाशे पाहून व दुसरी माहिती मिळवून त्यानें पहाटेच्या सुमारास दिला. त्याचे सर्व बेत वगैरे मुख्य सैन्याधिकाऱ्यानें नीट मनन करून, त्यास तिकडे जें सैन्य पाठवावयाचें होतें त्यावरील मुख्य नेमून, जेम्सच्या मर्जीनुरूप युक्ति योजून त्यानें बंडवाल्यांचा मोड करावा असा हुकूम दिला.

बरोबर २६०० लोक घेऊन त्यानें उजाडाला तें ठिकाण गांठलें. तावडतोब लढाईस सुरवात झाली. त्याच्या सैन्यास बरेच वेळां माघार घ्यावी लागली, तरी त्यानें धीर सोडला नाहीं. त्याचे बरेच लोक मेले व सारखें पांच तास लढावें लागल्यामुळें, सर्व लोक अगदीं दमून गेले. तरी वारंवार ते टेंकडीवर ज्या ठिकाणीं प्रतिपक्षी होते, तेथें हल्ला करीत व पुन्हां पुन्हां त्यांस माघार घ्यावी लागे. असा प्रसंग असतां गार्फील्डनें आपली टोपी काढली व देवाचा धांवा करून, त्याची त्यानें मदत मागितली; व नंतर उठून उत्तरेकडे पाहतो तों शेल्डन नांवाचा सरदार आपली तुकडी घेऊन तिकडेच येत असतांना त्यानें पाहिलें व आपल्या शिपायांस अखेरचा प्रयत्न करण्यास इशारत केली. त्यांनीं मोठ्या नेटानें पुन्हां एकवार टेंकडीवर हल्ला केला

व हां हां ह्मणतां ती सर केली. शत्रूच्या सैन्यास साह्य आलेलें पाहून, बंडवाल्यांस पळतांना भुई थोडी झाली. जेम्सला जयश्रीनें माळ घातली. लढाई सुरू झाल्यापासून बंडवाल्यांविरुद्ध उत्तरवाल्यांस मिळालेला हा पहिलाच जय होय.

ही जयाची बातमी प्रेसिडेंट लिंकन यांस कळतांच, त्यांस अत्यानंद झाला; कारण अद्यापपर्यंत यश न मिळाल्यामुळें ते अगदीं उदासीन झाले होते. परंतु या बातमीनें त्यांस फार धीर आला व त्यांच्या शेजारींच सैन्यांतील एक बडा कामगार उभा होता, त्यास ते ह्मणाले " कायहो, तुमच्यापैकीं सैन्यांत नोकरी करणाऱ्या कामगारांच्यानें जी गोष्ट आज २ महिने घडेना, ती गार्फील्ड यानें दोन आठवड्यांत कशी केली ? "

त्यावर तो अधिकारी ह्मणाला " तो लष्करी शाळेंत शिकलेला नाहीं. "

" तसें नव्हे. याचें कारण हें कीं, तो जेव्हां लहान होता तेव्हां त्याच्या उदरनिर्वाहाची तजवीज त्यास स्वतः पहावी लागे. "

जेम्स यानें यापुढें अनेक लढाया मारल्या. त्या सर्वांचें वर्णन करण्यास आह्मांस जागा नाहीं. परंतु एकामागून एक असे तो जय मिळवीत गेला व बंडवाल्यांचा पाडाव होत चालला. मिडल क्रीक, स्यांडी व्हाली वगैरे ठिकाणीं जे त्यानें जय मिळविले ते तर विलक्षण होत. बहुतेक सर्व लढायांत त्याच्या प्रतिपक्षाचें सैन्य त्याच्या दुपटीवर असे. या सर्व यशापेक्षां सन १८६३ च्या सप्टेंबर महिन्यांत त्यानें जें यश मिळविलें व जो अलौकिक पराक्रम केला तो सर्वांत मोठा व अवर्णनीय होय. हें तुंबळ युद्ध चिकामाग्वा येथें झालें.

ही त्याच्या जयाची वार्ता ऐकून, त्याच्या जन्मभूमींतील लोकांनीं त्यास वाशिंगटन येथील मुख्य राज्यकर्त्या सभेचा सभासद निवडिलें. लिंकन यासही असला असाधारण लष्करी माहितीचा मनुष्य आणीबाणीच्या प्रसंगीं सल्लामसलत देण्यास जवळ असावा असें वाटून, सैन्यांतील नोकरी सोडून सभेंत येण्याचा त्यास हुकूम झाला व अशा प्रकारें सैन्यांत दोन वर्षें व तीन महिने काम करून तो मुख्य राज्यकर्त्या सभेंत सभासद झाला.

याप्रमाणें लहानपणापासून कीर्तिमंदिराच्या पायऱ्या चढण्यास त्यानें जी सुरवात केली ती बहुतेक पुरी होण्याचा प्रसंग आला ह्मणावयाचा. आतां एकच पायरी त्याचेवर राहिली ह्मणावयाची. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांत प्राप्त होणाऱ्या पदव्यांतील एक शिवायकरून सर्व पदव्या त्यानें मिळविल्या. त्यावर पडलेलीं सर्व कामें यथासांग करून, तो आतां मुख्य राजकारणी सभेंत येऊन बसला. येथेंही त्यानें लवकरच अग्रपद मिळविलें. सर्व लोकहिताच्या कामांस त्याचा पूर्ण पाठिंबा असे.

त्याची राहणी फार साधी असे. राजकारणी सभा उघडी असे तेव्हां त्यास वाशिंगटन येथें रहावें लागे ह्मणून, त्यानें एक तेथें टुमदार घर घेतलें होतें. तो तेथें जेव्हां असे तेव्हां देशांतील नामांकित विद्वानांचा त्याचे घरीं बराच येवजाव असे. तो श्रीमंत नव्हता व त्या मंडळींत मिरवण्याची त्यास मुळींच हांव नसे. सभा बंद झाली कीं, त्यानें एक जवळच शेतवाडी खरेदी केली होती; तेथें जाऊन, तो आनंदानें आपल्या मुलामाणसांत राहून शेतवाडी करी.

गुलामांसंबंधानें झालेल्या लढाया हें एक स्वतंत्र संस्थानावर मोठें संकटच आलें होतें, परंतु तें थोडक्यांत जरी नाहीं तरी हळू हळू नाहींसें होत गेलें; तरी त्यानें प्रेसिडेंट लिंकनसारखा अलौकिक मनुष्य बळी घेतला. सन १८६५ च्या एप्रिल महिन्याच्या १४ वे तारखेस कोणी दुष्टानें प्रेसिडेंटांचा खून केला व ही ठिणगी पुनः पेट घेते कीं काय अशी पुष्कळांस धास्ती वाटत होती, परंतु ती गार्फील्डसारख्या धूर्त मुत्सद्यांच्या शहाणपणानें निभावली.

इ. स. १८६८ मध्यें गार्फील्ड यानें युरोपखंडास प्रवास केला. या प्रवासांत लंडन येथें त्यानें कांहीं दिवस वास केला व तेथील पाहण्यासारखीं ठिकाणें पाहिलीं. पार्लमेंटमधील भाषणें ऐकण्यास तो जाई. पुढें स्विट्झर्लंड, रोम वगैरे ठिकाणीं फिरून तो स्वदेशास परत आला.

या युरोपांतील प्रवासामुळें, त्याचे प्रकृतीस बराच आराम वाटला. तो परत स्वदेशीं आलेला पाहून, लोकांनीं त्यास पुन्हां निवडून दिलें. गार्फील्ड

यानें लोकांचा पुढारी या नात्यानें एकंदर वीस वर्षे राजकारणी सभेंत काम केलें. तितक्या अवधींत त्यानें इमानेंइतबारें लोकांची सेवा केली. असें जरी होतें तरी, लोकांस आवडते ह्मणून आपल्या सदसद्विवेकबुद्धीस न पटणारी व जी केल्यास आपल्या मनास निरंतर हुरहुर लागेल असें त्यास वाटे अशी कोणतीही गोष्ट तो कधीं करीत नसे. तो नेहमीं ह्मणे कीं, " अमुक एक पक्षाचा ह्मणून आपल्या स्वतःच्या विचारास झुगारून देण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. माझ्या विचाराशीं जर लोकांचे विचार पटतील तर, त्यांत मला समाधानच आहे. पक्षाभिमानास पेटून सत्य व माझी सदसद्विवेकबुद्धि यांच्या विरुद्ध मी कधींही जाणार नाहीं. असें जर नसेल तर, सभासद निवडून येण्यापेक्षां मी घरीं स्वतंत्र रहिवाशी ह्मणून राहण्यांतच मला फार आनंद आहे. "

असो. याप्रमाणें लोकाग्रणी ह्मणून तो काम करीत असतां इ. स. १८८० त अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानाचे अध्यक्षाची जागा रिकामी झाली. ती मिळविण्याची खटपट करण्यास गार्फील्ड यास त्याचे मित्रांनीं पुष्कळ सांगितलें; परंतु त्यांस तो ह्मणाला " माझ्या सर्व आयुष्यांत मीं एका जागेबद्दल प्रयत्न केला आहे. ती जागा ह्मणजे हिरामशाळेंतील घंटा वाजविण्याचें काम होय. आतां मी बिलकुल प्रयत्न करणार नाहीं. लोकांस मी पाहिजे असेन तर ते मला निवडून घेतील " असे उद्गार निघण्यास खरोखरच महात्मता लागते. ' येर गव्हारांचें हें काम नाहीं '.

असो. शेवटीं गार्फील्ड यास इ. स. १८८० च्या नवेंबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस बहुमतानें अध्यक्ष नेमिलें. त्यावेळीं सर्वत्रांस आनंद झाला.

प्रिय वाचकहो, येथपर्यंत झोंपडीपासून राजमंदिरापर्यंतचा जो चरित्रनायकाचा प्रवास वर्णिला तसा आश्चर्यजनक प्रवास कधीं आपणांस पहावयास सांपडेल काय ? गार्फील्डच्या मातेप्रमाणेंच ' ही सगळी देवाची करणी आहे !' इतकेंच आपण ह्मणणार, दुसरें काय ?

# भाग ११ वा.

## प्रयाण व उपसंहार.

लोकांनीं आपणास स्वतंत्र संस्थानांचा प्रेसिडेंट निवडून दिलें ही बातमी, गार्फील्ड यास तो आपल्या शेतांत काम करीत असतां, त्याच्या स्नेह्यांच्या तोंडून समजली. ती ऐकून त्यास विशेषसें वाटलें नाहीं. त्याची स्त्री तर उलट ह्मणाली " असलें सुखासमाधानाचें घर सोडून, असली मोठी जोखमाची जागा पतकरावी असें मला वाटत नाहीं. " परंतु मित्रमंडळीच्या आग्रहास्तव व कर्तव्य ह्मणून गार्फील्ड यानें ती जागा पतकरली.

राज्यसूत्रें धारण करण्याचा समारंभ ४ मार्च सन १८८१ रोजीं झाला. त्यावेळीं गार्फील्ड हे ह्मणाले " काळा, गोरा, श्रीमंत, गरीब असा पंक्तिप्रपंच न करितां स्वतंत्र संस्थानांतील प्रत्येक रहिवाशास सर्व मुलकी व राजकारणी हक्क कायद्यानें बिनहरकत उपभोगण्यास सांपडूं लागल्याखेरीज लढाईच्या जखमा भरून यावयाच्या नाहींत. महत्त्वाच्या मानानें पाहतां स्वतंत्रता व न्याय यांच्या खालोखाल लोकशिक्षण येतें व तें सुलभ व मुबलक झाल्याशिवाय स्वातंत्र्य व न्याय हीं कधींही पूर्णपणें स्थापित होऊन, अबाधित नांदावयाचीं नाहींत. "

याप्रमाणें राज्यसूत्रें हातीं घेऊन, तो काम पाहूं लागला. थोडेच दिवसांत सर्व कामाची त्यानें पूर्ण माहिती करून घेतली व मोठ्या धोरणानें व विचारानें त्यानें आपल्या प्रधानमंडळाची निवडणूक केली. या कामीं पक्षाभिमान न करितां न्याय तीच गोष्ट त्यानें केली व हीच गोष्ट अनर्थास कारण झाली. एका जागेबद्दल हजारों अर्ज येऊं लागले, पण ती सर्वत्रांस कशी मिळावी ? या अर्जांतून योग्य मनुष्य पारखून, त्यास तो जागा देई. अशा अर्जदारांतील एक माथेफिरू ग्वीटा नांवाच्या इसमानें प्रेसिडेंटचा खून केला.

गार्फील्ड याची आई आतां ८० वर्षांची झाली होती. हल्लीं ती लॉंग

ब्र्यांच ह्या ठिकाणीं आपले मुलीजवळ असे. ती अति आजारी आहे अशी बातमी त्यास समजल्यावरून तो तिला भेटण्याकरितां ह्मणून वाशिंगटन येथून निघाला. त्या दिवशीं जुलईची दुसरी तारीख होती. आपल्या प्रायव्हेट सेक्रेटरीच्या हातांत हात घालून तो रेल्वेस्टेशनांत शिरत असतां, वर सांगितलेल्या वेड्या पीरानें त्यावर दुबारी पिस्तुल झाडलें. त्यासरसा तो जमीनीवर पडला. एक गोळी हातांत घुसली व एक छातींत शिरली ती मरेपर्यंत बाहेर निघाली नाहीं.

झालें ! सर्व लोकांच्या आशा व बेत जागचेजागीं राहिले. पहिल्यानें तर हा फार वेळ जगेल असें वाटलेंच नाहीं. गार्फील्डचे पत्नीस तार केली व ती ताबडतोब आपल्या प्रिय पतीजवळ येऊन दाखल झाली. तिच्या काळजीपूर्वक शुश्रूषेचा व नामांकित वैद्यांचे श्रमाचा इतकाच परिणाम झाला कीं, तो जखम झाल्यापासून ८० दिवस जगला. त्यानें शांतपणानें दुखणें काढलें व १९ सप्टेंबर १८८१ रोजीं शांतपणानें त्याचें प्राणोत्क्रमण झालें.

त्याच्या मरणानें जिकडे तिकडे हाहाःकार झाला. गार्फील्डबाईस अनेक राजेरजवाड्यांकडून दुखवट्याचीं पत्रें आलीं. खुद्द अमेरिकेंत प्रेसिडेंट गार्फील्डच्या कुटुंबास मदत ह्मणून १० लाख रुपये जमा झाले व अद्यापपर्यंत अमेरिकेंत गार्फील्डबाईस पोस्टांतून फुकट पत्रें पाठविण्याचा अधिकार आहे.

अशाप्रकारें अद्भुत प्रसंगांनीं भरलेलें, उपयुक्त व मार्गदर्शक असें हें गार्फील्डचें चरित्र सर्वत्रांस व विशेषेंकरून लहान मुलांस, कित्त्यादाखल पुढें ठेवून, गिरविण्यालायक आहे व ते हें फुकट जाऊं देणार नाहींत अशी आह्मांस फार उमेद आहे.

सरते शेवटीं प्रेसिडेंट गार्फील्ड यांच्या भाषणांत वारंवार येणाऱ्या सुभाषितांपैकीं कांहीं, तरुण मंडळींस बोधप्रद व चिंतनीय अशीं, येथें देऊन आह्मी हें चरित्र संपवितों.

" तरुण मंडळींत सर्वसाधारण असा एक मूर्खपणाचा समज असतो कीं, हळू हळू सर्व कांहीं योग जुळून आपणांस संपत्ति व कीर्ति प्राप्त होईल. परंतु तरुणांनों, मी तुह्मांस खात्रीनें सांगतों कीं, या जगांत घडवून आणल्या-

खेरीज कांहीं घडून येणारें नाहीं. "

' नशीब ही अशी कांहीं चीज आहे कीं, तुह्मांस जर बुडावयाचें असेल तर त्याची कास धरा, पण यश संपादावयाचें असेल तर त्याची मुळींच कास धरूं नका. '

' एक खंडीभर नशिबापेक्षां शेरभर प्रयत्न अधिक मौल्यवान् आहेत. '

' तुह्मी जें करीत असाल त्यापेक्षां जास्त करण्याचें सामर्थ्य संपादा, तर पुढें सराल '.

' जबरदस्त कार्यक्षमता अंगीं असणें ही जरी बुद्धि नसली तरी तिचें काम ती उत्तम करील. '

' प्रत्येक वर्तन हें जन्मस्वभाव व शिक्षण या दोहोंपासून बनलेलें असतें. '

' मनुष्य नुसता दगडासारखा असून चालत नाहीं तर, त्यांत कांहीं तरी पाणी पाहिजे. '

' अति श्रेष्ठ झाला तरी त्यास स्पर्धा करण्यासारखें कांहींना कांहीं तरी असतेंच. '

' चुकीनें विजयी होण्यापेक्षां सत्यानें पराभव झालेला मला मान्य आहे. '

' न आलेल्या संकटांपेक्षां प्राप्त संकटें फार मोठीं दिसतात. '

' जगांत जें संपादशील तें आपल्या स्वतःच्या श्रमानें संपाद—तेंच तुझें असें तुला ह्मणतां येईल. '

' कवि होण्यास जन्मगुणच लागत असतील, पण यश हें प्रयत्नसाध्य आहे. '

' अचल असण्यापेक्षां वाढ होत असणें चांगलें व पूर्ण वाढ ही सर्वांत उत्तम. '

' नीतिशास्त्राचीं तत्त्वें अनंत काल लोटला तरी बदलत नसतात. '

' जगांत मनुष्याला आवडती व जिचें तो कौतुक करतो अशी कोणती गोष्ट आहे ह्मणून जर विचाराल तर, शूर मनुष्य—ह्मणजे जो काळालाही न भितां त्यास भिववितो तो. '

"थोर गुणांच्या प्राप्तीबरोबर, दिखाऊपणाबद्दल तिटकारा हा येत असतो."

" मुलाचें बाळपणचें शिक्षण काय धोरणानें चालवावें हें जो आह्मांस शिकवील, तो मानवी जातीचा मोठा हितकर्ता होय. "

" विद्यार्थ्यानें स्वतः आपला आपल्या समाजाशीं, निसर्गाशीं व धंद्याशीं काय संबंध आहे हें शिकावें व या सर्वांहून आपला, समाजाचा, सृष्टीचा व धंद्याचा जगन्नियंता जो परमेश्वर त्याशीं काय संबंध आहे तें शिकावें. "

' गहन विचार हे सावकाश व संथपणें मार्ग क्रमीत असतात व ईश्वराची करणी अतर्क्य आहे. '

' कल्पना अगर ग्रह किंवा हेतु हे जगांतील योद्धे होत व ज्यांच्या मुळाशीं कांहीं हेतु अगर ग्रह नाहींत त्या लढाया नसून निव्वळ अघोर कर्मे आहेत. '

' खरें ह्मणून जें आहे त्याचा त्याच्या राज्यांतील सर्व भागांशीं असा कांहीं परस्परसंबंध आहे कीं, त्यांत अलगपणा कसा तो नाहीं. जिकडून पहाल तिकडून सत्यच. '

' आपल्या देशबांधवांना, जातिबांधवांना अगर ग्रामबांधवांना दिलेलें वचन मोडणें ह्मणजे फार भयंकर कर्म आहे. यामुळें विश्वासाला धोका बसतो व जगाचा प्राणतंतु जो विश्वास तो जर तुटला तर, तें तरी कसें रहावें ? विश्वास ह्मणजेच जग ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. '

REFBK-0000069

समाप्त.

ग्रंथालय ठाणे
६९